
माणूस

२६ जानेवारी | विशेषांक | १ रूपया



संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

२७ जानेवारी १९७३

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : चौतीस

## सप्रेम नमस्कार

२१ जानेवारी ७३

□ 'माणूस'च्या २३ व ३० डिसेंबर ७२ व ६ जानेवारी ७३ या तीन अंकातील 'विकल्या गेलेल्या भारतीय माणसांच्या' संदर्भातिले सौ. पुष्पा भावे, श्री. चंद्रशेखर मराठे व सौ. छाया दातार यांचे विचार वाचले. नरेंद्र सिंदकरांच्या ज्या व्याख्यानामुळे आपले विचार पोटतिडीकीने मांडावयास सौ. भावे प्रवृत्त झाल्या, त्या व्याख्यानाला मीही उपस्थित होतो. त्यामुळे 'माणूस' मधील चर्चा भलत्याच बाजूला कलली आहे, एकांगी झाली आहे, असे वाटले. असे व्हायला सौ. भाव्यांचा लेख काही अंशी जबाबदार असला तरी श्री. मराठे व सौ. दातार मूळ मुद्द्याला बगल देत

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

आहेत; प्रस्तुत व अप्रस्तुत यांच्यामध्ये गोंधळ करीत आहेत, असे म्हणावेसे वाटते.

सौ. भाव्यांच्या लेखाचा विषय सिंदकरांचे भाषण व त्या भाषणातून व्यक्त होणारे सिंदकर, हा होता. नोकरीच्या निमित्ताने रशियात वास्तव्य करून असलेला हा माणूस. साहित्यसंघाने आवर्जून भेट देण्यासाठी बोलवावे, एवढे साहित्यिक वा अन्य कोणत्याही क्षेत्रातले कर्तृत्व सिंदकरांच्याकडे आहे, असे म्हणता येणार नाही. साहित्यसंघ रशियन भाषेचे वर्ग चालवतो. त्या वर्गांना भेट देण्यासाठी मुख्यत: सिंदकरांना बोलावले गेले होते, अशी माझी समजूत आहे. पण आपल्या मर्यादांचे उल्लंघन करून सिंदकरांनी व्याख्यानाची संधी साधून रशियाप्रशस्ती सुरू केली. त्यांनी मांडलेले विचार एखाद्या रशियन माणसाने किंवा एखाद्या क्रांतीची शपथ घेतलेल्या भारतीय कम्युनिस्टाने मांडले असते तर राग आला नसता. राग मुख्यत: आला तो सिंदकरांच्या अनौचित्याचा व 'संधीसाधूपणाचा.'

सौ. भाव्यांच्याही लेखाचे शीर्षक आहे: 'विकली जाणारी भारतीय माणसे.' सिंदकर बोलताना दुहेरी डाव खेळत होते; काही विचार रशियनांचे आहेत असे सांगून ते अलिप्तपणाचा आव आणीत होते; तर काही वेळेला 'आपली' मते मांडत होते. हे त्यांनी प्रामाणिकपणाने केले असते तर तक्रार निर्माण झाली नसती. पण या दोन्ही बाजू परस्पर पूरक करण्याचा, हे करताना 'सेय' पाहाण्याचा ते प्रयत्न करत होते. म्हणजे आपण खरे कोण आहोत, आपले खरे विचार काय आहेत हे लपवून श्रोत्यांना फसविण्याचा ते प्रयत्न करीत होते. सौ. भाव्यांच्या लेखाचा मुख्य विषय या माणसाच्या विकले-जाण्याबद्दलचा राग व्यक्त करणे हा होता, असे वाटते.

त्यांच्या लेखात आलेली इतर निरीक्षणे आनुषंगिक आहेत; या संदर्भात सहज सुचलेली अशी आहेत. श्री. मराठ्यांनी मात्र असा आव आणला आहे की जणू त्या आर्थिक-राजकीय-सामाजिक बाबींवर स्वतंत्र लेख लिहायला बसल्या आहेत!

आता मराठे व दातार यांच्या मुद्दांबद्दल चार शद:

१. श्री. मराठे व सौ. दातार असे गृहीत धरताना दिसतात की सामाजिक समता व मानसिक स्वातंत्र्य या गोष्टो विरोधी आहेत. अन्न-वस्त्र-निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठो रशियादी साम्यवादी राष्ट्रांनी ज्या एकपक्षीय हुकुमशाहीचा उपयोग केला व ती प्रस्थापित करण्यासाठी विचार स्वातंत्र्याची गळचेपी केली, तो एकच मार्ग यासाठी उपलब्ध आहे, हे गृहीतकृत्य कितपत योग्य आहे?

२. विचार स्वातंत्र्य ही फक्त मूठभर लोकांची 'चैन' असती तर त्यासाठी आतापर्यंत असंख्य लोकांनी प्राणार्पण केले नसते. सॉक्रेटीसपासूनच्या असंख्य 'हुतात्म्यां'ची नावे या संदर्भात

कुणालाही आठवावीत. अन्न-वस्त्र निवाऱ्याइतकीच विचारस्वातंत्र्य हीही माणसाची एक मूलभूत गरज असते. शारीरिक गरजांप्रमाणे या मानसिक गरजेची अनेक माणसांना जाणीव नसते हे त्यांचे दुर्दैव. पण या दोहोत तर-तम ठरवण्याचा प्रयत्न म्हणजे माणसाचे माणूसपण न ओळखणे होय. ज्या ६०% लोकांना मूलभूत गरजांचे स्वातंत्र्य नाकारले गेलेले आहे, ती माणसे अन्न-वस्त्र-निवाऱ्याच्या बदल्यात तुरुंगात जाऊन बसण्यास खुशीने तयार होतील का? मग या शारीरिक गरजांसाठी सर्व देशालाच एक मोठा (मानसिक दृष्ट्या) तुरुंग बनवणे कितपत समर्थनीय आहे?

३. आपल्या अन्न-वस्त्र-निवाऱ्याची हमी एखाद्या परदेशाने घेतल्यास आपण आपला देश त्याच्याकडे गहाण टाकायला तयार होऊ का?

४. सौ. दातारांनी विचारलेले बरेच प्रश्न व सुचवलेल्या बऱ्याच गोष्टी फार भावडया व हळव्या मनाच्या द्योतक आहेत. त्यातून निर्माण होते फक्त भावनाविवश व अलंकरिक भाषा; किंवा आपल्या इस्त्रीच्या घडीला धक्का बसणार नाही एवढ्या बेताने केलेल्या प्रतीकात्मक कृती. माणूस अशा कृतींच्या-पाशी का थांबतो–केवळ स्वार्थामुळे, संशयवादामुळे की आणखी कोणत्या कारणामुळे, याचा आपण तर्ककठोरतेने विचार करावयास हवा.

५. वादासाठी असे गृहीत धरले की विचारस्वातंत्र्य फक्त मूठभर लोकांनाच हवे असते, तरी या मूठभर लोकांमुळेच समाजाचे समाजपण टिकून रहाते ना? हे मूठभर लोक सबंध समाजाच्यावतीने विचारस्वातंत्र्याचा उपयोग करीत असतात; आपले विचार स्वातंत्र्य सबध समाजाच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे अशी त्यांची श्रद्धा असते. अन्न-वस्त्र-निवारा पुरविण्याच्या सबबीखाली त्या स्वातंत्र्याची गळचेपी करणे म्हणजे संपूर्ण समाजाच्या आत्म्यावर घाला घालणे होय.

**प्रभाकर नारायण परांजपे**, मुंबई

# राजाजी

य. दि. फडके

डिसेंबरला राजाजी कालवश झाले. पान फार पिकले होते. केव्हाही गळून पडेल असे वाटत होतेच. राजाजींचे निधन अकाली नव्हते तसेच अनपेक्षितही नव्हते. आपल्या प्रदीर्घ आयुष्यात त्यांना जेवढे काही करता येण्यासारखे होते तेवढे त्यांनी चिकाटीने व तळमळीने केले होते. राजकीय जीवनातले सारे चढउतार अनुभवल्यानंतर भूतकाळातील कर्तृत्वाच्या आठवणी मनाशी घोळवीत जगण्याच्या उतार वयातही राजाजी वर्तमानकाळातच गुरफटले होते आणि युक्तीच्या चार गोष्टी सांगून त्यांच्यापरीने राज्यकर्त्यांना ताळ्यावर आणण्याचा उद्योग अखंड करीत होते. अखेरच्या आजारपणापर्यंत त्यांची तलवारीच्या पात्यासारखी तीव्र बुद्धी काम देत होती. 'स्वराज्या'तून आपल्या वाचकांबरोबर त्यांनी गेली कैक वर्षे सतत संभाषण चालवले होते. सोप्या व आशयाला सरळ भिडणाऱ्या रेखीव इंग्रजीत आवतीभोवतीच्या घडामोडीवर ते टीका टिप्पणी करीत असत. त्यांच्या विचारसरणीशी सहमत न होणारेही आवर्जून त्याची दखल घेत. त्यांचा दृष्टीकोन माहीत असणाऱ्यांना त्यात नवीन वाटण्यासारखे असे काही उरले नव्हते. तरीही राजाजींची नितळ प्रसन्न भाषाशैली लक्ष वेधून घेतल्याखेरीज राहात नसे. भूतकाळ नसलेल्या स्त्रिया आणि भविष्यकाळ नसलेले पुरुष वैताग आणतात असे म्हटले जाते. राजाजींचे लिहिणे-बोलणे मात्र त्यांना किंवा त्यांच्या स्वतंत्र पक्षाला भविष्यकाळ नसताही कंटाळवाणे झाले नव्हते.

एखादा बडा राजकीय नेता मरण पावल्यानंतर 'त्याच्या मृत्यूमुळे राष्ट्र शोकसागरात बुडाले. देशाची कधीही भरून न निघणारी हानी झाली, सार्वजनिक जीवनात त्यांच्या जाण्यामुळे जी पोकळी निर्माण झाली ती भरून निघणे कठीण आहे.' असे म्हणण्याचा प्रघात

असतो. वापरून वापरून झिजलेल्या या गुळगुळीत शब्दप्रयोगांचा सढळ वापर राजाजींच्या मरणानंतरही केला गेला. ‘ राष्ट्रीय ’ नेत्यांचे साचेबंद संदेश, गोलमाल शब्दात त्यांनी अर्पिलेली श्रद्धांजली, बहुधा आधीच तयार ठेवलेले वर्तमानपत्रातील मृत्युलेख, सरकारी पातळीवरून पाळले गेलेले सुतक, राजाजींच्या शवयात्रेचे आकाशवाणीने प्रसृत केलेले धावते निवेदन, देशभरच्या सरकारी कार्यालयांना मिळालेली सुटी— सारे सारे सोपस्कार रीतसर केले गेले. मृत व्यक्तीबरोबरचे मतभेद विसरून तिचे गुणगान करण्याचा रिवाजही कर्तव्यबुद्धीने पाळला गेला. आता राजाजींचे पुतळे, स्मारक, व्याख्यान-माला, पोस्टाचे तिकीट आणि सहा वर्षांनी जन्मशताब्दी सोहळा !

या शोकप्रदर्शनातही उद्वेग वाटण्या-सारखा एक प्रकार होताच. आधुनिक भारताचे निर्माते म्हणून राजाजींचा गौरव केला गेला हे खरे पण त्यांच्या शवयात्रेच्या वेळी पुष्पचक्र वाहण्यासाठी आलेल्या मंडळीत तमिळनाडूबाहेरच्या ‘ अखिल भारतीय ’ नेत्यांची गैरहजेरी जाणवत होती. मिनू मसानी, गायत्री देवी, व उशिरा पोचलेले पिलू मोदी या स्वतंत्र पक्षाच्या नेत्यांचा अपवाद वगळता बाकी सारे नेते तमिळनाडूचे किंवा जुन्या मद्रास राज्यातील राजा-जींचे गिरींसारखे सहकारी होते. जणू राजाजींनी पाऊणशे वर्षे फक्त तमिळ-नाडूचीच सेवा केली ! राजाजी एका दृष्टीने मात्र नशीबवानच म्हटले पाहिजेत. त्यांच्या शवयात्रेच्या वेळी निदान त्यांचे तमिळनाडूतील सारे राजकीय अनुयायी व विरोधक हजर होते. महाराष्ट्रात काकासाहेब गाड-गीळांच्या अंत्ययात्रेच्या वेळी त्यांच्या पक्षातल्या अधिकारपदस्थ नेत्यांपैकी कोणीही हजेरी लावण्याचे सौजन्य दाखवले नव्हते. मग नाथ पैंसारख्या विरोधकाच्या अंत्ययात्रेला त्यापैकी कोणी उपस्थित न राहणे साहजिकच होते ! स्वामी रामानंदतीर्थांच्या अखे-रच्या यात्रेत महाराष्ट्राच्या इतर भागा-तले पालखीपदस्थ काँग्रेसवाले तर नव्हतेच पण तिकीटासाठी उडालेल्या झुंबडीत सामील झाल्यामुळे मराठवाड्याचे प्रतिनिधीत्व करण्याचा दावा वेळी अवेळी करणाऱ्या मान्यवर मंत्र्यांनाही जातीने हजर राहून पुष्पचक्र वाहण्यास सवड सापडली नव्हती. राजाजी मात्र भाग्यवान ! रामस्वामी नायकर, कामराज, करुणानिधी, राष्ट्र-पती गिरी, सुब्रह्मण्यम्, मोहनकुमार-मंगलम् सारे त्यांचे एकेकाळचे सहकारी व नंतरचे विरोधक-अखेरच्या घडीस सोबत करीत होते.

राजाजींचा गुणगौरव करताना विशेषणांची जी खैरात करण्यात आली तिच्यामुळे राजाजी हयात असते तर त्यांची फार करमणूक झाली असती. या शतकातला सर्वश्रेष्ठ पुरुष, सर्वात बुद्धी-मान नेता, गांधीजींच्या खालोखालचा भारताचा श्रेष्ठ राजकीय नेता वगैरे बहाल केलेली बिरुदे खुद्द राजाजींनीच आभारपूर्वक नाकारली असती. काही

काळ सर्वोच्च अधिकारपद भूषवित असता सत्तापूजक समाजाने त्यांची केलेली वारेमाप स्तुतीही राजाजींनी कधीच मनाला लावून घेतली नव्हती. आपल्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात आपल्या हातून झालेल्या देशसेवेची त्यांना जाणीव असली तरी जगन्नाथाचा रथ ओढला जात असताना इतर अनेकाबरोबर आपलाही हात लागला होता याहून अधिक श्रेय राजाजींनी कधीच मागितले नव्हते. तसे पाहिले तर आधुनिक भारताच्या जडणघडणीत त्यांचा वाटा काही कमी नव्हता. पडद्याआडच्या अनेक मसलतीत ते सहभागी झाले होते. अनेक ऐतिहासीक महत्वाच्या घटनांचे ते साक्षीदार होते. इतिहास घडवण्यातील आपला वाटा खुलवून व फुगवून सांगण्याइतके शब्दसामर्थ्यही त्यांच्याजवळ होते. त्यामुळे आत्मचरित्र लिहून, आठवणी सांगून किंवा किमान धंदेवाईक स्तुतीपाठकांकडून अगर भोळ्याभाबड्या चाहत्यांकडून आपली चरित्रे लिहवून घेऊन आपली प्रतिमा उजळणे राजाजींना सहज शक्य होते. पण हा मोह त्यांनी कटाक्षाने टाळला. मौलाना आझादांसारख्या सहकाऱ्याने वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी विधाने करून शितोडे उडवले असताही आपली बाजू उजेडात आणण्यास राजाजी तयार झाले नाहीत.

चरित्रे व आत्मचरित्रे त्यांना आवडत नसत. आत्मचरित्रातल्या आत्मश्लाघेची त्यांना किळस येई. आपल्या आयुष्याविषयी लिहिताना कोणताही माणूस स्वतःस केंद्रस्थानी कल्पून लिहिल्याखेरीज राहात नाही असे त्यांना वाटे. म्हणून त्यांनी आत्मचरित्र किंवा आठवणी लिहिण्यास नेहमीच नकार दिला. त्याचप्रमाणे चरित्रलेखनास प्रवृत्त झालेल्या भक्तांनी पिच्छा पुरवला असतानाही त्यांनी दाद दिली नाही. त्यामुळे राजेंद्रप्रसाद, राधाकृष्णन् किंवा झाकिर हुसेन यांच्याइतकेही राजाजींबद्दल चरित्रलेखन झालेले नाही. मोनिका फेल्टन या इंग्रज स्त्रीने दहा वर्षांपूर्वी राजाजींबरोबरची संभाषणे प्रकाशित करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे थोडेसे दर्शन घडवले तेवढे सोडले तर राजाजींचे विश्वसनीय असे चरित्र नाही. स्वतःच्या जीवनाविषयी त्यांनी केलेले उल्लेखही तुरळक आहेत व तेही बंगालचे राज्यपाल किंवा भारताचे गव्हर्नर-जनरल म्हणून त्यांना प्रसंगपरत्वे कराव्या लागलेल्या भाषणात विखुरलेले आहेत. नाही म्हणायला २१ डिसेंबर १९२१ ते २० मार्च १९२२ या तीन महिन्यांच्या काळात कारावास भोगत असताना लिहिलेली दैनंदिनी त्यांनी तावडतोब प्रसिद्ध केली होती. एरवी दीर्घकाळ राजकारणाच्या आघाडीवर राहिलेले असतानाही स्वतःविषयी कमी बोलणारा किंवा स्वतःबद्दल इतरांना इतके कमी सांगणारा असा राजकीय नेता क्वचित आढळतो. स्वतःसबंधीचे राजाजींनी केलेले तुरळक उल्लेख, त्यांनी अन्य विषयावर केलेले लेखन, त्यांच्या ९३ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने समकालीनांनी त्यांच्याविषयी

लिहिलेल्या हकिकती यांच्या अनुरोधाने राजाजी कसे होते हे जाणून घ्यावे लागते नाहीतर राजाजी चंचल बुद्धीचे होते, त्यांचे नागमोडी राजकीय जीवन कोलांटउड्यांनी भरलेले होते असा समज प्रचलित होण्याचा धोका आहे.

### गांधीजींशी संबंध

'या माणसाशी स्नेह जोडा' असा महादेवभाई देसाईंनी राजाजींच्या संदर्भात गांधीजींना सल्ला दिला होता. रौलट विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यापूर्वी कस्तुरीरंग अय्यंगारांच्या आमंत्रणावरून गांधीजी मद्रासला गेले होते. तेथे गांधीजी आणि राजाजी यांचे स्नेहसंबंध जुळले आणि ६ एप्रिल १९१९ ला रौलट कायद्याविरुद्ध देशभर पाळल्या गेलेल्या सार्वत्रिक हरताळाच्या कल्पनेने आकार घेतला. तेव्हापासून राजाजी गांधीजींच्या प्रभावळीत गणले जाऊ लागले. अधूनमधून होणाऱ्या प्रखर मतभेदावर मात करून दोघांनीही हे संबंध कायम राखले. गांधीजी राजाजींना त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीचे रखवालदार म्हणत असत. राजाजींनी गांधीजींच्या विचारांचा आंधळेपणाने पाठपुरावा केला नाही इतकेच नव्हे तर 'आपल्या दिवंगत नेत्याचा प्रत्येक शब्द धर्मग्रंथाप्रमाणे मानू नका किंवा त्यात केलेली कोणतीही सुधारणा पाखंड समजू नका' असा इशाराही त्यांनी गांधीजींच्या निष्ठावंत अनुयायांना गांधीजींच्या निर्घृण खुनानंतर अनेकदा दिला. गांधीजींसंबंधीचा त्यांचा व्यक्तिगत स्नेह व आदर किती गाढ होता हे गांधीजींच्या स्मारकांचे अनावरण करण्याच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या कितीतरी भाषणात अनेकदा स्पष्ट झाले आहे.

गांधीजींच्या हयातीत राजाजी मिस्किलपणाने त्यांना कशी पत्रे लिहीत याचा एक नमुना राजाजींच्या कारावासातील दैनंदिनीत सापडतो. २१ डिसेंबर १९२१ ला वेल्लोरच्या तुरुंगात दाखल झाल्याबरोबर राजाजींनी गांधीजींना लिहिले, 'तीन महिन्यांची साधी कैद म्हणजे फारच कमी शिक्षा. पण जानेवारीपूर्वी तुम्ही स्वराज्य मिळवले असणार अशी आशा असल्याने शिक्षेचे फारसे काही वाटत नाही. मी तुरुंगातून सुटून येईपर्यंत तुम्ही स्वराज्यसंपादनाचे काम संपवून आहारशास्त्रातील संशोधनाच्या नेहमीच्या उद्योगात गढून गेले असाल असे वाटते.' 'एका वर्षात स्वराज्य' या गांधीजींच्या नाट्यपूर्ण घोषणेबद्दल राजाजींनी त्यांना कसा चिमटा घेतला आहे आणि आहारशास्त्रातील त्यांच्या प्रयोगाबद्दल कसे गमतीने लिहिले आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. चौरीचुरा येथील हिंसक कृत्यामुळे चळवळ थांबवण्याचा गांधीजींचा निर्णय त्यांना मुळीच पसंत पडला नव्हता. 'नाफेरवाद्यांची' बाजू गया अधिवेशनात मांडताना व दासबाबू, मोतीलाल नेहरू यांच्यासारख्या मातब्बर 'फेरवादी' नेत्यांविरुद्ध वाग्युद्ध खेळताना राजाजींनी आपले बुद्धिकौशल्य पणास लावले होते व कौन्सिलप्रवेशास कडाडून विरोध केला होता. मात्र १९३५ च्या सुधारणा जाहीर झाल्यावर

कायदेमंडळात प्रवेश करण्याच्या घोषणाचा त्यांनी तितकाच जोरदार पुरस्कार केला व मद्रास राज्याचे पंतप्रधानपद भूषवून आपल्या प्रशासन-कौशल्याची चुणूकही दाखवली. युसूफ मेहेरअलींनी तेव्हा लिहिले होते, 'इतिहासाने कसा सूड घेतला आहे पहा !... कायदेमंडळांना पापमंदिरे म्हणणारा एकेकाळचा हा सत्याग्रही आता मद्रासचा पहिला लोकनियुक्त पंतप्रधान बनला आहे.' खुद्द राजाजींनी मात्र आपल्या या कोलांटउडीचे समर्थन करताना गांधीजींचीच साक्ष काढली. परिस्थिती बदलल्यानंतर मूळ धोरणाला चिकटून न राहता मुरड घालणे व ते बदलणे आवश्यक असते. धोरणात किंवा डावपेचात बदल करीत असताना मूलभूत ध्येयांशी किंवा मूल्यांशी तडजोड केली जात नाही ना हे पाहणे जरूर असते. या दृष्टीने राजाजींनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका समजावून घ्यावयास हवी.

राजाजी गांधी-युगात अधिक भारतीय नेते म्हणून ओळखले जाऊ लागले हे खरे असले तरी त्यांच्या संपन्न सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ त्यांनी गांधीजींशी परिचय होण्यापूर्वीच केला केला होता. किंबहुना राजाजी व गांधीजी यांचा स्नेह समानशील व समविचाराच्या दोन नेत्यांमधील स्नेह होता. पाश्चिमात्य विचारवंताकडून त्यानी प्रेरणा घेतली नव्हती असे नाही. थोरो व मिल यांचे निबंध ऑरेलियसची चिंतनिका, सॉक्रेटीसचे संवाद यांचा प्रभाव त्यानी मोकळेपणाने मान्य केला आहे. रॉबिन्सन क्रूसोसारखे पुस्तक किंवा शेक्सपियरची नाटके देखील त्यांना आवडत पण इंग्रजीतल्या या अभिजात ग्रंथापेक्षा आईकडून व मावशीकडून ऐकलेल्या पुराणातील कथांनीच आपल्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण झाली आहे असे त्यानी स्वतःच सांगितले आहे. रामायण व महाभारतावर त्यानी इंग्रजीत लिहिलेल्या पुस्तकांच्या लाखो प्रती खपल्या. त्यांच्या भाषणात व लेखात प्राचीन संस्कृत साहित्यातील अनेक कथांचा ते नेहमी आपले म्हणणे पटवून देताना उपयोग करीत. तमिळनाडूतील वैष्णवांच्या परंपरेची राजाजींवर फार छाप पडली होती. गांधीजींची वैचारिक वाढ लक्षात घेताना ज्याप्रमाणे त्यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्या जैन आचार्यांच्या विचारांचा मागोवा घ्यावा लागतो त्याप्रमाणे अलवार संतांच्या व त्यानंतर रामानुजांच्या विचारांचा राजाजींवरील प्रभाव अजमावणे फार जरूर आहे हे डॉ. श्रीनिवासन् यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे.

राजाजींनी जातपातीची बंधने न मानता विशेषतः अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांना जवळ घेण्याचा जो प्रयत्न केला त्यामागे वैष्णव संतांच्या परंपरेतून घेतलेली प्रेरणा आहे. गांधीजींनी अस्पृश्यता निवारण कार्य सुरू करण्यापूर्वी कितीतरी वर्षे आधी राजाजींनी हा उपक्रम आरंभला होता. सालेमला वकिली सुरू

केल्यावर थोड्याच दिवसांनी म्हणजे १९०७ साली त्यांनी दोन अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मुलांना शाळेत घातले तेव्हा त्यांनी त्या मुलांना शाळेतून काढून घ्यावे यासाठी त्यांच्यावर नाना तऱ्हेने दडपण आणण्यात आले पण राजाजी त्याला बधले नाहीत. पुढे १९१७ साली सालेम नगरपालिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी दलित वर्गीयांना नोकऱ्या व शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने सवलती व उत्तेजन द्यावयास सुरुवात केली तेव्हाही विशेषत: कर्मठ ब्राह्मणवर्गाने त्यांना निकराचा विरोध केला. राजाजींना वाळीत टाकले गेले. स्वामी सहजानंद नावाच्या दलित जातीत जन्मलेल्या साधुपुरुषाचा सत्कार करण्यात राजाजींनी पुढाकार घेतला तेव्हा दयानंदांचे स्वागत करताना न्यायमूर्ती रानड्यांना पुण्यात ज्या प्रकाराना तोंड द्यावे लागले तसेच राजाजींनाही करावे लागले. हरिजनांना मंदिरप्रवेश मिळावा म्हणून झालेल्या सर्व प्रयत्नात राजाजी आघाडीला होते.

राजाजींची उपनिषदप्रणीत भारतीय तत्त्वज्ञानावर गाढ श्रद्धा होती. हिंदू समाजात सुधारणा घडवून आणण्यास त्यांचा विरोध नव्हता पण या सुधारणा आस्ते कदम घडवून आणाव्यात, त्या घडवून आणताना राजसत्तेपेक्षा व कायद्याच्या बडग्यापेक्षा लोकशिक्षणावर व मतपरिवर्तनावर भर द्यावा असे त्यांना वाटे. शतकानुशतके अस्तित्वात राहिलेल्या संस्था किंवा चालत आलेल्या परंपरा मोडूनतोडून टाकण्यास ते राजी नसत. बदलत्या कालमानानुसार त्यांना नवे रंगरूप देण्याकडे व अगदी अपरिहार्य असे बदल सर्वसंमतीने स्वीकारण्याकडे त्यांचा कल असे. मूलत: त्यांची प्रवृत्ती परंपरा जतन करू पाहण्याची होती. प्रस्थापित समाजरचनेत मूलगामी बदल करून नवसमाजनिर्मिती करण्याचा ध्यास त्यांनी कधीच घेतला नाही. तसली विचारसरणीही त्यांना कधी मानवली नाही. राजाजी क्रांतीकारक नव्हते. त्यांचा भर मंदगतीने सुधारणा घडवून आणण्यावर होता. हे करताना व्यक्तीवर लक्ष केंद्रित करावे असे त्यांना वाटे. शासनामार्फत नियोजित पद्धतीने परिवर्तन घडवून आणणाऱ्या पद्धतींची परिणामकारकता व इष्टता या दोहोविषयी ते साशंक होते.

## पक्षाला प्रतिष्ठा मिळाली

या त्यांच्या विचारसरणीमुळे कम्युनिस्ट म्हणजे पहिल्या क्रमांकाचे शत्रू असे वाटणे अपरिहार्य होते. समाजवादाच्या घोषणांनीही ते अस्वस्थ होत असत. राजाजींचा कम्युनिस्ट-विरोध, आर्थिक क्षेत्रातील सरकारच्या हस्तक्षेपावर ते करीत असलेली तीव्र टीका, शेती किंवा कारखानदारीच्या क्षेत्रात व्यक्तीच्या उपक्रमशीलतेवर असलेला त्यांचा विश्वास या साऱ्या गोष्टी मूठभर प्रस्थापितांच्या पथ्यावर पडण्यासारख्या होत्या. त्यांनी राजाजींचा सफाईने उपयोग केला. उद्योगपती आणि त्यांचे पाठीराखे, बडे जमीनदार, संस्थानिक व व्यापारी यानी राजाजींच्या स्वतंत्र पक्षात गर्दी केली. असंतुष्ट कॉंग्रेसवाले राजाजींभोवती जमले.

राजाजींच्या सहचर्यामुळे 'स्वतत्र' पक्षाला प्रतिष्ठा लाभली. विरोधी पक्षाशी आघाडी करून सत्तारुढ काँग्रेसला खाली खेचण्याचे मनसुबे रचले गेले. १९६७ साली या डावपेचाना यशही आले पण १९७१ व ७२ साली आघाडयांच्या राजकारणाला विटलेल्या मतदारांनी प्रतिकूल कौल दिला आणि स्वतंत्र पक्षाची वाताहत झाली पण राजाजी या पराभवाने खचले नाहीत. राज्यर्त्यांविरुद्ध आवाज उठवण्याचे व्रत त्यांनी सोडले नाही.

आपल्या विचारसरणीवरील राजाजींची निष्ठा व ती मांडल्याची त्यांची चिकाटी विरोधकांनाही कौतुकास्पद वाटत असे. खरे म्हणजे स्वतंत्र पक्षातले ते एकटेच 'स्वतंत्र' नेते होते. दारूबंदीच्या धोरणाचा त्यांनी आयुष्यभर पुरस्कार केला. मसानी-मोदी वगैरे अन्य नेत्यांना राजाजींचा हा प्रचार रुचण्यासारखा नव्हता. अण्वस्त्राच्या निर्मितीस व वापरास आळा घालावा असा त्यांनी नेहमीच आग्रह धरला. त्यासाठी वयाची ऐंशी वर्षे उलटल्यावरही परदेशदौरे केले. राष्ट्रप्रमुखांच्या गाठीभेटी घेतल्या. त्यांच्याशी पत्रव्यवहार केला. अण्वस्त्राबाबतची राजाजींची मते स्वतंत्र पक्षातील अनेकांना आवडत नव्हती. भारतीय संस्कृतीविषयी त्यांना वाटत असलेली ओढ एक मुन्शी सोडले तर बहुतेक स्वतंत्र नेत्यांना वाटत नाही असे म्हटले तर ते चूक होणार नाही. भारत-रशिया तहाला त्यांनी दिलेला पाठिंबा त्यांच्या पक्षातील अनेकांना नापसंत होता. शिक्षणपद्धती-विषयाच्या त्यांच्या कल्पनाही गांधीजींच्या विचारांशी मिळत्याजुळत्या होत्या. स्वतंत्र पक्षातल्या त्यांच्या सहकाऱ्यांना त्या कितपत मान्य होत्या कोण जाणे !

स्वातंत्र्यलढ्यात भाग घेत असतानाही स्वराज्य मिळाल्यानंतर भारतातील परिस्थिती अधिकच विघडेल असे ते म्हणत असत. १९२२ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कारागृहातील दैनंदिनीत त्यांनी लिहिले आहे, 'स्वराज्य मिळाल्यानंतर तावडतोब किंवा माझ्या मते बराच काळ जाईपर्यंत सुराज्य निर्माण होणार नाही व आपल्या लोकांनाही अधिक सुख मिळणार नाही हे आपण सर्वांनी ओळखले पाहिजे. निवडणुका व त्यातील भ्रष्टाचार, अन्याय, पैसेवाल्यांनी चालवलेला जुलूम व त्यांचे सामर्थ्य, प्रशासन यंत्रणेची कार्यक्षमता या सर्व गोष्टींमुळे स्वातंत्र्य मिळाल्यावर लगेच आपले जीवन म्हणजे नरक बनेल. सापेक्षतः न्याय्य, कार्यक्षम, शांततापूर्ण व प्रामाणिक असा पूर्वीचा परकीयांचा राज्यकारभारच बरा होता असे म्हणत, लोक 'गेले ते दिवस' म्हणून हळहळतील'. राजाजींचे हे भाकित काही चुकले नाही. आपल्या देशातील लोकांनी आळस व अप्रामाणिकपणा सोडून द्यावा असे ते नेहमी सांगत. सत्ताधीशाची स्तुतिस्तोत्रे गाणाऱ्या भाटांची जोपर्यंत चलती आहे तोपर्यंत आपण अश्मयुगीन राजवटातच आहोत आणि 'लोकशाही' किंवा 'समाजवाद'

असला बकवा अर्थशून्य आहे असे त्यांनी गव्हर्नर-जनरल असताना केलेल्या एका भाषणात स्पष्ट बजावले आहे.

कमालीच्या अधु दृष्टीमुळे राजाजींना अगदी जवळचेही दिसत नसले तरी भविष्यकाळात घडणाऱ्या राजकीय घडामोडीची चाहूल लागण्याइतके ते दूरदर्शी होते. दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडचा विजय होणार की नाही याबद्दल इंग्लंडमधले नेते साशंक असतानाही दोस्त राष्ट्रांच्या अंतिम विजयाची राजाजींना खात्री वाटत होती. बहुतेक सर्व काँग्रेस नेते मात्र इंग्लंडचा पराभव होणार अशीच अटकळ मनाशी बांधून होते. १९४० नंतर पाकिस्तानच्या मागणीने जोर धरला तेव्हा देशाची फाळणी स्वीकारल्याखेरीज गत्यंतर नाही अशी राजाजींची खात्री पटली. 'पाकिस्तान देऊन टाका म्हणणारा पहिला हिंदू राजकारणी मी' असा दावा पीठापुरमच्या युवराजांनी आपल्या आठवणी सांगताना केला आहे. हा खरा मानला तरी राजाजींनी जेव्हा फाळणीचा तोडगा स्वीकारावा असे म्हटले तेव्हांच खरें काहूर माजले. प्रस्थापित लोकमताविरुद्ध विचार मांडण्याचे धैर्य दाखविणाऱ्यांना जे जे सोसावे लागते ते ते सारे मग राजाजींनीही सहन केले. सडकी अंडी त्यांच्यावर फेकली गेली. दगडाचा मारा केला गेला, त्यांच्या अंगावर डांबर ओतण्याचा पराक्रमही केला गेला. या कठीण काळात राजाजींच्या विनोदबुद्धीने प्रसंगावधानाने व वादपटुत्वाने त्यांना साथ दिली. डांबर फेकणाऱ्याचे अभिनंदन करून त्यांनी एक वादळी सभा जिंकली होती. लोकांचा रोष ओढावून घेऊन व सहकाऱ्यांची नाराजी पत्करूनही आपल्याला जे देशहिताचे वाटते ते बेडरपणाने सांगणे राजाजींनी कधी सोडले नाही. क्रिप्स योजनेला ते अनुकूल होते. राष्ट्रीय सरकारचे धुरीणत्व जिनांच्याकडे सोपविण्याची त्यांची तयारी होती. 'चले जाव' आंदोलनाला त्यांचा विरोध होता. या भूमिकेमुळे त्यांना काँग्रेस सोडावी लागली. पण १९४४ साली गांधीजींची मुक्तता झाल्यानंतर गांधी-जिना वाटाघाटी घडवून आणण्याचा व राजकीय पेचप्रसंग सोडवण्याचा त्यांनी अयशस्वी प्रयत्न करून पाहिला.

या त्यांच्या उद्योगामुळे पाकिस्तान-धार्जिणेपणाचा दोष त्यांना चिकटला तो कायमचाच! देशाची फाळणी इष्ट म्हणून त्यांनी स्वीकारली नव्हती तर प्राप्त परिस्थितीत ती अटळ आहे अशी त्यांची धारणा होती. गांधीजींनाही अखेर फाळणी मान्य करावी लागली. नेहरू-पटेलांनाही त्याशिवाय इलाज नाही हे कबूल करावे लागले. मात्र फाळणीचा निर्णय स्वीकारावा लागल्यामुळे पोळलेल्या या नेत्यांनी ज्यामुळे भारताचे आणखी विघटन होईल असे त्यांना वाटले त्या सर्व मागण्या फेटाळण्याचा शर्थीने प्रयत्न केला. भारतातील राज्यांची पुनर्रचना भाषिक तत्वावर करण्याचे काँग्रेसने दिलेले वचन पाळल्यास विघटनकारी प्रवृत्ती बळावतील असा त्यांनी धसका घेतला व हे वचन

पाळण्यात टाळाटाळ केली. राजाजीही भाषिक राज्यांच्या निर्मितीस अनुकूल नव्हते. राजाजींची ही सर्व भूमिकाच विवाद्य होती असे म्हणता येईल व फाळणीला जबाबदार असलेल्या गुन्हेगारात त्यांची गणना करता येईल. मात्र त्यासाठी फाळणी टाळून अन्य कोणत्या व्यवहार्य उपायाने राजकीय पेचप्रसंग सोडवता आला असता हे तर्कशुद्धरीतीने पटवून देण्याची जबाबदारी टीकाकाराला पत्करावी लागते.

राजाजींचे राजकीय आयुष्य अनेक विसंगतीने भरले होते असे म्हणणाऱ्यांनाही पाकिस्तानबाबतच्या त्यांच्या भूमिकेत सुसगती होती हे मान्य करावे लागेल. फाळणीनंतर दोन्ही शेजारी राष्ट्रांचे संबंध सलोख्याचे राहावेत व पाकिस्तानने आगळीक केली तरी भारतासारख्या बड्या शेजाऱ्याविषयी पाकिस्तानला वाटणारे भय लक्षात घेऊन भारताने समजूतदारपाचे व उदार धोरण स्वीकारावे असे राजाजींचे म्हणणे होते. काश्मीरबाबत आपली भूमिका लवचिक असावी असे त्यांनी अनेकदा सुचवले. अगदी अलीकडेही सिमला-कराराचे त्यांनी स्वागत केले. सिमला-कराराचे पालन न करता दोन्ही राष्ट्रांनी शत्रुत्व तसेच चालू ठेवले तर ती वाट आर्थिक व राजकीय विनाशाकडे नेणारी आहे असा इशाराही त्यांनी 'स्वराज्या'तल्या अखेरच्या लेखात (९ डिसेंबरच्या) दिला होता मात्र बांगला देशातील मुक्ती आंदोलनाला व त्याबाबतच्या श्रीमती इंदिरा गांधींच्या धोरणाला त्यांनी पाठिंबा दिला होता हे विसरून चालणार नाही. अल्पसंख्य मुसलमानाना बहुसंख्य हिंदूंविषयी वाटणारे भय लक्षात घेऊन त्यांनी जशी त्यांची कड घेतली त्याचप्रमाणे भाषिक अल्पसंख्यांकाना हिंदी भाषिक बहुसंख्येची वाटणारी भीती लक्षात घेऊन त्यांनी हिंदी भाषिकांच्या वर्चस्वाविरुद्ध आरोळी ठोकली व इंग्रजीचा कैवार घेतला. इंग्रजी भाषा शिक्षणाचे माध्यम रहावी याबाबतचा राजाजींचा आग्रह मान्य नसणाऱ्यांनाही कोणतीही भाषा केवळ बहुसंख्य लोक बोलतात म्हणून ती अल्पसंख्यांकांवर जबरदस्तीने लादली जाऊ नये हे तत्त्व मान्य करावेच लागेल.

राजाजींचे व नेहरूंचे नक्की केव्हा व कशामुळे बिनसले कोण जाणे! पण स्वातंत्र्योत्तर काळाच्या आरंभीच्या वर्षात तरी दोघांचेही चांगलेच सूत होते असा पुरावा उपलब्ध आहे. भारताच्या प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्रपती राजाजी व्हावेत असे नेहरूंना वाटत असे पण इतर दडपणामुळे राजाजींऐवजी राजेंद्रबाबूंना पत्करणे त्याना भाग पडले. नेहरू–पटेल यांच्या दरम्यानच्या तणातणीत राजाजी आझादांबरोबर नेहरूंच्या बाजूला असत. नेहरूंनी त्याना योजना-आयोगाचे अध्यक्षपदही देऊ केले होते पण राजाजींनीच ते नाकारले. गव्हर्नर-जनरल म्हणून सेवानिवृत्त झाल्यानंतरही राजाजींनी नेहरूंच्या आग्रहामुळे मध्यवर्ती मंत्रिमंडळात मंत्री म्हणून प्रवेश केला व पुढे दुसऱ्यांदा सेवानिवृत्ती संपवून ते

१९५२–५४ या काळात मुख्यमंत्रीही होते. त्यांच्या तेव्हाच्या एका टीकाकाराने म्हल्याप्रमाणे त्यानंतर त्यांनी सालेमला जाऊन पुन्हा वकिली करण्याचेच बाकी राहिले होते. नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने समाजवादाच्या व सहकारी शेतीच्या घोषणा द्यावयास सुरुवात केल्याबरोबर राजाजी उघड-उघड काँग्रेसवर हल्ले चढवू लागले व १९५९ मध्ये त्याची परिणती स्वतंत्र पक्षाच्या स्थापनेत झाली.

आपल्या प्रदीर्घ राजकीय जीवनात समाजातील आर्थिक शक्तींच्या सामर्थ्याचा व प्रभावाचा पुरेसा अंदाज राजाजींनी कधीच घेतला नाही. आधुनिक समाजात आर्थिक क्षेत्रात राज्याला हस्तक्षेप करावा लागतोच. मागासलेल्या देशांना आर्थिक विकास साधण्यासाठी नियोजनाचा अवलंब करावा लागतो. 'मुक्त उद्योगधंद्या'ची किंवा 'अनियंत्रित बाजारपेठेवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेची' संकल्पना आता कालबाह्य होत आहे व भारतासारख्या दरिद्री देशात या संकल्पनांना अर्थ नाही हे राजाजींना कधीच पटले नाही. कम्युनिस्टांविरुद्धच्या प्रखर भावनेमुळे व्हिएतनाममधील अमेरिकेच्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवण्यासही राजाजींनी तयार होऊ नये हे एरवीच्या त्यांच्या मानवतावादी भूमिकेस धरून नव्हते. बहुसंख्य लोक एका बाजूला असताना मूठभर विरोधकांचे नेतृत्व करण्याचे धाडस राजाजींनी नेहमी दाखवले हे खरे असले तरी अखेरच्या काळात त्यांची सारी बुद्धिमत्ता, कर्तबगारी व मुत्सद्देगिरी समाजातील मोक्याच्या जागा अडवून बसलेल्या मूठभर प्रस्थापितांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यातच मुख्यत: खर्ची पडली ही विदारक वस्तुस्थिती शिल्लक उरतेच. राजाजींना भारतीय राजकारणातील भीष्माचार्य म्हणावयाचे ते या अर्थाने !

□ □ □

**शतपावली**

# हेमिंग्वेचं क्षणदर्शन


रवींद्र पिंगे



मेरी
आणि
अर्नेस्ट

बलदंड!

होय, बलदंड हेच त्यांचं एकमेव विज्ञषण. तो नुसता बंब्या नव्हता. किंवा ताडमाड उंच ढरपोटचा नव्हता. तो शक्तिमान होता. भक्कम होता. लेखक तर होताच. नुसता लेच्यापेच्या लेखकु नव्हे, तर बडा गुर्मीवाला पट्टीचा लेखक. खंदा साहित्यिक. नोबेल पारितोषिकाचा



धनी. मात्र लेखन हे त्याच्या प्रज्ञाशाली व्यक्तिमत्वाचं केवळ एक ललित अंग होतं. तो कुशल मुष्ठीयोद्धा होता. धाडसी दर्यासारंग होता. अट्टल मच्छीमार होता. रानरेड्याला समोरासमोर लोळवणारा शिकारी होता. बहुभाषाकोविद होता. लष्करी तज्ञ होता. चार संसार करणारा कृतार्थ संसारपरायण पुरुष होता. भटक्या होता. नावाड्यांचा, हेड्यांचा, उमेदवार लेखक-कवींचा दोस्त होता. मनस्वी मद्यपी होता. चित्रकार होता, आणि शिवाय लेखक होता.

त्याने जगाचा फार मोठा पट्टा पाहिलेला होता. एका डॉक्टराचा तो मुलगा. त्याची आई गायिका होती. डॉक्टरमहाशयांनी स्वत:वर गोळी चालवून स्वत:चा अंत केला होता. वडिलांचं आत्मसमर्पणाचं हे धाडस हेमिंग्वे कधीच विसरला नाही. वडि-

लांच्या आत्महत्येचं सत्य तो मोठ्या शेखीने मिरवी. चार मंडळी जमली की आपल्या वडिलांचा विषय बुध्याच काढी नि म्हणे "त्यांच्या धैर्याची पताका माझ्या खांद्यावर आहे." आत्महत्ये-बद्दल त्याची स्वतंत्र मतं होती. तो म्हणे, "मनाला येईल तेव्हा आपल्या हातांनी आपलं जीवन पूर्ण करणं हा प्रत्येकाचा हक्क आहे. त्यात अहंकाराची पूर्तता आहे आणि विरक्तीची भावना आहे." माणसाचं अलौकिक धैर्य, विशेषत:, एकाएकी माणसाचा सृष्टीबरोबर चाल-लेला मुकाबला हा त्याच्या चिंतनाचा विषय होता. माणसामधल्या चैतन्यावर त्याची गाढ श्रद्धा होती. किंबहुना, चैतन्यावरच तो भाळलेला होता. चैतन्य, मग ते माणसाच्या साहसप्रवृत्तीतलं असो, चित्रातल्या रंगसंगतीबद्दल असो, श्वापदाच्या मुक्त संचारातलं असो, पाखराच्या गगनविहारातलं असो, अगर रेड्यांच्या झुंजीमधलं असो, त्याचं मन तिकडे झेपावे. तसा तो हाडाचाच लेखक माणूस पण वातानुकूलीत अभ्यासिकेच्या बंद पेटीत अडकून पडलेला नव्हे. तर, दुनिया पायाखाली घालून प्रत्येक गोष्टीचा स्वत: अनुभव घेणारा अल्पा-क्षरी लेखक.

त्याने जन्माला येवून सतराशे साठ गोष्टी केल्या. मिसरूड फुटते न फुटते तोच बाह्या सरसावन तो यंत्रासमोर सामान्य कामगार म्हणून उभा राहिला. यंत्राला रामराम ठोकला आणि शेतावर शेत-मजूर म्हणून उन्हातान्हात बी-बियाणं पेरू लागला, फळं खुडू लागला. शेतावर काम करताना त्याने सृष्टीचं अपूर्व ऋतुचक्र न्याहळलं. पाखरांशी दोस्ती केली. ती पुढे जन्मभर टिकली. क्युबातल्या आपल्या बंगल्यात पुढे त्याने दोनशे कबुतरं पाळली होती. रंगीत पाखरांची एखाद दुसरी गुलजार जोडी पाळणं कुठे नि दोनशे पारव्यांना संसार मांडून देणं कुठं! पक्ष्यांचा जातीवंत लळा असल्याशिवाय हे होणेच नाही. पुढे त्याला नोबेल पारितोषिक मिळालं. म्हणून लिलीयन रॉस त्याचं अभिनंदन करायला क्युबातल्या त्याच्या वाडीवर गेली. तिला तिथे काय दिसावं? तिचाच दाखला आहे, "हॅवानापासून नऊ मैलां-वर हेमिंग्वेची शेतीवाडी आहे. तेरा एकर जागेवर त्याने केळ्यांची लागवड केलेली आहे. इतरही झाडंमाडं आहेत. चुनखडी दगडाचा मनोरेवाला बंगला ह्या शेतातच त्याने बांधून घेतला आहे. त्या मनोऱ्यात बसून तो आपलं लेखन करतो. चौथ्या बायकोबरोबर त्याचा सध्याचा संसार सुरू आहे. नऊ नोकर-चाकर, बावन मांजरं, सोळा कुत्रे, दोनशे कबुतरं, तीन गाई, डझनावारी चित्रं, शेकडो दुर्मिळ ध्वनिमुद्रीका आणि हजारो पुस्तकं तिथे आहेत. हेमिंग्वे बलदंड दिसतो. पाहिल्याबरोबर त्याचं भलतंच धष्टपुष्ट शरीर नजरेत घव-घवीतपणे भरतं. सभोवार बर्फासारखी थंडी आहे. मात्र त्याला तिचं सोयरसुतक नाही. त्याला थंडीचा यत्किंचितही त्रास होत नाही. त्याचे कपडे अगदीच साधे-सुधे आहेत. नटवेपणाचा लवलेश नाही. तो धुम्रपान करीत नाही. म्हणतो,

'शिकाऱ्याने धूम्रपान करू नये. रानातले वास तो नीट घेऊ शकणार नाही.' नजर फार प्रेमळ आहे. उमेदवार लेखकांबद्दल तर तो अति कनवाळू आहे. मला म्हणतो, 'सतत चांगलं, अधिकाधिक चांगलं लिहिण्याचा ध्यास घ्या. आजच्यापेक्षा उद्याचं अधिक चांगलं लिहून झालं पाहिजे. परवाचं त्यापेक्षा अधिक चांगलं चांगलं हवं. असं हे अधिकाधिक चांगलंच लिहिण्याचं व्रत मरेपर्यंत चालवा आणि दरम्यानच्या काळात न मरण्याचीही खबरदारी घ्या!' त्याची चवथी बायको मेरी पतिपारायण आहे. नवरा जे जे करतो त्यात तिला रस आहे. खऱ्या अर्थाने ती त्याची सहचारिणी आहे. 'आपल्या नवऱ्याच्या बहुमोल वेळेचं खोबरं करायला येणाऱ्या पाहुण्यांशी गोड बोलणं, त्यांना दोन हात दूर ठेवणं आणि नवऱ्याला लिहायला निवांत मिळवून देणं हेच तिचं मोठं काम आहे.'

कारखान्यातली कारागिरी झाली; शेतमजुरी झाली. नांगराकडून स्वारी लेखणीकडे वळली. अगदी कोवळ्या वयात तो एका स्थानिक साप्ताहिकाचा क्रीडासमिक्षक बनला. त्यामुळे मुष्ठीयोद्धे, बेसबॉल खेळाडू, नेमबाज, अश्वारोहक, वर्चीबहाद्दर, बैलझुंज्ये वगैरेंशी त्याचं गोत्र जुळलं. जन्मभर त्यांचाच लळा लागला. मोठमोठे निग्रो मुष्ठीयोद्धे त्याचे जीवाभावाचे दोस्त झाले. देवाने त्याला तुफान ताकद दिलेलीच होती. तिला त्याने शिस्त लावली. तो मुष्ठीयुद्ध शिकला. रिंगणात उतरला. पुढे उमेदवार व्यायामपटूंना मुष्ठीयुद्धाचे हात शिकवणं हा त्याने आपला जोडधंदा बनवला. ह्याच कुस्तिगिरीने त्याला पडत्या काळात हात दिला. त्याने स्वतःच जबाब दिला, 'मी पॅरीसला वृत्तपत्रप्रतिनिधी म्हणून पहिल्या महायुद्धानंतर गेलो नुसत्या लेखनावर जगणं फार कठीण जाऊ लागलं. लेखन, सतत लेखन ही मला कधीच पीडा वाटली नाही. तो आनंदच होता. मात्र कष्ट फार उपसावे लागतं. सकाळी उठलो रे उठलो, की पैशाचा प्रश्न 'आ' वासून उभा राही. बरं, पदरात बायको आणि मुलगा! करणार काय? मी सकाळी उठून लिहायचा. घरवाली बच्च्याला घेऊन झोपलेलीच असायची. सर्वच गोमट्या बायकांचा हा विशेष आहे की त्या फार झोपाळू असतात. त्यांची झोप मनसोक्त झाली तरच त्या तरतरीत होतात. तर, बायको झोपलेली असतानाच मी थैली घेऊन मंडईला जायचा. मुलासाठी खाऊ घेई. आता हे सर्व करायचं म्हणजे पैसे हवेत. म्हणून मी एका व्यायामशाळेत जाऊन तिथल्या मुष्ठीयोद्ध्यांना पेच शिकवी. मला मोठी दुखापत होणार नाही ह्याची मी फार काळजी घेत असे. तासाला दोन डॉलर्स हा माझा भाव होता.'

पॅरीसला पत्रकार म्हणून जगण्याच्या अगोदर हेमिंग्वे पहिल्या महायुद्धात इटालीमध्ये अॅम्ब्युलन्सवर अमेरिकन लष्करातर्फे काम करीत होता. ह्या युद्धात त्याला अनेक जखमा झाल्या. त्याच्या अंगावर दोन-अडीचशे जखमांचे

व्रण होते! दोन्ही पाय मोडून परत दुरुस्त झालेले होते. डोक्याच्या कवटी-लाही एकदा तडा गेला होता. जिथे तिथे तो आपला जीव धोक्यात घाली. दोनदा विमान अपघातात सापडला. पण दोन्ही वेळा साध्या दुखापतींवर निभावलं. दुसऱ्याचे प्राण वाचवण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून संकट-निवारण करण्याच्या मर्दुमकीबद्दल लष्करातर्फे त्याचा खास सन्मान झाला होता. तो लष्करी क्रॉस त्याने जपून ठेवला होता. अॅम्ब्युलन्सवर काम करीत असताना मोटारीत नेहमी ड्रायव्हरच्या शेजारच्या जागेवर बसण्याची त्याला सवय लागली. ती त्याने कधीच सोडली नाही. पुढे जन्मभर तो मोटारीच्या पुढच्याच सीटवर बसत असे. मोटारीत पुढे बसून रस्ता न्याहाळणं आणि ड्राय-व्हरशी बातचीत करणं ही त्याची वही-वाट झाली.

पहिल्या महायुद्धानंतर अमेरिकेला न परतता तो परस्परच पॅरीसला वार्ताहर म्हणून जीवन जगू लागला. पहिल्या महायुद्धानंतरचं हे पॅरीसमधलं वास्तव्य ललित लेखक म्हणून त्याच्या फार पथ्यावर पडलं. कारण एझरा पौऊंड, टी. एस. इलियट, स्कॉट फिटझेरल्ड, जरट्रुड स्टेन, वगैरे अभिव्यक्तींच्या शैलीचं स्वतंत्र अंग असलेल्या लेखकांची नि त्याची पॅरीसला दोस्ती झाली. त्यांच्या लेखणीतलं मर्म त्याने उचललं. आज अल्पाक्षरी परंतु अभिजात असं हेमिंग्वेच्या शैलीचं जे कौतुक अमेरिकन वाङ्मयात होत आहे, ती त्याची अवघड शैली घडवली गेली पॅरीसमध्येच. ह्या उमेदवारीच्या कालखंडात त्याने भुके-कंगाल अवस्थेतही दिवस काढले आहेत. खायाला दुसरं काहीच नसल्यामुळे आपण पॅरीसमधली कबुतरं मारून खाल्ल्याची त्याने नोंद करून ठेवली आहे. पुढे गुणवंत लेखक म्हणून अमे-रिकेत नीट बस्तान बसल्यावर तो पुन्हा पुन्हा पॅरीसला आणि व्हेनिसला भेट देत असे. त्याच्या मते ही दोन शहरं म्हणजे आनंदाचे डोह होते. त्याने आपल्या अल्पाक्षरी पण मुलायम शैलीत ह्या दोन शहरांचं वर्णन करताना जे लोभस-वाणं इंग्रजी लिहिलं आहे, त्याचा लावण्यमय मराठी अनुवाद करणं शक्तीबाहेरचं काम असल्यामुळे, त्याचेच मूळ शब्द पेश करतो. प्रथम पॅरीसबद्दल :

"I love to go back to Paris. Am going in the back door and have no interviews and no publicity and never get a hair-cut; like in the old days. Want to go to cafe's where I know no one but one waiter and his replacement, see all the new pictures and the old ones, go to the bike races and fights, and see the new riders and fighters. Find good, cheap restaurants where you can keep your own napkin. Walk all over the Town and see where we made our mistakes and where we had our few bright

ideas. And learn the form and try and pick winners in the blue, smoky afternoons... I am as lonesome and as happy as I can be in that town we lived in and worked and learned and grew up in, and then fought our way back into."

आता इटालीतल्या व्हेनिस शहराबद्दल :

"Italy was so damned wonderful, it was sort of like having died and gone to Heaven, a place you'd figured never to see. We'd go around through the canals, and jump-shoot, and I'd walk the prairies at low tide for snipe. It was a big fly route for ducks that came all the way down from the Pripet Marshes. I shot good and thus became a respected local character. They have some sort of little bird that comes through, after eating grapes in the north, on his way to eat grapes in the south. The local characters sometimes shot them sitting, and I occassionally shot them flying. Once, I shot two high doubles, rights and lefts, in a row, and the gardner cried with emotion. Coming home, I shot a high duck against the rising moon and dropped him in the canal....... Venice was lovely."

युरोपातल्या उमेदवारीच्या काळात जडलेला शिकारीचा हा त्याचा छंद पुढे चौतीस सालच्या आफ्रिकेच्या भेटीपासून बळावला. पुन्हा पुन्हा तो आफ्रिकेच्या जंगलात येई आणि रानटी श्वापदांशी दोन हात करी. वाघ, सिंह, रानरेडे, पाणघोडे, गेंडे, मगरी अशा सर्व हिंस्त्र प्राण्यांची त्याने भंबेरी उडवून दाखवली. केनयाचं जंगल ही दुनियेतली अद्भूत चीज आहे हे त्याचं ठाम मत होतं. केनयाच्या जंगलातला सूर्योदय त्याला प्रिय होता. डोंगराच्या आड सूर्योदय होत असावा, धुकं तरंगत असावं, दंवपाण्यात भिजलेल्या गवताचा उग्र रानवट गंध हवेत दरवळत असावा, वृक्षांवर पक्ष्यांची चिवचिवाट चालू असावी, परसंवात मस्त गेंडा झुलत असावा आणि आपल्या हाताशी बार भरलेला असावा, अशासारखं सुख नाही, अशी त्याची धारणा होती. केनयात गेला की तो पत्रं पाठवून आपल्या मित्रांना 'इथे जीवन अनुभवायला या' म्हणून लांब लांब पत्रं लिहीत असे

पत्र लिहीणं हा त्याचा आणखी एक अखंड उद्योग होता. हजारो लांबलांब पत्र त्याने लिहीली. हेमिंग्वेची धीर देणारी, मार्गदर्शन करणारी, व्रताची खडतर बाजू वेळीच ध्यानात आणून देणारी, आणि जीवनाचा अनेकांगी पण पण एकटक आस्वाद घेण्याला उद्युक्त

मुख्यमंत्र्यांच्या टंचाई निवारण निधीस तुम्ही केलेल्या मदतीमुळे एखाद्या होतकरू विद्यार्थ्याला आपले शिक्षण पुरे करता येईल.

गुरांचा मोलाचा जीव वाचविता येईल.

टंचाई परिस्थितीशी झगडणाऱ्या कामगाराला आवश्यक असलेले अन्न मिळू शकेल.

कोणतीही देणगी तशी फार मोठी नाही की फार छोटीही नाही.

**प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन**

करणारी पत्रं, हा उमेदवार लेखकांना मोठा दिलासा होता. खाजगी पत्रात तो सर्व विषयांना स्पर्श करीत असे. कुठले चित्रपट चांगले आहेत, कुठली मासळी चविष्ट आहे, कुस्त्यांचे कुठले फड रंगणार आहेत, क्युबात काय घडत आहे, आफ्रिकेत कुठला ऋतू फुलणार आहेत, हॉलीवुडला कुठले चित्रपट तयार होणार आहेत, आपण मच्छी मारीला कसे निघणार आहोत, वगैरे सर्व गोष्टींचा त्यात समावेश असे. एकदा एका होतकरू लेखकाने विचारलं, "मला लेखक व्हायचं आहे. त्यासाठी मी कुठली उत्तम पुस्तकं वाचू?" हेमिंग्वेने मोपासा, टॉलस्टॉय, डोस्टो-व्हस्की, गोगोल वगैरेंच्या अभिजात कथा कादंबऱ्यांची शिफारस केली. सर्वांनी कुस्त्यांच्या आणि मुष्ठीयोध्यांच्या फडांना परत परत गर्दी केली पाहीजे, कुस्तीगीर वस्तादांशी मैत्री ठेवली पाहीजे असा त्याचा आग्रह असे. त्याचा हात चालेनासा झाला तशी त्याने अंपायरगिरी सुरू केली. मुष्ठीयुद्धातल्या अंपायरचं अनेकवेळा मरण असतं, कारण चवताळलेले दोन्हीही वस्ताद अंपायरवर अनेकदा तुटून पडतात. अशावेळी एकट्या अंपायरला दोन मुष्ठीयोद्धयां-बरोबर तिथल्या तिथे सामना करावा लागतो. हेमिंग्वे असली अंपायरगिरी अनेक वेळा करीत असे. बलाढ्य निग्रो बॉक्सर्स हेमिंग्वेलाच अंपायर म्हणून मुद्दाम आग्रहाने बोलावून नेत. हा माणूस साहित्यिकसुद्धा आहे ह्याचं त्या निग्रो वीरांना काहीच अप्रूप नसे. मात्र हा एकेकाळचा मुष्ठीयोद्धा आहे ह्याचं त्या वस्तादांना विलक्षण कौतुक होतं. त्याला वाङमयातलं नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतरची गोष्ट. एका मुष्टी-युद्धात अंपायरिंगचं त्याला बोलावणं आलं. आपल्या लेखकपणाचं सारं कौतुक खुंटीला टांगून हा बेटा अंपायर म्हणून रिंगणात उतरला! त्याची ओळख प्रेक्षकांना करून देताना मुष्ठीयोद्धा गर्वाने म्हणाला, "And the referee for tonight, the world–famous millionaire, sportsman, and playboy, Mr. Ernest Hemingway!" ह्यावर हेमिंग्वेने भाष्य केलं आहे, "माणूस playboy असणं ही कुस्तीगीरांच्या जगातली सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे. त्यांनी तो किताब मला दिला. अरे, ज्याला ही उत्स्फुर्त किताबत मिळाली, त्याला नोबेल पारितोषिकाचं कौतुक काय होय?'

ह्या अशा निरागस स्वभावामुळे आणि विशेषत: मोकळ्या, विनोदी वृत्तीमुळे सर्वांना तो हवाहवासा वाटे. तो इतरांची चेष्टा करी आणि स्वत:ची करवूनही घेई. लोक त्याला विचारीत, 'पप्पा, तुम्ही दाढी का राखलीत?' तो सांगे, 'माझ्या गालावर युद्धातल्या दुखापतींचे व्रण आहेत. कातडी खराब झाल्याय. ते व्यंग छपवायला दाढीचा उपयोग होतो.' मार्लीन डिट्रीच ही नटी त्याची खास दोस्त. त्याबाबत बायकोसमक्ष त्याने सांगितलं, 'मार्लीन आणि इन्ग्रीड बर्गमन ह्या दोन नट्यांवर आपण लट्टू आहोत. ह्या माझ्या

बायकोशी माझं लग्न झालं नसतं किंवा लग्न होऊनही सध्याचं प्रेम आटलं असतं तर मार्लीन किंवा इन्ग्रीड यांच्यापैकी एकीशी मी नक्कीच लग्न उरकलं असतं. कारण एकीकडे जे आहे ते दुसरीकडे नाही नि दुसरीकडे जे आहे ते पहिलीकडे नाही आणि दोघींकडे जे विपुल आहे ते मला प्रिय आहे ! पण, कदाचित नसतंही केलं मी लग्न त्यांच्याशी. कारण नटयांना त्यांची म्हणून एक रियासत असते आणि मुख्य म्हणजे त्यांच्या वेळा आडनड असतात!' मित्रांना घेऊन प्राणीसंग्रहालय पाहणं त्याला फार आवडायचं. कुठल्या प्राणी-संग्रहालयात कुठले नवे प्राणी आणले आहेत, ह्याच्या त्याच्या चौकश्या सतत चालू असत. तसंच सहकुटुंब चित्रालयं पाहाणं हाही त्याचा खास षौक होता. तो नेहमी म्हणे, 'सेझानेने जे चित्रकलेत केलं तेच कार्य मी लेखनात करीत आहे.'

आपल्या कुटुंबावर त्याचा जीव होता. त्याने एकूण चार संसार केले. चौथी बायको मेरी. ही मूळची मेरी वेल्श. युद्धकाळात ती 'टाईम' साप्ताहिकाची वार्ताहर म्हणून युरोपात काम करीत होती. हेमिंग्वेची आणि तिची गाठ तिथे पडली. पंधरा वर्षं त्यांचा सुखी, समजुतदार संसार चालू होता. मिस हॅडले रिचर्डसन ही त्याची पहिली बायको. जॉन हा तिच्यापासून झालेला त्याचा थोरला मुलगा. हा अमेरिकन लष्करात कॅप्टन होता. पॉलीन फाईफर ही लेखिका त्याची दुसरी बायको. हिच्यापासून दोन मुलगे झाले. पॅट्रीक आणि ग्रेगरी. मार्था गेलहॉर्न ही तिसरी बायको. मेरी चौथी. तिसऱ्या आणि चौथ्या संबंधापासून त्याला संतती झाली नाही. एका पत्रलेखिकेने त्याच्या थोरल्या लेकाची स्तुती केली. तेव्हा हेमिंग्वेने उत्तरादाखल लिहिलं, 'माझं माझ्या मुलावर प्रेम आहे. In my lifetime I have also loved three continents, several airplanes and ships, the oceans, my sisters, my wives, life and death, morning, noon, evening, and night, honor, bed, boxing, swimming, baseball, shooting, fishing, and reading and writing and all good pictures.'

प्रेमाचं जाळं असं फार दूरवर फेकणारा हा लेखक हाडाचाच कष्टाळू होता. भल्या पहाटे उठून तो लिहायला सुरुवात करी. एकही दिवस खाडा न करता रोजच्या रोज लिही. सकाळी साडे सहा ते साडे दहापर्यंत चार तास तो रोज लिहीत असे. लेखन वेग अगदी मंद. दिवसाकाठी फक्त चारशे ते सातशे शब्दच लिही. भट्टी जमलेली असली तरीही दिवसाकाठी हजार शब्दांच्या पलीकडे त्याची मजल कधीच गेली नाही. लिहिलेला मजकूर तो पुन्हा पुन्हा न कंटाळता सुधारीत असे. एकेका कथेचं तो तीस तीस वेळा पुनर्लेखन करी ! लेखनातली घाईगर्दी ही गोष्ट त्याला माहीतच नव्हती. तो तब्बेतीने लिहायचा. परत परत सतत सुधारणा करीत लिहायचा. साहजिकच त्याची

अखेरची मुद्रणप्रत हा गुणसमुच्चयाचा अर्क असे. साहजिकच त्याने इतकी यत्ता गाठली की युरोपात राहून तो गोष्टी लिही आणि अमेरीकेतल्या संपादकांना त्या तारेने पाठवी. म्हणजे, तीन हजार शब्दांची तार युरोपहून अमेरीकेत करायला खर्च किती येत असेल ? हा खर्च त्याचे प्रकाशक बिन-बोभाट करीत एकाकी माणूस, उग्र युद्धसंग्राम, बलाढ्य प्राणीविश्व आणि पंचमहाभूतांचा स्वैरसंचार, ह्या स्वानुभवाच्या चौकोनातच त्याने लेखणी चालवली. युद्धाबद्दल झटपट लिहिणाऱ्या द्रुतगती लेखकांविषयी त्याला मनस्वी तिटकारा होता. तो म्हणे, 'महायुद्धाचा डोंब उसळलेला मी पाहिला आहे. युद्धामुळे लेखकाच्या मनावर होणाऱ्या जखमा इतक्या खोल असतात का त्या दहा-दहा वर्षे भरून येत नाहीत. युद्धाविषयी पहिली कादंबरी लिहायला मला युद्ध उलटून दहा वर्षे जावी लागली. ज्याला अनुभव नाही तो लेखक मात्र युद्धाबद्दल चुटकी-सरशी लिहून मोकळा होतो. कादंबरी लिहायला घेताना माझ्यासमोर संपूर्ण आराखडा कधीही नसतो. काही प्राथमिक घटना सुचतात. त्या सुचल्यानंतर मी कथा लिहायला घेतो. मग पुढचे घटक मी invent करू लागतो. इन्व्हेन्ट करण्याची प्रक्रीया एकदा सुरू झाली की मग माझा कथेवर ताबा रहात नाही. ती स्वतःचाच घाट शोधीत जन्म घेते. मी भल्या पहाटे उठतो. उठलो की थेट लिहायला सुरुवात करतो. मला माझं


# राजा शिवछत्रपती

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : तीस रुपये**

प्रकाशक

**महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान**

सातारा

एकमेव विक्रेते

**राजहंस प्रकाशन**

पुणे

मन सकाळी रिकामं करावंच लागतं. मी हातानेच लिहितो. संवाद लिहिताना टंकयंत्र वापरतो. टेपरेकॉर्डरवर मजकूर तोंडी सांगून चिटणीसाकरवी तो पुन्हा लिहून घेण्याचा प्रयत्न मी करणार आहे. पाहूया ते जमलं तर. लेखन करीत असताना माझी छाती सिंहासारखी आत्मविश्वासाने भरून आलेली असते. रात्री मात्र मी चुकूनसुद्धा लिहीत नाही कारण रात्री स्फुरणाऱ्या विचारांमध्ये शिळेपणा असतो. रात्री खरडलेलं परत उठल्यावर सकाळी नव्याने लिहून काढावंच लागतं. त्यापेक्षा पहाटेस ताजेतवानं होऊन लिहिणंच उत्तम. मी पहाटेस उठतो नि लिहीतो. अहो, माझ्या आयुष्यातले एकूण एक सूर्योदय मी पाहिलेले आहेत!' उमेदवार लेखकांना तो सांगे, 'लेखन महत्त्वाचं आहे; लेखक दुय्यम आहे. लेखन स्फुरत राहिलं पाहीजे. उपयोग न केल्यास आपला अवयव जसा निकामी होतो, तसंच लेखनाचं आहे. तुम्ही लिहीते रहा. सतत लिहीते रहा. नाहीतर तुमची स्फुरणाची क्रीयाच वंद पडेल.' लेखन करताना त्याला फार शांतता लागे. अमेरीकेत ते अशक्य झालं. म्हणून त्याने क्युबात जाऊन चूल मांडली. तिथे त्याचं संथ लेखन आरामात चालू होतं. लोकही त्याला त्रास देत नसत. तो मद्यपान करायला गुत्त्यात गेला की क्युबातले नागरिक आपल्या खुर्च्या रिकाम्या करून त्याला कोपऱ्यातली निवांत जागा मोकळी करून देत. 'पपाज कॉर्नर' म्हणून तिथल्या गुत्त्यात त्याची मानाची जागा असे. 'पपाज् कॉर्नर' मध्ये बसून हौशी प्रवाश्यांना तो स्वाक्षऱ्या देई. वाङ्मयीन टीकाकारांचा मात्र त्याला मनस्वी संताप होता. टीकाकारांना अक्कल नसते, चांगलं लिहिता येत नाही म्हणून ही मंडळी टीका करतात, असा त्याचा वज्रलेप ग्रह झालेला होता. जो माझ्यावर वर्तमानपत्री टीका करेल त्याचा मी गुद्दे मारून चेंदामेंदा करीन अशी त्याने एकदा धमकी दिली. तेव्हापासून कुठलंही टीकाकार नामक पाण्याचं पितर ह्या बलदंड लेखकाच्या वाटेस गेलं नाही!

तथापि सर्व टीकाकारांचा टीकाकार जो काळ, तो मात्र मांजराच्या पावलाने हेमिंग्वेच्या मार्गात उभा राहिला. काळ सर्वसत्ताधिश आहे. त्याने हेमिंग्वे नामक बाहूलं आपल्या मुठीत घेतलं. तिथे हेमिंग्वे शरण आला. त्याचं वजन अव्वाच्या सव्वा वाढलं. रक्तदाब वाढला. त्याने पथ्यपाणी केलं. वजन उतरवलं. पण अशक्त होत चाललेलं शरीर जे एकदा पोखरलं गेलं ते पोखरलेलंच राहीलं. त्याचा बलदंड देह निकामी झाला. शिकार करण्याला, मुष्ठीयुद्ध खेळण्याला, पोहोण्याला, ते पूर्णपणे असमर्थ झालं. टेबलापाशी बसून जीव रमविणाऱ्यांपैकी तो नव्हताच. असमर्थ व्याधिग्रस्त शरीराबरोबर नांदणं त्याच्यातल्या चैतन्यज्योतीला अशक्य झालं. त्याने बंदुक उचलली. स्वतःवर नेम धरला आणि आनंदाने चाप ओढला.

□ □ □

# विक्रोळी

वर्गयुद्धाची ठिणगी
की
कामगारसंघटनांमधील
आपापसातील हेवेदावे, स्पर्धा ?

एका जळत्या प्रकरणाचा
स्वतंत्र शोध

माणूस प्रतिनिधी
—सु. ल. सोमण


कृष्णा जोशी


डॉ. दत्ता सामंत


अनंत देसाई

# जंजाळ

गेले वर्ष मुंबई–कामगार चळवळीच्या इतिहासातले वेगळे वर्ष ठरावे. विशेषत: विधानसभा निवडणूकानंतरचा काळ ! ईशान्य मुंबईतल्या कामगारांना तर हे वर्ष धुमधडाका वाटले असावे. मोठमोठाल्या इंजिनियरींग कारखान्यांतल्या इंटक संघटनांमध्ये धुमश्चक्री माजल्या. नवे पण काँग्रेसमधलेच एक झंझावाती नेतृत्त्व कामगारांना अनुभवायला मिळाले. इंटकच्या परंपरागत नेतृत्त्वापेक्षा हे नेतृत्त्व अगदी भिन्न होते. लढाऊ होते. कामगार वर्गाशी अधिक जवळचे नाते सांगणारे होते. आणि इंटकच्या प्रकृतिशी जुळते नसले तरी ते नेतृत्त्व इंटकच्या आणि काँग्रेसच्या झेंड्याखालीच घट्ट पाय रोवून उभे होते ! त्याचीच पुढली पायरी गाठली गेली डॉ. दत्ता सामंतांनी विधानसभेची जागा जिंकली तेव्हां ! ! लढाऊ आणि काहीसे डावे नेतृत्त्व, तेही इंटकच्या झेंड्याखालचेच; काँग्रेसच्या आमदारकीचे ! ! कामगारांच्या झुंडी, ह्या परिस्थितीने डॉ. दत्ता सामंतांकडे वळल्या नसत्या तरच ते नवल होते ! हा हा म्हणता खाण कामगार, आशा–उषा, सँकी, सी. पी. टूल्स, ए. पी. आय., गोदरेज, प्रिमियर अशा ईशान्य मुंबईतल्या मोठमोठ्या कंपन्यांचे कामगार डॉ. सामंतांकडे धाव घेऊ लागले. मी केलेल्या चर्चेवरून मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष बॅ. रजनी पटेल ह्यांचा ह्या नेतृत्त्व बदलाला आशिर्वाद होता. ह्यातल्या बहुसंख्य कंपन्यांतून इंटकच्याच संघटना होत्या आणि इंटकच्याच झेंड्याखालीं प्रस्थापित नेतृत्त्व झुगारून देऊन डॉ. सामंतांच्या नेतृत्त्वाखाली इंटक संघटनांची पुनर्बांधणी होऊ लागली. बॅ. रजनी पटेलांची ह्या बदलाला मान्यता असली तरी, इंटकमधल्या प्रस्थापित

नेतृत्वाच्या हे सहज पचनी पडणे शक्य नव्हते !

इंटक अंतर्गत नेतृत्वासंबंधी झगडे सुरू झाले ते इथूनच. कामगार चळवळीच्या व इंटकच्याही इतिहासात हे झगडे अभूतपूर्व ठरावेत. एकाच कारखान्यात कार्य करणाऱ्या दोन भिन्न संघटनांमधले झगडे कामगार चळवळीला नवीन नाहीत. त्यातून उडालेले हिंसक भडकेही नवीन नाहीत. करोना साहू हे एक त्यातले ताजे प्रकरण. मॅनेजरचा तिथे खून पडला. परंतु एकाच युनियनच्या अंतर्गत चालू झालेले हे झगडे निश्चितच अभूतपूर्व होते. वेगळे होते. विक्रोळीच्या गोदरेज प्रकरणात व भांडूपच्या ए. पी. आय. प्रकरणात ह्या झगड्यांनी कळस गाठला. बाहेरचे लोकही त्यात घुसले. सामदंडादी सर्व प्रकारांनी विरोधी आवाज दडपण्याचे सर्व बाजूंनी प्रयत्न झाले. दंगली, मारामाऱ्यांपासून, पोलिस स्टेशन्स जाळण्याच्या धमक्या देण्यापर्यंतचे प्रयोग झाले. असंतोष भडकतच राहिला. तो भडकता राहिल असेच प्रयत्न सर्व बाजूंनी झाले.

२ सप्टेंबर १९७२ ला ह्या साऱ्यांचा अनपेक्षित भडका उडाला आणि मुंबई कामगार चळवळीच्या इतिहासातले एक काळकुट्ट पान त्या दिवशी विक्रोळीच्या गोदरेज क्षेत्रावर लिहिले गेले ! शिवसेना नेते आ. मनोहर जोशींचे निमित्त घडून दंगल भडकली. ह्या दंगलीत, मुंबई कामगार चळवळीच्या इतिहासात प्रथमच दोन पोलिस अधिकारी मारले गेले. एक कामगारही ठार झाला. सोड्याच्या बाटल्या, लोखंडी शिगा आदि संहारक अस्त्रांनी सुसज्ज जमाव अश्रूधुराच्या नळकांड्यांना, बंदुकीच्या फैरींना न जुमानता, पोलिसांवर तुटून पडला. घडला प्रकार भयंकर होता. अमानुष होता !

खुनाच्या आरोपावरून डॉ. दत्ता सामंत, कॉंग्रेस नगरपिते श्री. दिना बामा पाटील आदिंना अटक झाली. आज ते प्रकरण कोर्टात सुरू आहे. डॉ. दत्ता सामंत व त्यांच्या साथीदारांनी

कट करून पोलिसांचे खून पाडले, की त्यात मुख्य हात शिव-सैनिकांचा होता, की शिवसेनेचा उपयोग करून घेऊन आ. प्रभाकर कुंटे, मालक गोदरेज, शासन ह्यांनी हा बनाव घडवून आणला ते सारे कोर्टासमोर येईलच. खरे खुनी कोण, की आ. दत्ता सामंतांवरील आरोपच खरे आहेत ते कोर्ट त्यांच्या पुढे आलेल्या पुराव्यावरून ठरवीलच आणि म्हणूनच त्या मुद्याला मी इथे हात घालू इच्छित नाही. तथापि कोर्टापुढे उपस्थित असलेल्या विषयाला मर्यादा आहेत. खून, दंगल इत्यादि आरोप आ. दत्ता सामंत आदिवर आहेत. त्याची शहानिशा करून योग्य तो निर्णय न्यायमूर्ती देतीलच. परंतु कामगार चळवळीच्या दृष्टिकोनातून ह्या प्रकरणाच्या आणखी काही मर्यादा आहेत. ह्या दंगलीने कामगार चळवळीला एक फार मोठा हदरा बसला आहे. नेत्यांमधली भांडणे, काँग्रेस अंतर्गत धुसफुस, शिवसेनेचा त्या प्रकरणातला प्रवेश, कम्युनिस्टांची पावले, ह्या साऱ्या प्रकरणातला पडद्यामागील संभाव्य सूत्रधार. ह्या साऱ्या जंजाळांत सामान्य कामगार भरडला गेला. मालक दूरच राहिला, टाळकी फुटली ती कामगारांची, पोलिस कर्मचाऱ्यांचीच ! कामगार चळवळ तर ह्या जंजाळातून पुढे रेटली गेलीच नाही, व्यक्तीशः कामगारांचे त्यात नुकसान मात्र निश्चित झाले. ह्या जंजाळात शिरून त्याची उकल करणे म्हणूनच आवश्यक ठरते. जंजाळात शिरून गुंता उकलण्याचा प्रयत्न न झाल्यास घटना विस्मृतीचा धोका अटळ आहे. कामगार चळवळीच्या इतिहासाच्या दृष्टिने ते अनिष्ट आहे. आणि म्हणूनच, जंजाळात शिरून डोकावण्याचा हा अट्टाहास ! त्यातून जे गवसले त्याला न्यायासनाच्या प्रतिष्ठेला बाध येणार नाही अशी काळजी घेऊन शब्दरूप करण्याचा प्रयत्न. . .

# १ : डॉ. सामंतांचे नेतृत्व

डॉ. दत्ता सामंत कामगार चळवळीला तसे नवीन. फारसे मुरलेले नाहीत. त्यांची ह्या आधीची बहुतेक कामगिरी सामाजिक चळवळीतली. घरांच्या दुरुस्त्या, झोपडपट्ट्यांना नळ, संडास, रस्ते वगैरेंची सोय मिळवून देणे वगैरे अनेक कामे त्यांच्या नावावर आज आहेत. खाण कामगारांच्या लढ्यातनं ते कामगार चळवळीत ओढले गेले. तिथे ते यशस्वी झाले. चांदिवली भागात खाण कामगारांच्या वसाहतीत, त्यांनी शाळाही सुरू केली. कामगारांच्या हितासाठी तिथे त्यांनी रात्रीचा दिवस केला आणि कामगार चळवळीतलं त्यांचं नेतृत्व आकार घेऊ लागलं. डॉ. सामंतांना, म्हणूनच, कामगार संघटनांचे नेहमीचे डावपेच मानवत नाहीत. ते सरळपणे कामगारांचे प्रश्न हाती घेऊन मालकांवर तुटून पडतात. कामगारांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करून, त्यांना विश्वासात घेऊन ते संघटना बांधतात. असे करताना, ते अगदी साधू-संतांचे अवतार असतात असेही नाही. काही आडवळणे त्यांना अपरिचित आहेत असेही नाही. त्यांचे थोडेसे लढाऊ, डावे व्यक्तिमत्त्व, आक्रमक भाषाही कामगारांना त्यांच्याकडे आकर्षितात. त्यांतच त्यांच्या काँग्रेसी आमदारकीचा त्यांना सर्रास फायदा ईशान्य मुंबईतल्या अलिकडल्या, कामगार जगातल्या घटनांमध्ये मिळाला.

काँग्रेसमध्येही ते नवीनच. मुळचे ते समाजवादी. घाटकोपरचे संपूर्ण महाराष्ट्र समितीचे १९६७ मध्ये निवडून गेलेले आमदार. १९७१ च्या मध्यावधी निवडणुकात लोकसभेसाठी त्यांची उमेदवारी मंजूर न झाल्यामुळे त्यांनी समाजवादी पक्षाविरूद्ध बंडाचा झेंडा उभारला. निवडणुकीला उभे राहिले पण साफ पडले. पुढे इंदिरा लाटेवर आरूढ होऊन ते काँग्रेसवासी झाले. आणि ७२ मध्ये विक्रोळी–भांडुप मतदार संघातून इंदिरा-काँग्रेसच्या तिकीटावर ते पुन्हा विधानसभेवर निवडून गेले. ह्यावेळी कामगार चळवळीतही ते स्वतःचे स्थान निर्माण करीत होते. ईशान्य मुंबईतल्या अनेक कारखान्यांतून इंटक प्रणीत इंजिनियरिंग वर्कर्स असोसिएशन संघटना आज कित्येक वर्षांपासून अस्तित्वात होत्या. बहुतेक ठिकाणी इंटक संघटनांचे असतात तसे हार्दिक संबंध इथेही ह्या कामगार संघटनांचे मालकांशी-संचालकांशी होते. ह्या संबंधाबद्दल साहजिकच कामगारांमध्ये, इतरत्र असतो त्या प्रमाणे इथेही, रोष होता. धुसफूस होती. पण इंटक

प्रणीत संघटनांच्या मानाने इतर संघटना पुरेशा प्रभावी नव्हत्या. शासकीय पाठिंबा व त्यामुळेच मालकाची सहानुभूती राजकीय पक्षाच्या युनियनलाच बहुश: लाभते. मान्यताही त्यामुळे ह्याच युनियन्सना बहुतेक असते. ह्याची बोलकी उदाहरणे प्रिमियर, ए. पी. आय्. गोदरेजमध्ये आपल्याला पहायला सापडतात. ह्या तिन्ही ठिकाणी इंटक प्रणीत संघटना होत्या. नेतृत्व आमदार प्रभाकर कुंटयांचे होते. परंतु तिथल्या कामगारांचा कल बहुसंख्य कामगार विरोधी गटाचेच आढळतील. परंतु शासकीय दडपणामुळेही म्हणा, संचालकांची मान्यता मात्र कुंटयांच्या संघटनेलाच होती. त्यांचे करार व्हायचे तेही कुंटयांच्या संघटनेबरोबर !

ह्या साऱ्याविरुद्ध जनमत तयार होते. ते आयते भांडवल डॉ. सामंतांना उपयोगी पडले. त्यांच्या लढाऊ वृत्तीमुळे, डाव्या विचारसरणीमुळे आणि काही अंशी नवखेपणामुळे कम्युनिस्टादी डाव्या गटांनाही प्रभाकर कुंटे आदी प्रस्थापित नेतृत्वाविरुद्ध त्यांचे पारडे जड केले. कम्युनिस्टांनी नवकाँग्रेस मधल्या आपल्या मित्रांच्या साहाय्याने फार पद्धतशीर पावले इंटक अंतर्गत झगडयाच्याच्या वेळी टाकली. ज्या संघटना इंटक-शासन दडपणामुळे थोडयाशा मागे पडल्या होत्या, त्या दत्ता सामंतांच्या जवळकीतून पुन्हा जोम धरू लागल्या. डॉ. सामंतांनी आपली मांड घट्ट करताना जे येतील त्या सर्वांना बरोबर घेतले. कम्युनिस्ट संघटनांनी प्रथमपासूनच त्यांना उचलून धरलेले होते. साहजिकच, त्यांचे नेते दत्ता सामतांच्या व्यासपीठावरून चमकू लागले. कामगार क्षेत्रांत नेतृत्वाच्या दिशेने आगेकूच करू लागले. डॉ. सामंतांच्या संघटनांतून बिगर इंटकवाल्यांनाही प्राधान्य मिळत गेले हे आ. तुषार पवारांनीही मान्य केले. त्यांच्या मते डॉ. सामंत एखाद्या झंझावाताप्रमाणे आघाडीवर गेले. इंटकचे नियमित कार्यकर्ते कोण ह्याचे नीट आकलन डॉक्टरांना नव्हते असेही ते म्हणाले. ह्याचा नेमका फायदा कम्युनिस्टांनी उचलला असेही ते म्हणाले.

कंपनीतल्या कामगारांच्यामते मात्र डॉ दत्ता सामंतांनी पक्षाचा विचार न करता सर्वांनाच बरोबर घेऊन लढयाचे शिंग पुकारले होते. निव्वळ कम्युनिस्टच नाहीत, तर जनसंघीय, समाजवादी आणि खुद्द शिवसैनिकही ह्या संघटनेत सामील असल्याचे त्यांनी सांगितले. काही शिवसैनिक तर पदाधिकारी असल्याचे त्यांनी सांगितले. डॉक्टरांबरोबर सध्या अटकेत असलेले श्री. श्री. मटकर हेही शिवसैनिकच आहेत हा त्यांचा दावा. त्यांच्या मते खा. राजा कुलकर्णी, आ. तुषार पवार आणि शेवटी आ. प्रभाकर कुंटे ह्या सर्वांनीच त्यांची निराशा केली. ह्या तिन्ही नेत्यांनी त्यांच्या त्यांच्या कारकिर्दीत कामगारांना विश्वासात घेऊन काही कार्य केलेच नाही. आ. तुषार पवारांच्या वेळी त्यांनी कामगारांच्या शाळेविष-

यींच्या तक्रारींना व इतर काही मागण्यांना वाचा फोडली नाही असे नाही. परंतु एरवी ह्या तिन्ही नेत्यांनी मालकांशी जुळवून घेऊनच कामगारांचा विश्वासघात केला. श्री. प्रभाकर कुंट्यांविषयी कामगारांना मनस्वी संताप असल्याचे दिसले. त्यांच्यातल्या एकाने चिडून सांगितले.

'कुंट्यांचा आणि कामगारांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नव्हता. त्यांच्या सभा होत नसत, कमिटी-मिटींग्ज देखील होत नसत. मालकांशी बोलणी करायला त्यांनी निवडलेली कमिटी हा एक अफलातून प्रकार होता. हळदणकर, कदम आणि राणे ही त्रयी संपफोडी – चळवळी तोडणारी त्रयी म्हणून प्रसिद्ध होती. इंटकचे हे तिघे साधे सभासदही नव्हते आणि नेमके त्यांनाच कामगारांचे प्रतिनिधित्व कुंट्यांनी बहाल केले... स्वतःच्या 'चमच्यांना' घुसवून कुंटे आपल्या खिशात असल्याचेच जणू मालकांनी दाखवून दिले होते....प्रभाकर कुंटे कंपनीत यायचे ते अलिशान गाडीतनं. आले की ते थेट मालकांच्या केबिनमध्ये जायचे. तिथे पाटर्या झडायच्या, वाटल्या फुटायच्या. प्रभाकर कुंटे पुन्हा गाडीत बसण्यापूर्वी पुन्हा गाडीत बाटल्या भरल्या जायच्या. आणि कुंटे, कामगारांशी एक शब्दही न बोलता पुन्हा गाडीतून निघून जायचे... वा रे कामगार पुढारी...हा युरोपला गेला तो गोदरेज शेठच्या पैशावर...हा दिल्लीत पोचला की ह्याच्या दिमतीला असतात प्रिमियरच्या गाड्या. असला पुढारी कसले कामगारांचे भले करणार?' त्यानेच सगळा चुथडा केला गोदरेज कामगारांचा! आणि शेवटी कामगारांनी हाकलून लावल्यावर त्यांनी आणि गोदरेज शेठ, बलसारा सब इन्स-पेक्टर आणि शिवसेनेचे गुंड ह्यांनी आमची युनियन तोडायचा विडा उचलला...खरे नाही वाटणार सोमणसाहेब तुम्हाला, पण शेठनी सोळा लाख रुपये कमीतकमी तरी ह्यासाठी खर्च केले ह्याची अधिकृत बातमी माझ्याजवळ आहे ...'

कुंट्यांविषयीची ही चीड एकंदरीत सर्वच कामगारात असल्याचे मला तरी जाणवले. आणि केवळ गोदरेज कामगारांनीच नाही तर ए. पी. आय. कामगारांनी देखील जवळ जवळ असेच किस्से कुंट्यांविषयी मला ऐकवले. राजाभाऊ कुलकर्णी, तुषारभाई पवार आणि प्रभाकर कुंटे ह्यांच्या अशा कारभारामुळे १९७२ च्या सुरुवातीला कामगार चिडलेलाच होता. त्याचवेळी ह्या पार्श्वभूमीवर उजळून दिसणारे, अधिक जवळचे व प्रामाणिक वाटणारे डॉ. सामंतांचे नेतृत्व डोळ्यासमोर होते. त्यामुळे कुंट्यांनी 'चमच्या' मार्फत मालकांशी करार केल्याचे दिसताच कामगार खवळले, त्यांनी करार फेटाळून लावला आणि सामंतांना आमंत्रण दिलं.

कामगारांच्या ह्या मताला बरीचशी पुष्टी कम्युनिस्ट नेत्यांनी दिली. इंटकच्या नेत्यांनीही दिली. तथापी, १५ ऑगस्ट, १९७२ ला डॉ. सामंतांकडे

पृष्ठ ८६ वर



समोरचं हे वाळवंट. भिवरेचं—चंद्रभागेचं. या वाळूच्या शिवारावर भक्तीचे मळे शेकडो वर्षं फुललेत. टाळ मृदंगांच्या गजरानं या वाळूच्या अंगावर रोमांचांची बाभुळबनं फुटलीत. या नदीच्या लाटेलाटेबरोबर संतांच्या ओव्या फुलल्यात. अभंग उठलेत. वारकऱ्यांच्या दिंडया, मराठी मलुखाच्या कानाकोपऱ्यातून गर्जत आल्या नि या वाळवंटाच्या उबदार मांडीवर विसावल्या.

जी हयात जगलो तिच्यात या वाळवंटाकडं लक्ष देणं जमलं नाही. खोटं तरी कशाला बोला? ज्यासाठी जगलो त्या रिवाजात या वाळवंटाला कवडीचंही मोल नव्हतं. ते आयुष्यच वेगळं होतं! कात टाकली की साप तवाना होतो. बदलत नाही. सळसळ तीच राहते, डंख तोच राहतो. आपल्या फणीचा अभिमानी डोल तोच राहतो. माणसाचं तसं नाही! माणसानं कात टाकली की केवढा पालट होतो त्याच्यात! होय. कधी कधी माणसालाही कात टाकावी लागते.

आज या वाळवंटाशीच नातं जडल्यासारखं वाटतं- छे! या वाळवंटात मला चक्क एक आरसा दिसतो. माझं बिंब मला त्यात स्वच्छ व स्पष्ट दिसतं. हे

स्वातंत्र्यपूर्व कालातील आणि स्वातंत्र्योत्तर कालातील समाजजीवनाशी ज्याचे मन सुखदु:खाच्या क्षणी अखंडपणे स्पंदत राहिले, ज्यानं महाराष्ट्राच्या तिहासातील वळणांना निर्विवाद आकार दिला, लोकांनी भरल्या मायेनं ज्याचा 'क्रांतीवीर' म्हणून जयजयकार केला, तो सिंहाच्या काळजाचा पुरुष समाजापासून दूर जेव्हा पंढरपूरच्या परिसरात खेचला जातो तेव्हा त्याच्या मनात असेच विचार-तरंग उठत असतील काय ?

# ही वाट एकट्याची

**शिवाजी सावंत**

वाळवंट आणि मी सारखाच असं वाटतं. वारकरी वाळवंट ! वारकरी मी. कुठल्याही विठोबाकडं न जाणारा! जेव्हा संत नांदले तेव्हा या वाळवंटाला-सुद्धा फुलबागेचा मुखडा मिळाला. आपोआप आज या वाळवंटाला वरच्या तळपत्या तापदेवाची जोड मिळालयेय. इथलं ते भावजीवन निघून ग्येलंय. आजही इथं सटीसहामाहीला टाळ-मृदंग घुमतात. उखणल्या रस्त्याच्या कडेला वडाराकडून फुटणाऱ्या खडीच्या आवाजासारखे ते वाटतात ! भावशून्य. आजही इथं अभंग गायिले जातात, पावडरच्या दुधासारखे ते नि:सत्व वाटतात. कसल्याही भावभक्तीच्या प्राप्तीसाठी इथं आलो नाही. या टाळां-वर, या अभंगांवर कधी जीव जडला नाही. त्यांचा तिटकाराही कधी वाटला नाही. खरं तर यांची नोंद घ्यावी असंच कधी घडलं नाही. घडलं असतं तरी हे आवडलं नसतं. का ? तर पिंडच तसा नाही म्हणून ! आणि कुणालाच आपला पिंड असाच का याचं उत्तर देता येत नाही.

आमचं 'दैवत' वेगळं होतं. आजही आहे. या पंढरीच्या विठोबापेक्षा वयानं लहान ! आमचं दैवत–राजा शिवाजी ! होय मार्क्सच्या साम्यवादाचा एक पाईक

झालो—इथल्या भाषेत त्या दिंडीतला वारकरी झालो तरी दैवत होतं नि आहे राजा शिवाजी! हेच दैवत का? तर त्याचा झटक्यात मिळणारा वर माझ्या रांगड्या, शेतकरी, कुणबाऊ मनाला पटणारा होता. घेलणारा होता. कसला तो वर? 'अन्यायाची चिड! आणि त्याविरुद्ध क्रिया!' हेच जीवनभर करीत आलोय.

आयुष्याचा हिशेब कधी मांडला नाही. त्यामुळं ताळेबंद बघण्याची गरज उरली नाही. खूप बघितलंय. इतकं की बघून बघून नजर मरायला पाहिजे होती. मेली नाही. या देशाला थिजवणाऱ्या गुलामगिरीचा काळा दाट अंधार बघितला. कळायला लागलं तेव्हापासूनच त्या अंधारानं जीव घुसमटला. पेटून उठलो. अंगात हत्तीची रग होती, डोळ्यात सिंहाच्या नजरेची आग होती. रक्तात कृष्णा-कोयनेच्या पाण्याची जाग होती.

फालतू नोकरीचा वीट आला. गोऱ्यासाहेबाच्या सदरेवर उभं राहताना कुणबाऊ काळजाला काच पडू लागला. मग व्हायचं तेच झालं. राजिनाम्याची पत्रावळ भिरकावून दिली. भवतीच्या आगीत उडी घ्यायचं ठाणलं. महात्मा गांधींची काँग्रेस होती त्यावेळी. ती काँग्रेस म्हणजे रावणानं हरवून नेण्यापुर्वीची सीताच होती! तिच्या पाण्याच्या तीर्थाचा एक थेंब एखाद्या तरण्या ओठाआड गेला की, त्याचं उभं गाव कसं संजीवनी प्यायल्यासारखं निर्भय व्हायचं.

आमचा सातारा जिल्हा तर स्वातंत्र्याच्या चळवळीत बिनिवर होता. १९३० च्या सत्याग्रहासाठी प्रत्यक्ष म. गांधींनी माझी निवड केली. छातवान कसं अभिमानानं तटतटून आलं. त्यावेळचा सत्याग्रह चुटकीसरसा संपायचा. जनजागरण हाच त्याचा मूळ उद्देश असायचा. पोलीस सत्याग्रह्यांना तेही नीट करू द्यायचे नाहीत.

आमच्या सत्याग्रहाच्या वार्ता झळकल्या. वातावरण चढीला पडलं. सत्याग्रहाची जागा जाहीर झाली. ठरल्यावेळी मी सत्याग्रहाच्या जागेवर दाखल झालो. साताऱ्याच्या त्या वेळच्या डी. एस. पी.नं शे-पाचशे पोलीसांचं कडं त्या जागेभवती आवळलं होतं. एका ट्रकच्या टपावर मी चढलो. माणसांचा मुंगीदाट थवा भवत्यानं दाटला होता. त्यांच्या मनातील मरणाचं भय हटवायला हीच वेळ नामी होती.

ट्रकच्या टपावरून मी घोषणा दिल्या— 'वंदे मातरम! म. गांधीकी जय!' ट्रकला पोलीसांनी घेराव टाकला. डी. एस. पी. काळ्या दंडुक्याचं कांडकं नाचवीत आपल्या पाळीव कुत्र्यांना मला कैद करण्याचा हुकूम देत ट्रक भवत्यानं हैदोसू लागला. बघी जनता 'आता काय होतंय?' म्हणून डोळ्यात जीव गोळा करून बघू लागली. वीजेसारखी विचाराची एक लकेर माझ्या मनात तरळून सरकली. चढलेला हा ताण एका क्षणात पलटीला घातला पाहिजे. हीच ती वेळ आहे, लोक शिक्षणाची.

डी. एस. पी.कडं तुच्छतेनं बघत

बेदरकार, मिष्किल हसत मी म्हणालो, 'आरं कशाला गोळा क्येलाय एवढा गोतावळा ? माणूस ग्येलं तर तिरडीला लईत लईत चार जणं ब्येस होत्यात !! मी धट्टाकट्टा हाय म्हणून हो तर साजणं ठेवा. ही जत्रा कशापायी आणल्येस ? वंदे मातरम् !'

भवतीचा सगळा जमाव थरथरला ते ऐकताना. माझ्या कानांवर घोषणांचा कल्लोळ पडला—'क्रांतिसिंहाचा विजय असो !'

त्या सत्याग्रहानं गजाआड गेलो. त्या वेळी तुरुंगात जाणं म्हणजे आज २६ जानेवारीला भारतरत्न किताब दिल्लीच्या शाही सोहळ्यात स्वीकारताना वाटेल तेवढ्या भाग्याचं वाटायचं ! एकवेळ तुरुंगाबाहेर असताना क्षणभर तरी देशाचा विचार मनातून चुकार व्हायचा, पण गजांआड असताना तसं कधी व्हायचं नाही. आज जसे पोलीस सबइन्स्पेक्टर, रेंजर, मेजर यांचे ट्रेनिंगचे कँप असतात. त्या कँपवरचं शिक्षण झालं की हा 'अफसर पठ्ठ्या तयार होतो तसे त्या वेळी तुरुंग होते ! तिथली हवा कडवेपणा फुलतं करायला जबरी होती. तुरुंगात जाऊन आलेला मूळचा कच्चा, अधमुरा मायेचा पूतही बाहेर पडला की मशालीचं काळीज घेऊनच बाहेर पडायचा. माणसाला मरण भाकरीच्या तुकड्यासंगं चटणी लावावी तसं स्वातंत्र्याच्या चळवळीला हलक्या हातानं कसं लावायचं याचं ट्रेनिंग देणारे होते ते तुरुंग ! आमच्या वेळची एक पिढी तुरुंगानंच आपल्या मांडीवर काढविली आहे.

भय मनात कधी नव्हतंच त्यामुळं ते चेपायचं कारण नव्हतं. त्या पहिल्या सत्याग्रहानं छातीचा भाता मात्र एका जबरदस्त विश्वासानं चौथडी भरून आला. 'ही माती मोकळी झाली पाहिजे. इथला माणूस—माणूस म्हणून ताठ मानेनं जगला पाहिजे. शिवाजीराजाचा हा देश गुलामीच्या टापांखाली मावळ-मर्दानगी पार भुलून कसा ग्येलाय ? तो पेटून उठला पाहिजे. त्यासाठी आता हातानंच आपल्या घरादारावर निखारा आणि तुळशीपत्र एकजोडीनं ठेवायला पाहिजे. आता बोहल्यावर चढायचं ते प्रसंग पडला तर मरणाच्याच. म्हणून लग्नाचा कधी विचार केला नाही. ते चुकलं असं आजसुद्धा वाटत नाही.

गांधींचा देशभर झंझावाती दौरा होत होता. कधी मीठाचा, कधी परदेशी मालांच्या चौकातील होळीचा, असा निषेधाचा वणवा देशभर पेटला होता.

एकीकडून सशस्त्र क्रांतीचा भडका उठवावा, सफेद कातडीची काळी राजवट उलथवून टाकावी म्हणून तरुण रक्त सळसळत होतं. ऐन उमेदीच्या असंख्य माना दोरखंडी फासात पिळल्या जात होत्या. तरीही त्यावरचे अशरण ओठ बेहोष गर्जत होते— 'इन्कलाब झिंदाबाद ! भारत माता की जय !'

दोन ठसठशीत विचारप्रवाह त्या काळात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी वेडावून या देशात आड येणारे बांध फोडत धावत होते. सत्याग्रहाचा स्वदेशीचा गांधीजींचा मार्ग आणि सशस्त्र क्रांतीचा—

इन्कलाबचा क्रांतिकारकांचा मार्ग. दोन्हीही मार्गातील अनुयायांबद्दल सामान्य आमजनतेत उरभर आदर दाटून होता. कसेही का होईना लोकांना स्वातंत्र्य हवे होते. स्वातंत्र्य ! स्वतःवर नसेल एवढे प्रेम ह्या अमृतसत्यावर आमच्या पिढीने केले.

'स्वातंत्र्य' म्हणजे काय ? स्वतःचे राज्य. गोरे गेल्याखेरीज ते येणार कसे या देशात ? गांधींच्या असहकाराच्या, सत्याग्रहाच्या मार्गांनी इंग्रज सरकारची नाकेबंदी करीत आणली होती. बरेच दिवस मी त्या तत्त्वाचा पाईक होतो. सत्याग्रह केले. विदेशी माल पेटविले, पिकेटिंग्ज घडविली. या मार्गांनी नाक दाबताच सरकार तोंड उघडील, त्यातून स्वातंत्र्यसूर्य बाहेर येईल या एकाच वेडानं पछाडलेले आम्ही घरादारांना, रक्तानात्यांना इतर सुखदुःखांना पारखे झालो होतो.

सरकार गांधीजींना अटक करीत होते. तुरुंगातूनही गांधीजी चळवळीला आदेश देत होते. तरी स्वराज्याची मुद्रा काही गोऱ्या सुसरीच्या काटेरी टणक पाठीवर उमटत नव्हती. या जीवघेण्या तणावाचे प्रत्यक्ष काँग्रेसच्या श्रेष्ठींमध्ये प्रतिसाद उमटू लागले. सशस्त्र उठावाला हात घालावा म्हणून सुभाषचंद्रांनी काँग्रेसचे व्यासपीठ सोडले. ही-घटना मला बोलकी वाटली. मनात विचारांची चक्रं फिरू लागली. सुभाष आम्हाला बंगालचे शिवाजी वाटत. तडफदार, सुर्यपेट पुरुषी नेता होता तो.

भारतात ही घटनाचक्रं फिरत असतानाच युरोपमध्ये जर्मनीनं दुसऱ्या महायुद्धाचा भयानक आव्हानी भडका उडवून दिला. जर्मनी आणि दोस्त राष्ट्रांची सुंदोपसुंदी जुंपली असताना या देशाची 'स्वातंत्र्य-जगदंबा' पोत नाचवीत मोकळी करणं, मुक्त करणं अगत्याचं होतं. श्रेष्ठ नेत्यांपासून सामान्य नागरिकापर्यंत सर्वांनाच आच लागली. "स्वातंत्र्य-स्वराज्य !" देशभर इंग्रजविरोधी निषेधाची तीव्र लाट उफाळून आली–"छोडो भारत ! चले जाव !" बेचाळीसचा लढा सुरू झाला. जनतेचा सर्वस्तरीय झगडा सुरू झाला.

सर्वोच्च थराचं एकजात नेतृत्व इंग्रजांनी गजाआड तुरुंगात कोंडून टाकलं. "चले जाव"ची निर्वाणीची चळवळ दुय्यम नेतृत्वाकडं तरुण रक्ताच्या हाती भारताच्या नियतीनंच सुपूर्द केली. शाळा, कॉलेजं, सार्वजनिक स्थळं ओस पडली.

मला माझ्या पिंडाला पाहिजे तसा पोषक काळ सामोरा आला. भूमिगत होऊन आम्ही स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गात येणारी स्वकीय-परकीय सारी बांडगुळं छाटण्याचा विडा उचलला. साताऱ्याची दरी-दरडींनी भरलेली भूमी त्याला नामी होती. गांधींना बगल देऊन मी क्रांतीकडे वळलो.

सवाई, चक्रवाढ व्याजानं नडल्या गरिबांची राजरोस पिळवणूक करून उलट उजळ माथ्यानं सरकारला मदत करणारे कृतघ्न धनलोभी, भूमिगतांचे पैशाच्या लालचेनं ठावठिकाणे सांगणारे बेईमान फितवेखोर, सरकारी चाक-

रीच्या अधिकाराचा गैरफायदा उठवून जनतेला छळणारे पोलिस व मुलकी अधिकारी यांना शासन देण्यासाठी आम्हीच आमचं एक 'शासन' निर्माण केलं. "प्रति सरकार!"

सातारा आणि त्यालगतचा फाटा आमच्या 'प्रति सरकारच्या' कल्पनेनं थरारला. जिथं "वंदे मातरम्" ही घोषणा देताच तुरुंगात रवानगी व्हायची तिथं दुसऱ्या सरकारची कल्पना बोलणाऱ्यांची रवानगी स्वर्गातच व्हायला वेळ लागणार नव्हता. पण माझं आणि माझ्या सोबत्यांचं मरणाचं भय केव्हाच मेलं होतं. खरं सांगायचं तर तेव्हा मरायलाही आम्हाला सवड नव्हती. जनजागरणाची देशभर उसळलेली लाट पकडून आम्हाला इथला माणूस सर्व भय-बंधनातून मुक्त करायचा होता. कष्टणारा, श्रमणारा आणि कुणाच्याही टाचेखाली फुकाफुकी मूकपणी चिरडला न जाणारा माणूस.

आमच्या प्रति सरकारची पाप्यानी हाय खाल्ली. जनतेनं उदंड मायेचा प्रतिसाद दिला. आम्ही क्रांतीचं अग्नि-कंकण मनगटी बांधलं. त्यातही समाजा-वरच्या उपकाराचा डौल नव्हता. होती ती स्वतःलाच सुखविणारी बेहोषी.

"पदोपदी पसरून निखारे
आपुल्याच हाती
होऊनिया बेहोष
धावलो ध्येयपथावरती
विश्रांतीस्तव कधि न
थांबलो पाहिले न मागे
बांधू न शकले प्रीतीचे
वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर होता —
पायदळी अंगार."

ह्या नमुन्याची ती बेहोषी होती. आम्ही ओवाळून टाकले होते आमच्यावरून आम्हालाच! कारण आम्ही म्हणजे दुसरे कुणी उरलोच नव्हतो. सरकारी खजिना घेऊन जाणाऱ्या रेलगाड्या लुटाव्या. ती संपत्ती भूमिगत देश-भक्तांना, गरिबांना वाटावी. जुलूमाचे अन्यायी गड्डे शोधून उखडावेत असा धडाका आम्ही सुरू केला. बेचाळीस सालाने भारताच्या इतिहासात सातारा जिल्ह्याचे नाव आघाडीवर आणले. राज्यकर्त्यांच्या लंडन दरबारी वाळण्या-सारख्या कुणबाऊ गावाची गंभीर चर्चा झाली.

ते दिवस मंतरलेले होते. सूर्य उशाला घेऊन आभाळ पांघरून साताऱ्याच्या कुठल्याही दरडीतल्या खोपटात अंग टाकताना कुडी धन्य वाटायची. रोज नव्यानं उगवणाऱ्या दिवसाबरोबर नव-नवीन मरणं आमच्याभवती घिरट्या घालू बघायची. कुठली अज्ञान शक्ती आम्हाला धकवून नेत होती याचा आजही मला माग घेता आलेला नाही. पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी कधी आम्ही मेलेल्या म्हातारीचं सोंग घेऊन जिवंतपणी तिरडीला आवळून घ्यावं, कधी मेंढरांच्याकळपात दडी घेऊन रात्र रात्र मेंढरू म्हणून काढावी.

परिस्थितीच आम्हाला शहाणपण शिकवीत होती. लोकांच्या सद्भावना

तारीत होत्या. जीव वाऱ्यावर सोडलेला भूमिगत कार्यकर्त्यांना दुसरं कोण तारणार ?

४२च्या लढ्यात अवघा देश घुसळून निघाला. महायुद्धाच्या खाईत होरपळून निघालेलं इंग्लंड साम्राज्यशाहीच्या जागतिक सिंहासनावर डळमळू लागलं. स्वातंत्र्याचं पीक आता अगदी पोटरीला आलंय हे आम्हाला कळून चुकलं. तो सोन्याचा दिवस अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपला. दुभंगून का होईना देश स्वतंत्र झाला. आमच्या छातीतील फडफडती पाखरं उडून जातील की काय एवढा अभिमानी आनंद आमच्या उरात उसळला. आता दिडशे वर्षांची काळरात्र सरत होती. आम्ही घडवू ते गोमटं या देशात आता फळणार, फुलणार होतं. "स्वातंत्र्य-स्वराज्य" या नुसत्या उच्चारानं आमच्या मिशांचे केस ताठरत होते.

या विजयी वळणावरही 'हुश्श' करून विसावा घ्यायला आम्हाला उसंत नव्हती. उलट येणाऱ्या स्वातंत्र्यानं आता मागणीचा पदर पसरला होता. इमान, कष्ट, निष्ठा, त्याग अशी वाणं ते मागत होतं. ह्या लक्ष्मीला हे दिल्याशिवाय ती नांदती होणार कशी ?

राष्ट्रपिता गांधीजींच्या भरल्या जीवाचं माप उंबरठ्यावर लवंडून ही स्वातंत्र्यलक्ष्मी भारताच्या गृहात आली. गरूड स्वर्गाप्रत भरारी मारून, गंगा पाताळापर्यंत सूर घेऊन ही सुवार्ता देवदेवतांना सांगून आली. माझा या भाकड कथांवर विश्वास बसणार नव्हता. माझा देव मी मानला होता. या मातीतला माणूस. माझं रामायण ठरलं होतं. साम्यवाद. माझ्या देवाकडं मला नेणारा दूत होता मार्क्स. माणसाला माणूस म्हणून जगू देणं हे माणसाच्याच हातात आहे एवढं सरळधोप सांगणारा. देव, देश, धर्म, सुवत्ता हे सारं माणसासाठी आहे. त्याला हे कुणी दिल्यानंतर मिळणार नाही. मिळवावं लागेल.

ज्या खांद्यावर गांधीजींचा चरखाधारी तिरंगा घेतला होता त्याच खांद्यावर मी मार्क्सचा हातोडी-विळ्याचा लाल बावटा घेतला. जाणीवपूर्वक समजून-उमजून.

लोक म्हणायचे तुम्ही पाटर्या बदलताय ते का ? मी हसून उत्तर द्यायचा. "मला पंढरीला जायचं आहे. म्हणून निरनिराळ्या गाडीत बसलो. एक गेली साताऱ्याला, एक गेली विजापूरला नि एक गेली बेळगावला. म्हणून आता नीट पाटी बघून, दोन शहाण्यासूर्त्यांना विचारून ह्या लालबावट्याच्या गाडीत बसलोय. हीच मला पंढरीला नेणार !"

निवडणुका झाल्या. मी खासदार म्हणून निवडून आलो. पहिली पाच वर्ष जनतेच्या प्रश्नावर आकांताने झगडलो आणि तिसराच एक स्वाभिमान डिवचणारा घोळ उभा राहिला. भाषावार प्रांतरचना केली तर कारभार सुखाचा होईल म्हणून नेहरूसरकारने त्या विषयाला हात घातला.

महाराष्ट्राची पद्धतशीर नाकेबंदी करण्याचा घाट त्या वेळचा मुख्यमंत्री

मोरारजी देसाई आणि केंद्रातील काही श्रेष्ठींनी घातला. मुंबई महाराष्ट्राला द्यायची नाही हा त्या नाकेबंदीचा गाभा होता. महाराष्ट्रावर हा धडधडीत अन्याय होता.

आता मराठी जनता न्याय मिळवून घ्यायला जागवून उठविणंच भाग होतं. आ. अत्रे, एस. एम., दाजीबा देसाई, बागल चौबाजूचे नेते गोळा झाले. सर्व राजकीय मतभेद विसरून सर्वपक्षीय एक आघाडी बांधली गेली. 'संयुक्त महाराष्ट्र समिती.' मराठी माणसाच्या जिव्हाळ्याच्या बाबीसाठी, मुंबईसाठी झगडा सुरू झाला. महाराष्ट्राची फर-फरती मशाल झाली. ज्वाला गर्जू लागल्या–' मुंबई, बेळगाव, कारवार, बिदरसह–संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे !"

सत्याग्रह, निदर्शने, उपोषणे यांचा तणाव दिवसागणिक वाढू लागला. एका विराट मोर्चावर मुरारजीच्या खाकी डगलेवाल्यांनी अमानुष गोळीबार केला. १०५ हुतात्म्यांचं रक्त मातीला अर्घ्य म्हणून मिळालं. सरकारशी जनता इरेसरीला पडली. बांद्यापासून चांद्या-पर्यंत आमचे झंझावाती दौरे सुरू झाले. शहराचा, खेड्यांचा चौक चौक भाषणा-साठी फुलू लागला. नेते आणि जनता यांची दिलजोड झाली. मराठी मुलूख घुसळून निघाला. घर घर किल्ला बनला. मी पहिला सत्याग्रही म्हणून तुरुंगात गेलो.

यातच विधानसभेच्या निवडणुका आल्या. हुतात्म्यांच्या रक्ताला जागून मराठी जनतेनं समितीवर भरघोस मतांचा वर्षाव केला. विधानसभेला हादरा बसला. शिष्टमंडळं दिल्लीच्या वाऱ्या करू लागली. नेहरू कुणाला दाद द्यायला तयार नव्हते. सत्याग्रह्यांचा मोर्चा प्रत्यक्ष दिल्लीवर सोडण्याचा निर्णय घेतला. मी सत्याग्रह्यांच्या मेळ्यातून दिल्लीला गेलो. दिल्लीच्या इतिहासप्रसिद्ध रस्त्यारस्त्यावर 'शिवाजी महाराज की जय' म्हणताना अनुभवलेला बेहोष आनंद आजही आठवतो. अंगावर पसाभर मांस चढल्यागत वाटतं.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळीच २४ सालानंतर महाराष्ट्र मला जीवंत, पेटलेला दिसला. क्षणाक्षणानं तंग होणाऱ्या वातावरणामुळं सरकारला समितीपुढं नमतं घ्यावं लागलं. महा-राष्ट्राला मुंबई मिळाली. मंगल कलश आला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस विस-र्जन व्हायला पाहिजे होती ती झाली नाही. संयुक्त महाराष्ट्रानंतर समिती टिकायला पाहिजे होती ती टिकली नाही ! मराठी माणसाला विजय पचविता येत नाही हेच ऐतिहासिक सत्य पुन्हा एकदा सिद्ध झालं. समितीनं जनतेच्या आशा पालवल्या होत्या. ती मोडल्यानं त्या कोळापल्या.

माझ्यासमोर एक मार्क्सच मला भुरळ घालणारा होता. कम्युनिस्ट पार्टीचं काम करीत निवडणुका जिंकत, मोर्चे काढत माझ्यातील साम्यवादी पाईक चालला होता, या देशात कधी-तरी चिड उफाळेल. क्रांती उठेल ही

माझी उमेद होती. काळ चालला होता. वय आयुष्याच्या उताराला लागलंय हेही मला कळलं नाही.

एकीकडून महागाईचा राक्षस अल्लाद्दिनच्या दिव्यातून आल्यासारखा क्षणाक्षणाला वाढत चालला होता. गरीब दिवसेंदिवस गरीब, श्रीमंत कलेकलेनं अधिक श्रीमंत असं विचित्र सत्र भारताच्या स्वातंत्र्याला घेरू लागलं. मिळतील त्या चार शेंगा आपल्या बिळात नेऊन ठेवणाऱ्या उंदरासारखी माणसांची मनोवृत्ती झाली. देशभक्तीच्या नावाखाली बाजारबुणगे स्वातंत्र्य कुरतुडू लागले. समाज हताशवादाच्या प्रचंड डोंगराखाली तडफडू लागला. स्वातंत्र्यानंतर ह्या समाजानं २५ वर्षांत कमावलं काय ? हताशवाद! आणि तीन युद्धं !

स्वराज्य लुटणारे लुटीतच राहिले. त्यांना भोवतीच्या समुदायाची दुःखं ऐकायला सवड नव्हती आणि इच्छाही नव्हती. भ्रष्टाचार, जातियता, आर्थिक विषमता, शैक्षणिक आबाळ या साऱ्यामुळं इथला रहिवासी गांगरून गेला. त्याला मायेनं थोपटणारा महात्मा उरला नाही. उलटया पायानं भुतांची पिलावळ चालावी तशी या देशातली माणसं चालायला लागली. नजर ठरणार नाही असा पसारलेला हा समाज सामोर येईल त्याला पाठ दाखवीत जगतो आहे. पाण्यातील प्रेत सडत जावं, येईल त्या माशानं त्याचा लचका कुरतडावा तशी त्याची स्थिती झाली आहे. पाण्यात मगर घुसावेत तसे ढोंगी लोक सगळ्या आघाडीच्या कट्टीच्या जागा बळकावून बसले आहेत. हरिजनांच्या झोपडयात जाऊन त्यांच्या पोरावाळांना मांडीवर घेऊन अंघोळ घालणारा गांधी आता उरलेला नाही. वाली नसलेला हा विराट कंगाल समाज बांधावा म्हणून दोन्ही हात पसरून उमेदीनं झटलो. चौवाटांनी धावणाऱ्या या भरतीच्या लाटा थोपवायला माझे हात थिटे पडले. कितीदा तरी वाटलं या गर्जत्या लाटांचा पाणमारा नाका तोंडात शिरून देह इथंच पडावा. समाजाच्या उंबरठ्यावर कुडीची धूळ पडावी. ते घडलं नाही. घडणार नाही. समाजाला मी मूक मरणं मान्य नाही. मी त्यांचा "क्रांतिसिंह" आहे. क्रांतिवीर आहे.

म्हणून या वाळवंटावर आलोय. चंद्रभागेच्या-भिवरेच्या. कसल्याही मोक्षाची आस मनात नाही. माझ्या समोर चंद्रभागेचं क्षीण, कोरडं पात्र आहे. याच नदीत लोकांच्या आग्रहासाठी, आपली जीवाच्या परिश्रमानं बांधलेली गाथा तुका वाण्याला सोडावी लागली होती. ती सोडून हिच्या काठाला तो तीन दिवस उपाशी बसला होता. त्याचा आपल्या मनाशीच संवाद चालला होता. माझाही तसाच चालला आहे. मीही माझ्या जीवनाची गाथा सोडून दिली आहे. लोकगंगेत ! ती तरेल की नाही याची मला चिंता नाही. तुका वाण्याचा संवाद तीन दिवसांनी संपला होता. मला माहीत आहे. माझा हा संवाद कधीच संपणार नाही.

मला विरक्ती आलेली नाही. मी जीवनभर एक वारकरी होतो. आजही आहे. माझी पंढरी मात्र देह पडला तरी मला भेटणार नाही. मग इथंच या–या भागवतांच्या पंढरीत का आलो ? इथल्या या वाळवंटानं मला इथं खेचून आणलं आहे. ज्या समाजाच्या उंबरठ्यावर माझ्या देहाचं पान टपकावं असं वाटतं त्याचं प्रतिकच आहे हे वाळवंट. पिढ्यान्पिढ्या या वाळूवर मी प्रेम केलेल्या भावड्या जनसागराचे पाय उमटले आहेत.

मला विठोबाशी बोलायचं नाही. चंद्रभागेला साकडं घालायचं नाही. माझं नातं, माझी बांधिलकी या वाळवंटाशी आहे.

समाज मला विसरेल याची खंत बाळगण्याएवढा भावडा मी कधीच नव्हतो. जे प्रेम मी या जनसागरावर केलं ते माझ्या समाधानासाठी होतं. त्याची परतफेड कधी मनी धरलेली नाही.

माझ्या मनात एकच प्रश्न रुंजतो आहे. महात्मा गांधी, शिवाजी, मार्क्स आणि पंढरीचा विठोबा यांच्याशी मी कुठल्या धाग्यांनी जखडलो गेलो आहे ? चार दिशांना चारीकडे तोंडं असलेले हे संकेत माझ्या जीवनवाटेला का आणि कसे भेटत गेले आहेत ? ज्याचं मलाही सापडलेलं नाही ते उत्तर महाराष्ट्रातील दुसरं कोणी देईल असं मला वाटत नाही. फक्त एकच आस, एकच जबरदस्त इच्छा आजही मनात उसळून उठते. वाटतं–समोरचं हे चंद्रभागेचं वाळवंट असंच पसरलेलं असावं. याच्या वाळूकणांची जागा धगधगीत अंगारांनी घ्यावी. आभाळाला जाऊन हे अंगारांचं वाळवंट भिडावं. ते तुडवीत मी शेवटच्या श्वासापर्यंत अखंड चालतच राहावं. माझ्या तोंडी एकच काव्यपंक्ती असावी—

> " पदोपदी पसरून निखारे
> आपुल्याच हाती ।
> होऊनिया बेहोष धावलो
> ध्येय पथावरती । "

मला विश्वास आहे अशा या वाटेवरचा मराठी मातीत पूर्वी कुणी होऊन गेला असेल, असा एखादा का होईना अग्निपुत्र मला एखाद्या दिव्य क्षणी भेटेल. तो फक्त तोच मला समजावून देईल, माझे गांधी, शिवाजी, मार्क्स आणि विठोबाशी असलेले नाते ! त्या क्षणासाठीच मी थांबलो आहे, थांबणार आहे ! !

◻ ◻ ◻

## या देशात लोकशाही आहे काय ?

# बारा जाहीर सवाल !

**अनिल बर्वे**

**पाच जानेवारी १९७३**

निकालाच्या दिवशी कोर्टात चांगलीच गर्दी जमली होती. बरोबर बारा वाजून एक्केचाळीस मिनिटांनी आमची निर्दोष मुक्तता झाली आणि उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. हे सारेच आम्हाला अनपेक्षित होते. आमच्यावरला खटला हा सरकारने स्वत:च्या प्रतिष्ठेचा खटला बनवला होता. सरकार खटला मागे घ्यायला तयार नव्हते. उलट आम्हीच आरोप कबूल करावेत म्हणजे एक दिवसाची साधी कैद आणि थोडयाफार दंडावर तुम्हाला सोडून देऊ असा आमच्या मागे तगादा चालवला होता. आम्ही आरोप मान्य करावेत म्हणून पोलीस अधिकारी आमच्या मित्रांवर आणि पाठीराख्यांवर दडपण आणत होते. पण आम्ही माघार घेतली नाही.

वस्तुत: आमच्यावरचा खटला संपूर्णतया राजकीय होता—आरोपही राजकीय होते, तेव्हा आरोप मान्य करण्याने आमची काही प्रतिष्ठा जाणार नव्हती. तरी पण एक बनावट केस रचून पंधरा महिने आम्हाला तुरुंगात डांबण्यात आले खटल्याचा निकाल लवकर लागून आम्ही निर्दोष सुटू नये म्हणून मुद्दाम कालहरण चालवले होते—आम्हाला स्वत:चा कायदेशीर बचाव करता येऊ नये म्हणून वेळोवेळी बेकायदेशीररीत्या अडथळे निर्माण करण्यात आले होते. अशा परिस्थितीत आम्ही आरोप मान्य करून माघार घेणे म्हणजे सरकारच्या सूडबुद्धीवर आणि हुकूमशाही प्रवृत्तीवर आमचे आम्हीच पांघरूण घालण्यासारखे होते. सरकारी रोषाला पोलिसी दडपशाहीला भीक न घालता आमच्या पाठीशी उभ्या राहिलेल्या मित्रांना तोंडघशी पाडण्यासारखे होते. त्याचप्रमाणे गृहमंत्री श्री. शरद पवार यांनी 'खटला मागे नाही घेतला तरी यापुढे सूडबुद्धीने वागवणार नाही. राजकीय कारणास्तव त्रास देणार नाही.' या

दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवण्यासारखे होते. परंतु गेल्या दीड-दोन वर्षांत सरकार ज्या पद्धतीने आमच्याशी वागले त्यावरून या सरकारला काही चारित्र्य अथवा नीतीमत्ता आहे यावर आमचा विश्वासच राहिला नव्हता.

आमच्याविरुद्ध पुरावा काहीही नव्हता. ज्या दोन-चार खोटया बनावट साक्षी पोलिसांनी उभ्या केल्या होत्या त्या क्रॉसमध्ये बारगळल्या होत्या. तेव्हा आम्ही निर्दोष सुटू याची आमच्या मित्रांना संपूर्ण खात्री होती—फक्त आम्हालाच तेवढी नव्हती. ॲड. एम. आर. परांजपे आणि बॅ. आगरवाल निकालाविषयी काहीही अंदाज व्यक्त करीत नव्हते. कारण सरकारने प्रतिष्ठेच्या बनवलेल्या राजकीय खटल्यात बहुतांशी न्यायाधीश सरकारविरुद्ध जायला तयार नसतात. त्यांच्यावर येणाऱ्या सरकारी दडपणाला बळी पडतात, असा आजवरचा अनुभव आहे. म्हणूनच आम्हाला थोडीफार शिक्षा होणारच हे आम्ही इतके गृहीत धरले होते की, निकालाच्या दिवशी कोर्टात येताना आम्ही तुरुंगातले आमचे कपडे पुस्तकेही बरोबर घेतली नव्हती निर्दोष सुटल्यावर दुसऱ्या दिवशी मी जेलवर जाऊन आम्हा दोघांचे सामान आणले.

पण मॅजिस्ट्रेट श्री. आर. एम. पाटील यांनी आमचा चांगलाच अपेक्षाभंग केला. त्यांनी आम्हाला चक्क निर्दोषी सोडले, इतकेच नव्हे तर पोलीस अधिकाऱ्यांवर म्हणजे पर्यायाने सरकारवर चांगलेच ताशेरे झाडले. श्री. पाटील यांनी रामशास्त्र्यांची परंपरा चालवली असे म्हटले तरी वावगे होऊ नये. श्री. पाटील यांच्यासारखे निर्भीड आणि निःस्पृह न्यायाधिकारी अजून या देशात बाकी आहेत म्हणूनच लोकांचा अजून या न्यायसंस्थेवर विश्वास बाकी आहे—नसता अत्यंत खर्चिक नि कालापव्ययी अशा या न्याययंत्रणेवरचा लोकांचा विश्वास कधीच उडाला असता.

‘सरकार विनाकारण कशाला कोणावर खटला भरेल?’ ही लोकांच्यात एवढी दृढ समजूत आहे की, निर्दोष सुटलेला माणूसही तपासातील दोषांमुळे आणि पुराव्या अभावीच सुटतो अशी त्यांची पक्की समजूत असते. त्यामुळे मला वेळोवेळी या खटल्यात मदत केलेले आणि माझ्या सुटकेने आनंदी झालेले माझे मित्रही अभिनंदन करता करता मला बाजूला घेऊन खालच्या आवाजात अगदी खाजगीत विचारत—‘काय रे अनिल, पण त्या पत्रकांची खरी भानगड काय आहे? खरंच ती तू छापली होतीस काय?’

—माझ्यापाशी या प्रश्नाचे उत्तर नाही आणि काही उत्तर द्यावे अशी माझी इच्छाही नाही.

माझे अतिउत्साही मित्र मला विचारतात—‘सरकारवर अब्रू नुकसान भरपाईचा खटला भरणार आहेस काय? पैशाची काळजी करू नकोस, आम्ही व्यवस्था करतो.’

—अशा प्रकारच्या खटल्यात सरकारकडे नुकसान भरपाई मागता येते की नाही याची मला माहिती नाही. कदाचित

नुकसानभरपाई मागता येतही असेल. पण मला नुकसानभरपाई मागायची नाही. एकतर या खटल्याने माझे स्वतःचे कोणतेही कर्तृत्व नसताना सरकारनेच मला प्रतिष्ठितपणा प्राप्त करून दिला आहे. दुसरे म्हणजे व्यक्तिगत नुकसान तर आजारपणामुळे अथवा अव्यवहारीपणामुळेही कित्येकदा होते. खरे तर या खटल्यात माझे जेवढे व्यक्तिगत नुकसान झाले त्याच्या हजारपटींनी जास्त नुकसान लोकशाही मूल्यांचे नि न्यायालयीन परंपरांचे झाले आहे.

माझा प्रश्न असा आहे की' मी दोषी असेन अथवा निर्दोषी असेन. मला शिक्षा लागली असती अथवा नसती. पण कोणाही नागरींकावर खटला भरताना लोकशाही मूल्याचे आणि परंपरांचे जतन झाले पाहिजे की नाही? न्यायालयाचे पावित्र्य राखले गेले पाहिजे की नाही?'

जो कोणी आमच्या खटल्याचे कागदपत्र वाचेल नि माहिती घेईल त्याच्या असे लक्षात येईल की सरकारने स्वतःच्या सत्तेचा नि कायदेशीर पळवाटांचा फायदा घेउन राजकीय कारणास्तव आणि सूडबुद्धीने पदोपदी लोकशाही नि न्यायालयीन मूल्ये अत्यंत उद्धामपणे पायदळी तुडवली आहेत. आम्ही जरी निर्दोष सुटलो असलो तरी जोकाही मनस्ताप व्हायचा आणि आर्थिक नुकसान व्हायचे ते झालेच आहे. आम्हाला न्याय घ्यायला नि आमचे संरक्षण करायला ही न्याययंत्रणा नि शासनयंत्रणा कूचकामी ठरली आहे. तेव्हा या करता लोकशाहीवादी नागरिक नि वृत्तपत्रे सरकारला जाब विचारणार आहेत काय?

—वृत्तपत्रे जर झोपा काढणार असली आणि नागरीक जर स्वस्थ बसणार असले तर सरकारकडे नुकसानभरपाई मागून तरी आम्हाला असे काय मोठे घबाड मिळणार आहे? □

## या देशात लोकशाही आहे काय?

गेली पंचवीस वर्षे गरीब जनतेच्या उरी लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्याच्या टिर्‍या बडवणार्‍या नि स्वतःस महात्मा गांधींचे वारस म्हणवणार्‍या सत्ताधारी काँग्रेस पक्षाने, जनतेच्या करातून हजारो रुपयांचे तनखे भत्ते खाणार्‍या खासदारांनी आणि न्यायाधिकार्‍यांनी माझ्या बारा प्रश्नांची उत्तरे द्यावीत

## प्रश्न पहिला

२४ मे ७१ च्या मध्यरात्री पुणे स्पेशल ब्रँचचे डेप्युटी पोलिस कमिशनर श्री. सेठ यांनी असि. पोलिस कमिशनर श्री. पारनाईक, पी. एस. आय. श्री. प्रभु, मिश्रा व इतर तीन चार सबइन्स्पेक्टर पन्नास साठ पोलीस, एक वायरलेस गाडी, दोन पोलीस व्हॅन, दोन जीपस् एवढ्या मोठ्या काफिल्यासह मोठ्या धाडसाने आणि शिताफीने छापा घालून आम्हा दोघा निःशस्त्र असूनही सशस्त्र(?) क्रांतिकारक असलेल्यांना अटक केली. पंधरा दिवसांच्या पोलीस कस्टडीनंतर ७ जून ७१ ला आम्हा दोघांची मॅजिस्ट्रेट कस्टडीत रवानगी करण्यात आली.

विनाकारण कालहरण करून तब्बल अडीच महिन्यांनी २ ऑगस्ट ७१ ला आम्हा दोघांवर १२४ अ, १२० ब, १५३ अ या आय. पी. सी. कलमां-खाली सरकार उलथून टाकायचा प्रयत्न करणे, वर्गावर्गात वैमनस्य माज-वणे, कट करणे या आरोपांखाली आरोप पत्र ठेवले. ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट श्री. झायदी यांनी काही एक तपासणी न करता सदर केस सेशन कमिट केली. सेशन्स कोर्ट राजे भोसले यांनी आम्हा दोघांना जामीन नाकारून सदर केस कोणत्या कोर्टाच्या आधिकारात येते हे ठरवण्यासाठी सर्व प्रकरण १६ सप्टें. ७१ ला हायकोर्टाकडे पाठविले. हाय-कोर्टात सदर केस सहा महिने धूळ खात पडली.

वस्तुत: १२४ अ या कलमाखाली खटला भरण्याआधी गृहमंत्रालयाची रीतसर परवानगी लागते ती देण्यात आली नव्हती. सदर खटला चालवण्या-साठी स्पेशल कोर्ट नेमावे लागते तेही नेमले नव्हते. आम्हा दोघांना पकडण्यात मोठी 'कार्यतत्परता' दाखवणाऱ्या गृहखात्याने आम्हा दोघांना जास्तीत जास्त काळ तुरुंगात डांबता यावे म्हणून मुद्दाम जाणूनबुजून दिरंगाई केली.

१२ मार्च ७२ ला आम्हा दोघांचे वतीने अॅड. कल्याणमल सिंघवी यांनी हायकोर्टात हेबियस कॉर्पसचा अर्ज केल्यावर पंधरा मार्चला आम्हा दोघांची जामिनावर मुक्तता झाली. आम्ही जामिनावर सुटताच गृहखात्याला जाग आली आणि रीतसर परवानगी देऊन, स्पेशल कोर्ट नेमून आम्हा दोघांना २७ एप्रिलला 'जामीन नाकारल्याने' पुन्हा तुरुंगात नेण्यात आले. आणि त्याच आरोपांखाली दुसऱ्यांदा चार्जशिट ठेव-ण्यात आले.

परंतु दरम्यानचे दहा महिने आम्हा दोघांना राजकीय सूडबुद्धीने हेतू पुरस्पर, बेकायदेशीररीत्या अटकेत ठेवणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध नि गृहमंत्र्यां-विरुद्ध कोणती कारवाई केली जाणार आहे ?

**प्रश्न दुसरा**

आमच्या दोघांच्या अटकेनंतर पूना


# रोखलेल्या बंदुका, उठलेली जनता !

लेखक : अनिल बर्वे. किंमत तीन रुपये : टपाल खर्चासहित

लिहा : अनिल बर्वे, ५२८ नारायण पेठ,
भटवाडी, पुणे ३०

हेराल्ड, दै. सकाळ या वृत्तपत्रांनी जाणून बुजून धादांत खोटया, खोडसाळ नि विपर्यस्त बातम्या प्रसिद्ध करून जनतेत पूर्वग्रहदूषित वातावरण निर्माण केले. सदर दैनिकांना मी खुलासा करणारे पत्र पाठविले असता जेल अधिकाऱ्यांनी ते अडवून ठेवले. त्या विरुद्ध पत्र पाठवण्यासाठी मी कोर्टाकडे परवानगी मागितली असता कोर्टानेही परवानगी नाकारली.

सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असता या वृत्तपत्रांना बेजबाबदारपणे वाटेल तो मजकूर प्रसिद्ध करून 'कंटेम्प्ट ऑफ द कोर्ट' केलेला आहे. या वृत्तपत्रांविरूद्ध कोणती कारवाई केली गेली आहे? केली गेली नसल्यास कोणती कारवाई केली जाणार आहे?

प्रत्येकवेळी व्यक्तिगतपणे कोणावर खटला भरणे आमच्यासारख्या सामान्य माणसांना शक्य आहे काय? न्यायालयाची बुज राखणे ही आमची जबाबदारी की सरकारची?

### प्रश्न तिसरा

हायकोर्टाने एकदा आम्हाला जामीन दिला असताना त्या काळात आम्ही दोघे पळून गेलो नव्हतो वा साक्षीदारांना फोडण्याचा प्रयत्नही आम्ही केला नव्हता. तरीही पुन्हा जामीन देण्यास स्पेशल कोर्टाने, सेशन्स कोर्टाने, हायकोर्टाने आणि सुप्रीमकोर्टानेही नकार दिला. हे न्यायाचे नी निःपक्षपातीपणाचे लक्षण आहे की न्यायाधिशांच्या पूर्वग्रहदूषित वृत्तीचे लक्षण आहे?

### प्रश्न चवथा

सुप्रीम कोर्टाने आम्हा दोघांचा जामीन अर्ज--'इतक्या किरकोळ बाबींकडे लक्ष देण्यास सवड नसल्याने' हायकोर्टाचाच निकाल कायम ठरवून फेटाळला. या देशात रकमेने मोठे असलेले नगदी खटले महत्वाचे समजले जातात? की नागरिकाचे मूलभूत हक्कासंबंधीचे खटले महत्वाचे समजले जातात?

### प्रश्न पाचवा

पहिले चार्जशीट रद्द करून नव्याने दुसऱ्यांदा चार्जशीट ठेवण्यात आले आणि त्यावर कळस म्हणजे त्यातही पुन्हा तांत्रिक दोष काढून आक्टोबर मध्ये पुन्हा तिसरे चार्जशीट ठेवले गेले. पहिली दोन चार्जशीट्स ठेवताना सरकारी वकील झोपा काढीत होते काय? एकाच आरोपाखाली तीनतीनदा चार्जशीट ठेवण्याचा हा खोडसाळपणा कशासाठी केला गेला?--केवळ कालहरण करण्यासाठीच ना?

### प्रश्न सहावा

सुमारे एक वर्ष तुरुंगात राहिल्यानंतर स्पेशल कोर्टापुढे आमचा खटला चालू होणार होता. जामीन नाकारला गेल्याने खटला संपेपर्यंत आम्हाला तुरुंगातच रहावे लागणार होते. हायकोर्टाने जामीन अर्ज फेटाळताना केस त्वरीत निकालात काढावी असा हुकूम केला होता. अशा परिस्थितीत आमच्यावरील खटला चालवण्यासाठी नेमलेल्या ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट आर. एस. पाटील यांनाच सासवडला महिन्यातले पंधरा

दिवस डेप्युटेशनवर पाठवण्यात आले.

हा बेजबाबदारपणा होता, केवळ योगायोग होता की खटला लांबवण्यासाठी केलेली युक्ती होती ?

### प्रश्न सातवा

पंधरा दिवसांच्या पोलीस कस्टडीतून मॅजिस्ट्रेट कस्टडीत रवानगी करण्यात आल्यानंतर जेलमध्ये आमच्या मित्रांनी आमची भेट घेण्यास आणि कायदेशीर बचाव करता यावा या दृष्टीने हालचाल करण्यास प्रारंभ केला. तेव्हा आम्हाला स्वतःच्या कायदेशीर बचावासाठी मित्रांची मदत घेता येऊ नये या हेतूने गृहखात्याने 'खास हुकूम' काढून आमच्या मित्रांना आमची भेट घेण्यास बंदी केली. इतकंच नव्हे तर आम्हाला केस संबंधाने घरच्या लोकांनाही काही सांगता येऊ नये म्हणून जेलचे कायदे तोडून लोकल इन्व्हेस्टीगेशन्स ब्युरोचा कॉन्स्टेबल बसवण्यात येऊ लागला. गृहखात्याने केलेली ही गैरकृत्ये म्हणजे न्यायालयाची पायमल्ली नव्हे काय ?

गृहखात्याच्या या बेकायदेशीर कृत्याविरुद्ध आम्ही कोर्टाकडे तक्रार केली असता कोर्टाने 'आपण याबाबत काहीही करू शकत नाही.' असे उत्तर दिले. मग मॅजिस्ट्रेट कस्टडी या शब्दाला अर्थ काय राहतो ? तसेच जे कोर्ट आरोपींना स्वतःच्या कायदेशीर बचावासाठी पुरेसे संरक्षण देऊ शकत नाही ते त्यांचेवरील खटला तरी कसा चालवू शकते ?

### प्रश्न आठवा

पैसेवाल्या स्मगलर नी गुंडांना 'अ' वर्ग दिला जात असताना, तसेच मुंबई नक्षलवादी खटल्यात सर्व आरोपींना 'अ' वर्ग दिला गेला असताना केवळ आम्हा दोघांनाच 'अ' वर्ग का नाकारण्यात आला ? त्याचप्रमाणे मुंबई नक्षलवादी श्री. दिघे, पगार, नवलकर यांना कोर्टाने 'अ' वर्ग दिला असताना स्वतःच्या अधिकारात सरकारने तो का म्हणून रद्द केला ?

—या देशात न्यायालयीन आदेश मोठे की सत्ताधारी मंत्रिमंडळाची सूडबुद्धी मोठी.

### प्रश्न नववा

१२४ अ या कलमाला कमीत कमी सहा महिने आणि जास्ती जास्त जन्मठेप अशी शिक्षा आहे. जन्मठेप असल्याने जामीन मिळत नाही आणि दोन-दोन तीन-तीन वर्ष अंडरट्रायल म्हणून तुरुंगात रहावे लागते. जरी आजपर्यंत १३५ वर्षाच्या इतिहासात या कलमाखाली वर्षापेक्षा जास्त शिक्षा लागली नसली तरी कागदोपत्री जास्तीत जास्त जन्मठेप लिहिली असल्याने जामीन नाकारला जातो.

१२४ अ कलमाचा व गुप्त पोलीस खात्याचा उपयोग ब्रिटीश सरकार आपल्या राजकीय विरोधकांना चिरडण्यासाठी करीत असे. तेव्हा जानेवारी १९३० मध्ये लॉर्ड आर्यविनकडे महात्मा गांधींनी १२४ अ कलम व १८१८ चा रेग्युलेशन ॲक्ट ३ चा

अंमल रद्द करावा, आणि गुप्त पोलीस खाते लोकनियंत्रणाखाली आणावे अशी मागणी केली होती.

परंतु स्वतःला गांधीजींचे वारसदार म्हणवणारे काँग्रेस- सरकार १२४ अ कलमाचा व गुप्त पोलीसांचा राजकीय विरोधकांना चिरडण्यासाठी बेफामपणे वापर करीत आहे. अशा परिस्थितीत म. गांधींचा फोटो न्यायालयात लावून त्यांची बदनामी कशासाठी करण्यात येत आहे ?

**प्रश्न दहावा**

गृहमंत्रालयाच्या कुटिलबुद्धीने आणि न्यायालयीन दिरंगाईने आम्हा दोघांना निकाल लागेपर्यंत १८ महिने कच्च्या कैदेत रहावे लागले.

कैद्यांना मिळणारी सूट लक्षात घेता दोन वर्षांच्या शिक्षेएवढा काळ आम्हाला तुरुंगात काढावा लागला. हा काळ शिक्षेत धरला जात नाही वा निर्दोष सुटल्यास भरपाईही दिली जात नाही. आर्थिक नुकसान आणि मनस्ताप मात्र कमालीचा होतो. तेव्हा निर्दोष सुटणे याला काहीच अर्थ उरत नाही.

आमच्यावर बनावट केस करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध तसेच आम्हा- विरुद्ध खोटया साक्षी देणाऱ्या साक्षी- दारांविरुद्ध काय कारवाई केली जाणार आहे ? या कोणावरही केस करणे खर्चाच्या दृष्टीने आमच्यासारख्या सामान्य माणसांना शक्य नाही. तसेच पोलीस अधिकारी आणि साक्षीदार यांचे गुन्हे फौजदारी स्वरूपाचे असल्याने त्यांचेवर सरकारनेच उपाययोजना केली पाहिजे. सरकार यांचेविरुद्ध काही उपाययोजना करणार आहे काय ?

**प्रश्न अकरावा**

केवळ आणीबाणीच्या काळात वापरायचा 'स्थानबद्ध प्रतिबंधक कायदा' हे सरकार स्वतःच्या राजकीय स्वार्था- साठी आणि विरोधकांना चिरडण्यासाठी वापरते हे तर आता उघड गुपित झाले आहे. त्याचप्रमाणे सरकार कायदेशीर अधिकारांचादेखील सतत गैरवापर करते हे सत्य नव्हे काय ?

—हे जर सत्य नसेल तर जामीनावर असताना साप्ताहिक 'माणूस' तर्फे १४ एप्रिल ७२ ला कृषिविद्यापीठ चळव- ळीचा रिपोर्ट घेण्यासाठी मी गेलो असताना औरंगाबादहून मला हद्दपार कशासाठी करण्यात आले ? मी कोण- त्याही राजकीय संघटनेत नव्हतो. औरंगाबाद येथे कोणाही राजकीय कार्यकर्त्याला मी ओळखत नव्हतो. तसेच कृषिविद्यापीठ चळवळ सुरू होण्या- आधी दहा महिने मी तुरुंगात होतो. तेव्हा त्या चळवळीशी माझा दूरान्वयेही संबंध नव्हता. माझ्यावर अहोरात्र पोलिसवॉच ठेवण्यात आलेला होता आणि मी साप्ताहिक 'माणूस'चा प्रतिनिधी म्हणून औरंगाबादला जाणार असल्याची माहिती सरकारजवळ होती. अशा परिस्थितीत मी औरंगाबादला गेल्यावरच मला हद्दपार का करण्यात आले ?

—मला पत्रकार म्हणून काम करणेही

अशक्य व्हावे आणि माझी आर्थिक कोंडी व्हावी म्हणूनच ना? सदर प्रकरणी हद्दपारी हुकूमावर हायकोर्टाने स्टे ऑर्डर दिली हे खरे पण त्यासाठी श्री माजगावकरांना सहा-सातशे रुपयांचा खर्च करावा लागला आणि हद्दपारीने 'माणूस'चे व्यावसायीक नुकसान व्हायचे ते झालेच आणि म्हणूनच हायकोर्टाने दिलेल्या हद्दपारीवरील स्थगितीचा, नैतिक विजय होणे या पलिकडे काहीच फायदा आम्हाला झाला नाही. सरकारचा हेतू मात्र साध्य झाला आणि सरकारला गाडाभर अन्न असल्याने सरकारची अब्रूही नेहमीप्रमाणे गेली नाही. न्यायालये सरकारविरुद्ध निकाल देणे या पलिकडे काही करू शकत नसल्याने सरकारला न्याययंत्रणेचा काहीच धाक राहिला नसून, उघड उघड अधिकारांचा नि सत्तेचा गैरवापर करीत सरकार लोकशाही मूल्ये सरळ सरळ पायदळी तुडवीत आहे.

**प्रश्न बारावा**

आमच्यावरील खटला राजकीय होता. पाठीशी चार पुढारी आणि प्रतिष्ठीत मंडळी उभी होती. वृत्तपत्रांचे खटल्याकडे लक्ष होते. मोठ मोठे वकील दिले गेले होते. तरीसुद्धा दीड वर्ष एवढा काळ सरकारने आम्हाला तुरुंगात सडवले. मग ज्यांना कोणाचाही आधार नाही, ज्यांना पैशाची ऊब नाही त्यांची काय अवस्था होत असेल? दोन उदाहरणंच देतो

तिहार जेलमध्ये एका वेडसर आणि अनाथ बाईला किरकोळ गुन्ह्याखाली अटक करण्यात येऊन, कोणी जामिनदार न मिळाल्याने तिला तुरुंगात टाकण्यात आले आणि ज्या गुन्ह्यासाठी तिला फार तर वर्ष सहा महिन्यांची शिक्षा होऊ शकली असती त्या गुन्ह्यासाठी तिला दहा वर्षे म्हणजे जवळ जवळ जन्मठेपेएवढा काळ 'अंडरट्रायल' म्हणून तुरुंगात ठेवण्यात आले.

बिहार जेलमध्ये कागदपत्रे हरवली या कारणास्तव एका तरुण कैद्यास पाच वर्षे इतका दीर्घकाळ 'अंडरट्रायल' ठेवण्यात आले होते. या दोन्ही अगदी अलीकडे उघडकीस आलेल्या गोष्टी आहेत.

स्वतःच्या बेजबाबदार आणि हृदयशून्य कारभाराने नागरीकांचे जीवन मातीमोल करणारी अशी आमची न्याययंत्रणा! दीर्घकालावधी घेणाऱ्या, अत्यंत खर्चिक नि महागड्या न्यायालयीन चरकात सामान्य नागरीक चिरडला जात आहे, न्याय मिळाला तरी तो न्याय मिळाल्याचा आनंदच होत नाही. आणि आमचे सत्ताधारी तर लोकशाही शासन व्यवस्था म्हणजे गाजराची पुंगी समजतात. वाजली तर वाजली नाही तर मोडून खाल्ली. सर्व सामान्य व्यवहारात लोकशाहीचा मुखवटा चढवलेले हे सरकार जेव्हा त्यांना गैरसोयीचे होते तेव्हा सरळ सरळ लोकशाही पायदळी तुडवते आणि ज्या व्यक्तीकडे यांची स्वतःची वक्रदृष्टी जाते त्याला बेलगाम सरंजामशाहीच्या पायाटात चिरडून टाकते.

तेव्हा वाचकहो तुम्हीच विचार करा, या देशात लोकशाही आहे काय?

□ □ □

# बर्वे-पायगुडे खटला आणि मी

ॲडव्होकेट मधुकर परांजपे

महाराष्ट्र शासनाच्या सी. आय. डी. विभागाच्या पुणे येथील खास विभागाचे सबइन्स्पेक्टर प्रमोद दादासाहेब प्रभू यांना चोवीस मे १९७१ रोजी गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली. भारत सरकारने बंदी घातलेले काही वाङ्मय आणि राजद्रोहास चिथावणी देणारं वाङ्मय, अनील सदाशिव बर्वे आणि काशीनाथ पंढरीनाथ पायगुडे यांच्याकडे आहे, अशी ही बातमी.

बातमी हाती मिळताच पोलीस यंत्रणा तत्परतेने कामास लागली आणि साऱ्या महाराष्ट्रभर गाजलेला, खळबळजनक, वृत्तपत्रांनी 'नक्षलवादी पत्रकांचा खटला' असं नाव दिलेला खटला यातून उभा राहिला. २४ मे १९७१ पासून ते खटल्याच्या निकालाच्या तारखेपर्यंत ५ जानेवारी १९७३–या खटल्यानं महाराष्ट्रभर अनेक कारणामुळे प्रसिद्धी मिळवली. पुण्याचे फौजदारी कोर्टातील एक अभ्यासू वृत्तीचे न्यायमूर्ती र. म. पाटील यांनी दोन्ही आरोपींना निर्दोष ठरवून सोडून दिले. मोजक्या आणि अर्थपूर्ण शब्दात, पोलिसांनी या खटल्याचे कामी केलेल्या कामगिरीचा उहापोह करून त्यांच्याकडून करण्यात आलेल्या पुराव्यास अविश्वासार्ह ठरवले.

या खटल्याशी आरोपी अनील बर्वे याच्या वतीने काम पहाण्याचं माझ्याकडे जे काम आलं, तेही काहीसे अचानकपणे. 'माणूस'चे संपादक माजगावकर माझे स्नेही. जानेवारी १९७२ मध्ये केव्हातरी ते मला भेटले व सहज या खटल्याबद्दल आम्ही बोललो. वृत्रपत्तांतून तोपावेतो जे काही वाचलेलं, एवढीच दोघांचीही माहिती. मी या खटल्याचं काम पहावं असं त्यांनी सुचवलं. त्या खटल्याची नीटशी माहिती नव्हती आणि नक्षलवाद्यांशी माझे वैयक्तिक विचार मुळीच जुळणारे नाहीत. या दोन्ही अडचणी मी त्यांना सांगितल्या. ह्यावर माजगावकर म्हणाले –त्यांच्या विचारांशी मीही सहमत नाही. परंतु बराच काळ ते दोघेही तुरुंगात आहेत. बर्वे माझे लेखकही आहेत.



ॲडव्होकेट मधुकर परांजपे

एक सामाजिक बाब व लोकशाहीचे आचरण या दृष्टीने मी या खटल्याकडे पहातोय. दोनचार दिवसात ठरवू असं मी म्हणालो. नंतर कागदपत्र पाहिले व वकीलपत्र घेण्याचं ठरविण्यापूर्वी तुरुंगात जाऊन बर्वेंची गाठ घेतली. 'खटल्यातील पत्रकात जे अतिरेकी विचार आहेत, ते वैयक्तिकरीत्या मला मान्य नाहीत. डावे अतिरेकी किंवा उजवे अतिरेकी यांची भूमिका व्यक्तिशः मला कधीही मान्य होण्यासारखी नाही. तुमच्या विचारांशी मिळतेजुळते विचार असलेल्या कुणा वकीलांनी हे वकीलपत्र घेतलं तर पहा.' असं मी सुचवलं परंतु बर्वेंना हे म्हणजं तितकंसं पटलं नाही. मीच खटला चालवावा, असं ते म्हणाले. तेव्हा त्यांचे राजकीय विचार मला अजिबात पटण्यासारखे नसतानाही, केवळ बर्वेंना न्याय मिळवून देण्याचे कामी जी काही वकील म्हणून मदत करता येईल ती देण्याचं मी मान्य केलं. वस्तुतः आरोपीच्या विचारांशी त्याच्या वकीलाचा फारसा संबंध नसतो. परंतु राजकीय खटल्यात समविचाराचे वकील भेटणे आरोपीच्या दृष्टीने चांगले, असे मला वाटत होते.

## नागमोडी वाटचाल

या खटल्याची वाटचाल सुरुवातीपासून नागमोडी. खटल्याचे कामी २४ मे १९७१ पासून पोलिसांनी तपास करून ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट झाहेदी, यांच्या कोर्टात चार्जशीट पाठवले. त्यांनी हा खटला सेशन्स कोर्टात पाठवला. सेशन्स कोर्टाचे म्हणणे सेशन्स कोर्टात खटला पाठविण्याचा जो ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटनी हुकूम केला आहे, तो कायद्याप्रमाणे बरोबर नाही. सेशन्स कोर्टाने हे मत हायकोर्टाकडे कळवले. तेव्हा हायकोर्टाने ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटचा हुकूम रद्द केला व सरकारने योग्य कारवाई करावी असे म्हटले. परंतु सरकार बरेच दिवस काही करेना. आरोपींच्याविरूद्ध कोणत्याही कोर्टात खटला नाही, आणि आरोपी मात्र तुरुंगात. चमत्कारिक घटना होती ती. तेव्हा आरोपीतर्फे हायकोर्टात हेबीअस

कॉर्पस्चा अर्ज करण्यात आला. हायकोर्टाने दोन्ही आरोपींना हजार रुपयाच्या जामीनावर सोडले. त्यानंतर मात्र सरकार खडबडून जागे झाले. त्यांनी न्यायमूर्ती र. म. पाटील यांची खटला चालविण्यासाठी खास अधिकार देऊन नेमणूक केली. तेव्हा त्यांच्यापुढे एप्रिल ७२ मध्ये नव्याने आरोपपत्र दाखल करण्यात आले. पुन्हा एकदा सरकारतर्फे अर्ज देण्यात आला की खटल्याला सार्वजनिक महत्त्व आहे, आरोप फार गंभीर आहेत, कडक शिक्षा होण्यासाठी खटला सेशन्स कोर्टापुढे चालवण्यासाठी पाठवावा. आरोपीतर्फे आम्ही या अर्जाला कसून विरोध केला. सरकारचा अर्ज नामंजूर झाला. त्यानंतर साक्षीपुरावे घेण्यास प्रत्यक्ष २२ ऑगस्ट ७२ ला–धरपकडीनंतर एक वर्ष तीन महिन्यांनी–सुरुवात झाली. एकूण चौदा साक्षीदार तपासल्यानंतर सरकारच्या चूक लक्षात आली की ज्या पद्धतीने (Procedure) खटला चालविण्याची आवश्यकता होती, ती पद्धत अवलंबिली नव्हती. पुन्हा अर्ज, पुन्हा त्याची चौकशी. नंतर नव्याने चार्ज ठेवण्यात आला. पुन्हा ते सर्व १४ साक्षीदार बोलावण्यात आले. अशी नागमोडी वळणे घेतघेत खटला चालला.

सदाशिव पेठेतील बालबोध मुद्रणालयात सबइन्स्पेक्टर प्रभू यांनी तारीख २४ मे १९७१ रोजी छापा घातला त्यावेळी त्यांना छापखान्यात एका केबीनचेवर अडगळीत एका रद्दी कागदात गुंडाळलेली १४५ पत्रके सापडली व त्या लाल शाईने छापलेल्या पत्रकात तरुणांना सशस्त्र क्रांती करण्याचे आवाहन होते, अशी सरकारची बाजू, हा छापखाना पायगुडेंच्या मालकीचा, त्यांनी ती छापली. अनील बर्वे स्वतःचं ‘ रणांगण ’ पाक्षिक या प्रेसमध्ये छापून घेत असे. त्यामुळे बर्वे–पायगुडेंचा परिचय. बर्वेनी मजकूर चार कागदावर लिहिलेला-टाईप केलेला आणून दिला. २२ मे १९७१ ला रात्री छापखान्याचे दरवाजे लावून पायगुडेंनी पत्रके छापली. त्यावेळी बर्वे तेथे हजर. शिवाय साक्षीदार वैजनाथ रघुनाथ क्षीरसागर यानेही तेथे हजर राहून पत्रक कंपोज करण्यास मदत केलेली. ही पत्रके छापून झाल्यावर ती पुण्यात ठिकठिकाणी चिकटवण्याची बर्वेनी तयारी केली होती व त्यासाठी सुहास गणेश समुद्र या साक्षीदाराशी बर्वेनी बोलणंही केल होतं. ही सारी सरकारी बाजू. दोन्ही आरोपींवर त्या आधारे भारतीय दंडविधान कलम १२४ अ (सरकारविरुद्ध अप्रीति फैलावणे), १५३ अ (वेगवेगळ्या वर्गात बेदिली माजवून असंतोष निर्माण करणे), १२० ब (वरील दोन्ही गोष्टी करण्यासाठी कट करणे) आणि अगर अथवा, ३४ (संगनमताने वरील गुन्हे करणे) असा आरोप ठेवण्यात आला होता. याशिवाय पायगुडे याच्याविरूद्ध प्रेस अँड रजिस्ट्रेशन अॅक्टखाली काही मामुली स्वरुपाच्या गुन्ह्याचाही आरोप होता.

### मूले कुठारः

दोन्ही आरोपींची बाजू अशी की

सारा खटलाच बनावट आहे. काहीतरी फार मोठा खटला आपण केला, असं दाखविण्याच्या पोलीसांच्या खटाटोपातून या खटल्याचा उगम झाला. बर्वेचं म्हणणं की संबंधीत पत्रकांशी माझा काहीच संबंध नाही. पायगुडेचं म्हणणं माझ्या प्रेसमध्ये ती छापलेली नाहीत व माझ्याकडे ती सापडलीही नाहीत.

दोन्ही आरोपींनी अशी मूले कुठार: भूमिका घेतली. त्याचा परिणाम असा झाला की सरकारपक्षावर सारंसारं शाबीत करण्याची जबाबदारी येऊन पडली. त्यात सरकारला अपयश आलं. अशा खटल्यात कुठल्यातरी पक्षाला अपयश पदरी घ्यावंच लागतं, कारण दोन्ही बाजूचा असा काही निकाल होऊ शकत नाही.

परंतु अशा खटल्याचे निमित्ताने काही प्रश्न निर्माण होतात. लोकशाहीत अशा प्रश्नांची चर्चा करणे केव्हाही स्वागतार्ह. माझ्या स्नेह्यांनी आणि परिचितांनी अनेकविध प्रश्न उपस्थित केले. आता यापुढे काही काळ या प्रश्नांची जाहीर चर्चा होत राहीलच.

ज्या पत्रकांच्या संदर्भात हा खटला उभारला गेला, त्या पत्रकात एक वाक्य असं होते–'सट्टेबाज, काळाबाजारवाले, सावकार व पोलीस यांच्याविरूद्ध शस्त्र उचला' या ओळीचा आधार घेऊन दोन्ही आरोपींविरूद्ध भारतीय दंडविधान कलम १५३ अ प्रमाणे असा आरोप ठेवण्यात आला की–'सट्टेबाज व बिगरसट्टेबाज, काळाबाजारवाले व काळाबाजार न करणारे आणि सावकार व बिगरसावकार, पोलीस व जे पोलीस नाहीत ते अशा दोन प्रकारच्या वर्गात द्वेषभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.'

हा आरोप इतका हास्यास्पद होता की त्याचे समर्थन करणे सरकारला फार अवघड होते. आरोपींतर्फे मी एक मूलभूत मुद्दा याबाबत असा उपस्थित केला, की काळाबाजारवाले किंवा सट्टेबाज हे काही वर्गच होऊ शकत नाहीत.कारण कालचा काळाबाजारवाला हा कदाचित् आजचा सज्जन व उद्याचा आमदारही असू शकेल. दुसरं असं की काळाबाजारवाले आणि सट्टेबाज यांच्याविरूद्ध मी प्रचार केला, तर शहाण्यासुरत्या सरकारनं उलट माझी पाठ थोपटायला हवी. इथं तर खटला भरला जातो. सट्टेबाजांच्याविरूद्ध अगर काळाबाजारवाल्यांविरूद्ध प्रचार करण्यास सरकारनं आधी कायद्यानं बंदी घालावी व मग असले आरोप करावेत. या युक्तिवादास सरकारजवळ काही चांगलं उत्तर अखेरपर्यंत सापडलं नाही. निकालपत्रात हे कोणतेही वर्गच नव्हे, या कारणास्तव दोन्ही आरोपींना या कलमाखाली निर्दोष ठरवण्यात आलं.

## सत्तेकडे सत्ता

प्रचलित सरकारविरुद्ध अप्रीती निर्माण करणे व भिन्न वर्गात द्वेषभाव पसरवणे या दोन्ही गुन्ह्यांबाबत पूर्वी कायद्यात अशी तरतूद होती की सरकारात मंजुरी दिल्याशिवाय पोलीसांना असा खटला भरता येत नसे. म्हणजे शासनात अत्यंत वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत विचार करून

संमती द्यावयाची. परंतु आता तर नुकत्याच केलेल्या दुरुस्त्यांमुळे जिल्हाधिकाऱ्यासदेखील असा खटला भरण्याबाबत मंजुरी देता येईल. त्यासाठी शासनांतील अत्यंत उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांची विचार करण्याची आवश्यकता नाही. पुण्यामुंबईसारखे महत्वाचे जिल्हे सोडले, तर जिल्हाधिकारी हा त्या मानाने कमी अनुभवी असा असतो. तेव्हा अशा प्रकारचे महत्वपूर्ण खटले भरण्याबाबत निर्णय घेण्याचे जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवणे निश्चितच चांगले नव्हे. कारण चालू राजकीय परिस्थिती




आणि लोकशाहीस अभिप्रेत असलेले उच्चारस्वातंत्र्य दोही गोष्टींचा विचार करूनच अशाबाबतचे निर्णय घ्यावयास हवे. अन्यथा किरकोळ भाषणांवरून व लेखावरूनही ओढून ताणून असे खटले भरता येतील. भारतीय दंडविधानात असलेल्या या ध्येयाचा उपयोग विरोधकांतर्फे केला जातो, तो खरा ठरण्याची शक्यता वाटेल. अनेकदा किरकोळ बाबीवरून क्षोभ होतो व त्यावेळी कुणी काही बोलले अगर लिहिले, तर त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणे हे देखील जनहिताचे ठरू शकते. परंतु त्याचे भान अनुभवी अधिकाऱ्यांना एखादवेळ रहाणार नाही. यासाठी जरी जिल्हाधिकाऱ्याकडे अशा खटल्यांना मंजूरी देण्याचे कायद्यात नव्याने कलम घालण्यात आले असले, तरी जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत सूचक असे मार्गदर्शन संबंधीत मंत्र्यांकडून अगर एखाद्या स्वतंत्र कमिटीकडून होणे अत्यावश्यक आहे.

## जामीनाचा विचार

या खटल्याचे निमित्त ने आणखी एक प्रश्न सामोरा आला आहे. भारतीय दंडविधान कलम १२४ अ प्रमाणे ज्याचेवर आरोप ठेवण्यात आला आहे, त्यास गुन्हा शाबीत झाल्यास जन्मठेपेची किंवा कितीही शिक्षेची किंवा तीन वर्षेपर्यंत आणि दंडाची शिक्षा देण्याची कायद्यात तरतूद आहे. कायद्यात जन्मठेपेची तरतूद असल्याने, या गुन्ह्याचा आरोप ज्याचेवर आहे, त्यास जामीनावर सहजासहजी सोडले जात नाही.

अनील बर्वे, पायगुडे यांना जामीनावर सोडणेसाठी थेट सुप्रीम कोर्टापर्यंत प्रयत्न करण्यात आले. परंतु जामीनावर सोडण्यात आले नाही. अखेरीस दीड वर्षानंतर दोघांनाही निर्दोष सोडण्यात आले. पर्यायाने अर्थ असाच होतो ना, की गुन्हा केला नसला तरी तुरुंगवास घडतोच. या प्रकरणी लोकसभेपुढे प्रश्न आला पाहिजे. ज्यांच्या उद्गारामुळे अगर लेखामुळे प्रत्यक्ष चिथावणी मिळून शांततेचा भंग झाला असेल, त्या गुन्हेगारांना जामीनावर न सोडणे मी समजू शकतो. परंतु भाषेच्या गैरवापरामुळे जर एखादा खटला निर्माण झाला असला तर त्यास जामीनावर सोडण्याची जरूर तरतूद हवी बर्वे खटल्यात जे पत्रक आक्षेपार्ह ठरविले आहे, तेच पत्रक भाषेची कुशल कामगिरी करणाऱ्या कुणा लेखकाकडे दिले, तर त्याच अर्थाचे परंतु आक्षेपार्ह होणार नाही असे पत्रक लिहिणे शक्य आहे. जेव्हा एखादे पत्रक, लेख अगर भाषण आक्षेपार्ह होऊन खटला भरला जातो, तेव्हा सारा भाषेचा खेळच असतो. एकच हकिगत रांगड्या भाषेत अननुभवी माणसाने लिहिली तर अकारण आक्षेपार्ह ठरण्याचा संभव असतो. या सर्व कारणांस्तव गुन्ह्याचे स्वरूप प्रथमदर्शनी पाहून योग्य वाटल्यास जामीनावर सोडण्याची तरतूद अवश्य हवी. फार तर आरोपीवर काही बंधने ठेवावी.

एक मात्र खरे. या खटल्याचे निमित्ताने अनेकविध दृष्टीने या कलमांकडे आणि त्याच्या अंम्मलबजावणीकडे पहाण्याची आवश्यकता विचारवंतांच्या ध्यानी आली. □ □

## खटल्यातील पत्रक

### सशस्त्र क्रांतीची तयारी करा

तरुणांनो,

सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी, प्रस्थापित भांडवलदारी व सरंजामी शासनसंस्था आणि समाजरचना मोडून काढण्यासाठी सिलोन युवकांचा आदर्श बाळगून चेअरमन माओचे विचार, चे गव्हेराचे तंत्र आत्मसात करा.

सट्टेबाज, काळाबाजारवाले, सावकार व पोलिस यांचेविरुद्ध शस्त्र उचला. अखेर राजकीय सत्ता बंदुकीच्या नळीतून जन्म घेते. वर्ग लढा प्रखर करा. क्रांतिकारी मुक्ती आघाडीत सामील व्हा.

चे गुव्हराईस्ट यूथ फ्रंट, महाराष्ट्र

# मंत्री म्हणतात- हे जनतेचे मित्र?

काशिनाथ पंढरीनाथ पायगुडे

आपल्या देशात आणि विशेषत: महाराष्ट्रात रोज कोणता तरी सण, उत्सव, पुण्यतिथी नाहीतर मंत्र्यांचा दौरा असतो. खाजगी आणि सार्वजनिक कार्यक्रमांची रेलचेल सतत चालूच. राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांवर मोर्चे, निदर्शने, संप, हरताळ होतात. बैलपोळा मिरवणुकीपासून गणपती, ताबूत, पालखीसारख्या गर्दीच्या धार्मिक मिरवणुकीपर्यंत महाराष्ट्र सरकारच्या पोलीस खात्याला काम पडत असते. त्यांचाही एक उत्सव वर्षाकाठी होतो. मंत्री बऱ्याच पेपरात पोलीस खात्यावर लेख लिहितात. दोन महिन्यांपूर्वी महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांचे लेख पेपरात लोकांनी वाचले. सार काय ? तर पोलीस हे जनतेचे मित्र होत. सेवक आहेत. त्यांचा विश्वास धरा. त्यांना कामात मदत करा. स्वातंत्र्यानंतर त्यांच्यात बदल झाला वगैरे. पण हे खरे नाही. ब्रिटिश वारसा आपल्याकडे आहे याची प्रचिती गृहमंत्र्यांना थोड्या दिवसात पोलीस खात्याने दाखवून दिली. त्यांचा एक भाचा इस्लामपूर गोळीबारात बळी घेऊन पोलिसांनी आपला खाक्या त्यांना दाखविला.

पोस्टाच्या कारभाराच्या गमती लोकांपुढे विनोद म्हणून येतात. पण त्याहीपेक्षा गमतीदार गोष्टी पोलीस खात्यात घडतात. मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बांधायची म्हणून त्या लपून राहातात. शिवाय अधिकारी 'अब्रू'ला जपून प्रकरणे दाबून टाकून लोकांपुढे येऊ देतच नाहीत. टीका केली जाते. वशिलेबाजी, लाचखाऊपणा, भ्रष्ट कारभार, गलथान व उर्मट वागणे असे हे जुनेच आरोप नव्याने करून काही उपयोग होत नाही.

६५ च्या युद्धाच्या वेळची गोष्ट. सरकारने जाहीर केले होते, 'काळा बाजार करणाराची माहिती तुम्ही पोलिसांना द्या. बंदोबस्त करू.' आमच्या काही मित्रांनी ही गोष्ट खरी मानून पोलिसांकडे धाव घेतली. संध्याकाळी या, असे सांगितले. संध्याकाळी आता रात्र झाली, सकाळी या म्हणून टोलवले.



काशिनाथ पायगुडे

येताना एकजण गिऱ्हाईक बनून जाणे भाग आहे असे सांगितले. पण सकाळी धान्यसाठा बेपत्ता आणि कोणीतरी मंत्री आल्यामुळे पोलीस पसार. बिचारा गिऱ्हाईक बनण्यासाठी खडा केलेला मित्र फुकट रोजगार बुडवून बसला.

अमेरिकन चित्रपटात चित्तथरारक प्रसंग पाहून आपल्याही लोकांत तशी ऊर्मी येणे साहजिक आहे. आमच्यावरच्या झालेल्या 'नक्षलवादी पत्रके' खटल्यात पोलीस व अधिकारी फार नाट्यमय वागणूक करीत होते. पहिल्यांदा प्रेसमध्ये आले तेच गिऱ्हाइकाचा आव आणून. बाहेर बोलावून काम छापण्याचे दर सांगा म्हणत होते. बाहेर उजेड नाही, आत या, म्हटले तर त्यांनी हातात सर्च वॉरंट ठेवले. अचानक चवदा-पंधरा माणसे आत घुसली. आतली सात माणसे ताब्यात घेऊन झडती सुरू केली. त्यांच्यात एक हिरो होता. तो कोलंबसाला अमेरिका सापडली त्या आवाजात ओरडला, 'अरे, हो सापडली, सापडली.' खरेच मी स्वत: व अनिल बर्वे १।। वर्ष या केसमध्ये अडकून बसलो. पोलिसांना न्यायालयाने चांगले झापले आहे पण आमचे नुकसान केवढे झाले.

सर्व ठिकाणी रगेलपणा चालत नाही याची पोलिसांतील काही लोकांना कल्पना असते. असे लोक तेवढे चांगले वागतात. पण बहुसंख्य आपण जितके उर्मट तितके कडक अशी समजूत करून घेत असावेत.

गुन्हेगारांशी सतत संपर्क येतो म्हणून त्यांची वृत्ती तशीच बनत असेल कदाचित. आमची केस संपूर्ण राजकीय असताना लॉकअपमधे घेणाऱ्या पोलिसाने तीनदा तोंडाचा वास घेऊन खात्री करून घ्यावी हे त्यांचा सवयीचा परिणाम की नियम म्हणून हे कळणे कठीण.

आम्हास त्यामानाने कमी त्रास झाला. कारण आमचे वॉरंट त्यांच्या हातात असायचे. पण कोर्टाने जेवण्याची परवानगी दिली असताना पाणी देता येत नाही म्हणणारा माणूस फक्त पोलिस खात्यातच पाहायला मिळाला.

# घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलाची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का ?



त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का ?

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. निरोध वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे रबरी संतति-प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत ?

**कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

# निरोध

लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक

केमिस्ट, वाणी जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

davp 71/440

दोन दोनदा जेलपासून गाडी कोर्टात आणून बेजबाबदारी सिद्ध करणारी माणसे दुसऱ्या कोणत्या खात्यात मिळणार नाहीत. गमतीदार माणसे बाकीच्या खात्यात असली तरी फारसे बिघडत नाही पण हे महत्त्वाचे, जबाबदारीचे खाते असल्याने लोकांनी या खात्यात चांगल्या माणसांची अपेक्षा करणे चूक नाही.

आम्हास पकडायच्या वेळी पोलिसांनी मोठा ताफा आणला होता, पाच सहा मोटारी व जसे काही चकमक उडणार असे वातावरण असल्याचा भास तयार केला होता. उगाच कोणाला तरी धोपटायचा हा एक प्रयत्न पण तो बेमालूम नाट्यमय ठरायला हवा ना! तो प्रयत्न त्यांचे अंगाशी आला ही गोष्ट वेगळी. याशिवाय आम्हास बचाव करता येऊ नये म्हणून लोकात दमदाटी व घाबरवून सोडणे वगैरे प्रकार करावे लागले. लोक काय घाबरणारच. खरे लोकांना कळायला मार्गच नव्हता. वर्तमानपत्रात जोरदार बातम्या टाकून दिल्यावर लोक चार हात दूर राहतील नाहीतर काय करतील? अंधेरी नगरीच्या दुष्ट न्यायाप्रमाणे चोर रोडका म्हणून गुबगुबीत संन्याशाला फाशी द्यायची रीत ठीक ठरावी, म्हणून प्रचार चालूच. पोलिसांना जर सत्य माहित होते तर त्यांनी अशी पत्रके लावतानाच नक्षलवादी विचारांच्या माणसांना पकडणे कठीण नव्हते. पुण्यात व पुण्याबाहेर पत्रके लागली. कोणी सापडेना. अधिकारी कनिष्ठांवर भडकले असतील. कनिष्ठ काय हुशार माणसेच. त्यांनी खुशाल वरिष्ठांना चुकीची माहिती व खोटे रिपोर्ट दिले आणि खात्री न करता अधिकाऱ्यांनी नेहमीप्रमाणे हुकूम सोडले असावेत.

एक खोटे पचवायला दुसरा खोटारडेपणा करावा लागतो या न्यायाने पुढे मग पंच आणि साक्षीदार तसेच कोर्टातील कामकाजाचे डावपेच सगळाच व्यवहार खोटा करावा लागला. एकाच गुन्ह्याबद्दल दोन वेळा अटक, तीन वेळा चार्जशीट ठेवावे लागले. खटला जितका लांबविता येईल तितका लांबवला. साक्षीदार मिळत नाहीत अशी खोटी बतावणी केली. शेवटी आरोप सिद्ध करता येईना म्हणून आम्हास न्यायच मिळू न द्यायचा प्रयत्न. निकालास जेवढा वेळ होईल तेवढा बरा. म्हणजे आम्ही निर्दोष असताना केवळ पोलिसांचे डावपेचामुळे आम्ही अडकून राहिलो. न्याय नाकारण्याचा अधिकार पोलिसांना कसा मिळू शकतो? सरकार तर सरकारच. गृहमंत्री म्हणतात हे जनतेचे मित्र. मग लोकांनी म्हटले की, परमेश्वरा या मित्रापासून वाचव, तर ते चूक ठरेल काय?

□ □ □



# जबानी चौथी । शेवटची
## हप्ता तिसरा

लेखक : नारायण सान्याल
अनुवादक : अशोक शहाणे

ड्रायव्हरला अनेक तास थांबायला सांगून मी निघालो. पाठोपाठ सुभद्रा. बरोबर कुऱ्हाड घ्यायला मी विसरलो नव्हतो. पिकाडो झाडालगतनं एक बारकीशी पायवाट चढत चढत आंग्रेशू टेकडीच्या माथ्यावर गेली होती. त्या पायवाटेनंच जात राह्यलो. सुभद्रा माझ्या मागं मागं येत होती. रायफल हातात धरून. दरम्यान कृष्णपक्षाचा चंद्र उगवला होता. वैशाख कृष्ण सप्तमी. पानांनी भरलेली रानातली पायवाट.

रस्त्यापास्नं शंभरेक गज आत आलो असेन. एवढ्यात लक्षात आलं की आपल्या मागं काही पावलांचा आवाज येत नाहीय् ! मी वळून उभा राह्यलो. थोडावेळ वाट पाह्यली. नाही, सुभद्रा काही येत नाहीय् ! काय झालं तरी काय ? कुठं गेली सुभद्रा ? परत माघारी जावं लागलं.

दहाबारा पावलं गेल्यावर सुभद्रा दिसली. पायवाटेच्या कडेला एका दगडावर बसली होती ती. दोन्ही हातांनी तोंड झाकून. रडत होती. स्फुंदून स्फुंदून रडत होती !

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय्

मी पुरता चाट पटलो. काय करावं काय बोलावं—काहीच सुचेना पण सुभद्रा तरी असं का करतेय् ? तिच्यावर आपण हुकूम गाजवला म्हणून ? पण आपण तरी काय करणार ? काय इलाज होता ? त्या अनोळखी ड्रायव्हरपाशी तिला सोडून कसं येणार ?

आवाज शक्य तितका गोड करून मी हाक मारली—सुभद्रादेवी !

एकदम धनुष्यानं सोडलेल्या बाणासारखी सुभद्रा बाजूला सरली. चेहऱ्यावरचे दोन्ही हात बाजूला आले.

तिचा चेहरा काय सुंदर दिसत होता. पावसानं न्हालेल्या कमळाच्या फुलासारखा ! तिनं डोळे विस्फारून माझ्याकडं पाह्यलं. चांदण्यात आसवांनी भिजलेल्या त्या चेहऱ्यावर राग नव्हता, अनुराग नव्हता की काही खळबळाट नव्हता भावनांचा. वेदनेनं आर्त, करुण दिसत होती ती.

ओठ थरथरले तिचे. अस्फुट स्वरात ती म्हणाली--निष्ठुर आहेस तू ! रानटी !

आश्चर्यचकित होऊन मी म्हणालो, पण मी तरी काय करू सांग ! काही इलाजच नव्हता दुसरा ! म्हणून तर तुला त्रास द्यावा लागतोय् थोडासा !

--तू !...तू माझी सगळी स्वप्नं आकांक्षा मारून टाकल्यास आज !

आता मात्र मी चांगलाच घाबरलो.

--म्हंजे ? काय म्हणतेय्स काय तू ?

ती धावत माझ्याजवळ आली. माझ्या शर्टाची कॉलर धरली तिनं. मला गदागदा हलवायचा प्रयत्न केला. अन् तीच गदागदा हलली. तिची बिचारीची काय चूक ? कितीही राग आला असला म्हणून काय झालं माझ्यासारख्या डोंगराला हलवायचं म्हंजे झटके बसणार ! पण ही अशी चिडली काय म्हणून इतकी ?

--पण तू असं काय करतेय्स सांग बरं ?

--तू जनावर आहेस नुस्ता ! पशु !

--मान लिया ! कबूल आहे ! मी जनावर आहे, पशु आहे ! पण तू तर शहाणी मुलगी आहेस ना ? अशी फुलासारखी सुंदर ? तू का म्हणून--

--बस ! खूब ! आणखी प्रशंसा करायचं काही जरूरी नाही. हुकमाच्या जोरावर तू मला जंगलात घेऊन आलायस. मी पाळलाय् तुझा हुकूम ! आता काय करू तेवढं सांग ? अंगावरचे कपडे काढू ?

ह्याय गुरु नानकजी! ह्याय गुरु गोविंदजी! आता मात्र मीच बसलो त्या दगडावर. जिथं दोन मिनिटं आधी सुभद्रा बसली होती. म्हंजे तिला वाटतंय् मी माझी पाशवी कामना पुरी करण्याकरता तिला खेचून आणलं ह्या जंगलात! ते फिकट चांदणं, ते निःस्तब्ध अरण्य, त्या अपूर्व सुंदर तरुणीचं कुमारी सौंदर्य—सगळं म्हंजे सैतानानं केलेली थट्टा वाटायला लागली मला!

—तुला खरं वाटायचं नाही हरगोविंद! एके दिवशी तू जसं स्वतःचं सर्वस्व वाहून टाकलंस नेताजींच्या पायावर, तसंच मी पण आपलं सर्वस्व तुझ्या पायी वाहून टाकायची स्वप्नं बघत होते! ती माझी स्वप्नं पार मातीला मिळवलीस तू! जबरदस्तीनं मला घेऊन आलास आपली पाशवी कामना पुरी करण्याकरता!

—बस्! चुप रहो!

मी उठून उभा राह्यलो. माझं ते रूप बघून भीतीनं सुभद्रा एवढीशी होऊन गेली. कमरबंदातनं मी कृपाण बाहेर काढलं. चमकून ती एक पाऊल मागं सरली. तिला किंकाळी फोडायची होती. पण तिच्या तोंडातनं आवाजच बाहेर फुटेना. नंग कृपाण वर आकाशात धरून मी प्रतिज्ञा केली—सुभद्रा! गुरू गोविंदजींच्या नावानं शपथ घेऊन सांगतो—आज रात्री तुझ्या अंगाला हात लावला तर हा हरगोविंदसिंग खालसा शिखाची औलादच नाही!

तिचे डोळे प्रचंड विस्फारले. आश्चर्यानं तिच्या तोंडून शब्दच फुटेना. कसंबसं ती म्हणाली— म्हंजे?

नाईलाजानं सगळीच कहाणी तिला खुलासेवार सांगावी लागली. सेनापतींच्या हुकमासकट. सगळं सांगून झाल्यावर मी तिला म्हणालो— शपथ घे, आज रात्री घडलेलं कधी कुणाला सांगणार नाही म्हणून!

रणांगणावर किती अद्भुत दृश्यं बघत आलो जिंदगीभर. पण सगळ्यात आश्चर्यकारक वाटली ती ही एकच चीज. हा जीव. ब्रह्मदेवाची ही सजीव निर्मिती. स्त्री!

माझ्या बोलण्यानं ही सुभद्रा आतातरी खूष व्हायला हवी होती का नाही? खूष न् शांत? तर नाही!—चक्क ओक्साबोक्शी रडायला लागली पोरगी! आता ह्याच्यात रडण्यासारखं काय आहे बुवा?

मी आपलं सरळ विचारलं—आता काय झालं आणखी? परत कशाला रडतेस?

आसवांनी डबडबलेले आपले मोठाल्ले डोळे उलटया हातानं पुसून घेऊन मग सुभद्रा म्हणाली— आधी क्षमा केली म्हण!

मला हसू लोटलं. मी म्हणालो—चूक ही चूकच! ह्या माझ्या चेहऱ्यामुळंच तुझी तशी समजूत झाली! तुला वाटलं, हा राक्षस आहे! तेव्हा गलती काही तुझी नाही. गलती झालीय् देवाची! ज्यानं मला हा खानदानी चेहरा दिला ना कृपावंत होऊन, त्या देवाची! तुझी काहीएक चूक नाही!

पण माझ्या ह्या थट्टेवर सुभद्रा हसलीदेखील नाही !

रात्री तीनच्या आत काम उरकून आम्ही परतलो. आंग्रेशू टेकडीच्या माथ्यावर एक प्रचंड चिता तयार करून ठेवून आलो. एवढ्या प्रचंड चितेवर कुणाला जाळायचंय्, एक गुरुजीच जाणोत ! जाताना न् येतानाही वाटेत कुणीच दिसलं नाही. ह्या टेकडीवर कुणीच रहात नव्हतं आता. फुंगी चंग देखील परित्यक्त, निर्जन ! आमच्या रणांगणाच्या बरोब्बर मधोमध पडते की ही टेकडी !

मला अजून आठवतंय्, परतताना सुभद्रेनं मला अचानक थांबवलं. मी थांबलो. माझ्याजवळ येत ती म्हणाली– आजच्या रात्रीची घटना पुरती विसरून जा असं तू म्हणालास, पण ते काही मला जमायचं नाही.

मी तिला मधेच अडवलं. म्हणालो– बघ ! परत चित् केलंस मला ! मी तसं काही म्हणालेलो नाही तुला. मी तुला ही चिता रचायची गोष्ट तेवढी विसरून जायला सांगितलं ! ती मात्र तू खरंच विसरून जा हं ! शहाणी ना तू ?

––तुला विसरून जाता येईल, मी काय घाणेरडा अपमान केला तुझा ?

दाढी खाजवत-खाजवत मी म्हणालो, अं...बहुतेक नाहीच ! कारण ह्याच्या-आधी इतका मला न मानवणारा न् घाणेरडा आरोप कुणी बाईनं कधी केलाच नव्हता ना माझ्यावर !

––पण तुला विसरावाच लागेल तो ! म्हण, मला पुरती क्षमा केली म्हणून !

––नाही नाही, क्षमा करण्याजोगं आहेच काय त्यात ? मी सांगितलं ना तुला –– ह्या सगळ्याला जबाबदार आहे माझा चेहरा ! मला बघून बऱ्याचजणांचा गैरसमज होतो. तुझा-देखील असाच गैरसमज झाला होता की आधी एकदा !

–– माझा ? ह्याच्याआधी ? कधी ?

––त्यादिवशी तुमच्या घरी मी आलो होतो तेव्हा ! मी म्हणालो, थाळीभर मिठाई काही खाता यायची नाही मला. तेव्हा तू म्हणालीस, तुमच्याा-कडं बघून तर काही असं वाटत नाही ते !

––ती गोष्ट वेगळी !

––मुळीच नाही ! ते एकच ! त्यादिवशी थाळीभर लाडू होते, अन् आजपण ––

––मी म्हंजे काय लाडू आहे वाटतं ?

आता मी हंसलो

म्हणालो––अलबत् ! सिर्फ हिल का ! खाऊनपण पस्तावा, न खाऊनपण पस्तावा !

मग तीपण हंसली.

म्हणाली––खूप बोलायला शिकला-यस की !

––चल. जाऊ या. उशीर होतोय् !

––चल. पण जायच्याआधी मला माफ केल्याचा काही पुरावा तरी देशील का नाही !

आता कोबीछाप बुद्दू म्हणून कितीही

टिंगल करा तुम्ही आमची, पण ह्या आडवळणी बोलण्यातला अर्थही समजू नये इतका काही मी बुद्दू नाही !

तरी फिकट हसून म्हणावं लागलं— तू...सुभद्रा...तू विसरलीस, मी शपथ शपथ घेतलीय् गुरुजींच्या नावानं !

एकदम ती जणू भानावर आली. दचकली. लाजून म्हणाली— चल ! उशीर होतोय् !

दोन तास जंगलात घालवून आम्ही सडकेवर आलो तेव्हा ड्रायव्हर बसल्या-बसल्या झोप काढत होता. आमची चाहूल लागल्यावर जांभई देत नीट बसला. त्याचं ते विचित्र हसणं मी विसरलो नव्हतो. वाटत होतं, एकाच लाफेत वेटचाचे दात काढून हातात द्यावेत. त्याला वाटत होतं, आम्ही जंगलात मजा मारूनच आलोय्. पण मी काही त्याला ठेवून दिली नाही. कारण नाहीतर मग त्याला आणखीच कुतूहल वाटलं असतं, की मग ह्या दोघांनी जंगलात जाऊन केलं तरी काय !

फटफटायच्या आतच आम्ही खानजोलला पोचलो.

हे मोटार-दुरुस्तीचं काम येणंच माझ्या अंगाशी आलं होतं. इतकेदिवस खानजोलला वेळ म्हंजे बिगरमिठाच्या कोबीबबटाटयाच्या भाजीसारखा वाटायचा. आता सुभद्रादेवी आल्यावर दिवस जरा रंगीबेरंगी होतीलसं वाटलं होतं. शिवाय ह्या सीफोर्थ हायलँडर तुकडीबरोबर संगिनींनी लढाया लढायचा प्रचंड उत्साह आम्हाला सगळयांनाच होता. केव्हातरी आमची जुंपणारच होती. ते अटळच होतं. आज नाहीतर उद्या.

पण कसलं काय न् कसलं काय ! तीन दिवस जतात एवढ्यांतच माझी मूवमेंट ऑर्डर येऊन धडकली. होमालीन —थयांगदात भागात माझी रवानगी झाली होती -- टामू–होमालीन–उरुखल-कोहिमा शेडवर एक नंबर इंजिनियरिंग कंपनी म्हणे अडचणीत होती. रस्ते न् पूल बांधायचं काम असायचं त्यांच्याकडे. पण ते काम त्यांना धड करता येईना. कारण माल वाहून नेणारे ट्रक्स कुचकामी होऊन पडले होते. तेव्हा घाणीबाई, घाणीबाई, तू त्या स्वर्गात जाऊन तेल गाळ जा ! रायफल नाही, मशिनगन नाही, हँड-ग्रेनेड नाही. तुझ्या हातची शस्त्रं म्हंजे स्क्रू ड्रायव्हर न् पाना. तर जा बाई, तुझ्या कुळातलं कामच तू कर !

कर्नल कियानी, प्रीतमसिंग न् सुभद्रा-देवीचा निरोप घेऊन गेलो थयागदात् भागात.

जायच्याआधी सुभद्रा म्हणाली— परत कधी भेटशील ?

—देव जाणे !

—पण लढाई संपल्यावर तरी माझी खबर घेशील का नाही ? माझ्याकरता नाही ? तरी तुझी ती ठेव तुला परत घ्यायचीय् ना ?

—कोणती ठेव ?

—तो सात लाख रुपये किमतीचा सुकलेल्या फुलांचा हार !

मी हंसून म्हणालो — कोणता ? त्यादिवशी तू दाराच्या मागं उभी राहून

आमचं बोलणं ऐकत होतीस अन् तुझ्या डोक्यात जुईचा गजरा माळलेला होता —तो ? गजरा ?

सुभद्रा थक्कच झाली. म्हणाली— तुला कसं कळलं ?

मी म्हणालो —चला, जाऊ द्यात ! इतक्या दिवसांनी काळजी मिटली ! दाराशी तू तर काही दिसली नव्हतीस, जुईच्या फुलांचा घमघमाटच तेवढा मिळाला होता. त्यामुळं त्यादिवशी माझ्या लक्षातच येईना लेफ्टनंट थीबर्स असं काय म्हणतायत ते !

—काय म्हणत होत्या जानकीताई ?

—म्हणत होत्या की, तू म्हणे त्यांना सांगितलंयस, आपण हरगोविंदसिंगच्या वाग्दत्त वधू आहोत म्हणून !

गपदिशी मला एक बुक्का घातला सुभद्रेनं. म्हणाली—फाजील आहेस तू !

—निव्वळ फाजीलच नाही, जनावर, पशू आणखीपण काय काय ! ते सगळं तू सांगितलंयस मला आधीच !

एकदम मलूल झाली सुभद्रा. म्हणाली—त्या दिवशीची गोष्ट तू विसरला नाहीस ना ? मला माहीत होतं, तुला विसरता यायची नाही ते.

अन् मी सातमजली हसलो !

नंतर तीनेक महिने मी रणांगणाच्या दुसऱ्या टोकाला होतो. टामू–होमालीन–उरुखलच्या भागात. ह्या तीन महिन्यात रायफलीला न् संगिनीला हातच लावला नाही मो. निव्वळ क्लच-गिअर-डायनॅमो दुरुस्त करत गेलो.

जुलैच्या पहिल्या आठवड्यात परत हुकूम आला की, छामोलच्या रणांगणावर हजर हो. दरम्यान तिथं बराच नवा इतिहास घडवला होता आमच्या मंडळींनी माझ्या नकळतच. सी-फोर्थ हायलँडर्सच्या तुकडीशी आमची प्रत्यक्ष लढाई होऊन गेली होती. लेफ्टनंट अजायबसिंगच्या नेतृत्वाखाली आमचे लोक बेहद्द शूरपणान लढले होते. दुर्दैव माझं—मी तेव्हाच डिफरन्शियल गिअर न् अ‍ॅक्सल रॉडमध्ये गुंतून पडलो होतो.

आमच्यातल्या दहाजणांनी ह्या लढाईत प्राण वेचले होते. त्यांच्याकडला जखमी न् मेलेल्यांचा आकडा पन्नासच्या घरात होता.

ह्याच सुमाराला भयंकर पाऊस सुरू झाल्यामुळं रसद न् दारूगोळा मिळणं भलतंच कठीण होऊन बसलं होतं. खाणंपिणं न् औषधं नसल्यामुळं सैनिकांच्या तब्येती प्रचंड वेगानं ढासळत गेल्या. जून मध्याच्या सुमाराला आमचे सैनिक एवढे दुबळे होऊन गेले की, गट बांधून काही थोडके मैल चालायची ताकदपण त्यांच्यात राह्यली नव्हती. इतकं होतं तरी ते माघार घ्यायला तयार झाले नाहीत. तेव्हा २०० वर्गमैलांचा टापू होता गांधी ब्रिगेडच्या ताब्यात. म्हंजे कियानींच्या अखत्यारीत. हा ताबा सोडून द्यायला काही केल्या तयार झाले नाहीत सैनिक.

अन् तरी ह्याच सुमाराला ब्रिटिशांनी नवं सैन्य विमानानं आणायला सुरुवात केली. इंफाळ न् पालेऊच्या विमानतळावर विमानानं रोजच्या रोजच सैनिक यायला लागले. बरोबर खाद्यपेयं, रसद

न् औषधं.

मित्थॉन-खुंगच्या चारी बाजूंना डोंगर होते. इतके दिवस हा सगळा डोंगराळ टापू गांधी ब्रिगेडच्या कब्जात होता. ब्रिटिशांचं पहिलं आक्रमण ह्या डोंगरांवरच झालं. ते यायचे वायव्येच्या कोपऱ्यातनं--पालेल न् पारुम-छुप्पन-कडनं. खरंतर ह्याच वाटेनं आम्ही पालेलवर हल्ला करायला तीन महिन्यां-पूर्वी गेलो होतो.

त्यांच्या हल्ल्यात भाग घेत होते तीन हजार दक्ष सैनिक. बरोबर भारी जातीच्या तोफा, डोक्यावर विमानांचं छत्र. असा ते हल्ला चढवायचे. सगळ्यात पुढं असायची तीच सी-फोर्थ हायलँडर्सची तुकडी. तिचं नेतृत्व होतं कर्नल सिप्सनकडे.

ह्या लढाईत आमच्या अवघ्या सहाशे सैनिकांना ब्रिटिशांच्या तीन हजार सैन्याशी लढत घ्यावी लागली होती. त्यांच्या बाजूनं निव्वळ आकडाच तेवढा मोठ्ठा असता तरी काही फिकिर नव्हती. पण त्यांच्याजवळची शस्त्रास्त्रं, युद्धसामग्री न् रसद पोचवायची व्यवस्था --सगळंच फार वरच्या दर्जाचं होतं. शिवाय त्यांच्याकडले बरेचसे सैनिक हे विमानानं इंफाळला नुकतेच आलेले होते. अन् आमचे जवान फारकाळ उपासमारीनं न् आजारानं इथंच पडून होते.

तरी ह्या व्यस्त लढाईतदेखील आमच्या सैनिकांनी जे शौर्य दाखवलं, ते कोणाही सैन्याला अभिमान वाटावं असंच होतं.

ब्रिटिश सैन्यानं एकदा आम्हाला जवळपास सगळीकडनंच घेरलं. छामोल न् खानजोल ह्यांच्यामधे जो रस्ता होता, तो त्यांनी कब्जात घेतला. त्यामुळं खानजोलला असलेली आमची कंपनी पुरती एकटी पडली. कर्नल कियानींना पुरतं उमजून चुकलं होतं की काहीही करून खानजोलच्या भोवतालच्या टेकड्या परत मिळवल्या पाह्यजेत, नाहीतर काही धडगत नाही. एकट्या पडलेल्या सैनिकांचं मरण अटळ आहे. म्हणून त्यांनी हुकूम दिला, एक-एक करत ह्या टेकड्या ताब्यात घ्यायच्या.

एक टेकडी घ्यायची जबाबदारी लेफ्टनंट मनसुखलालवर येऊन पडली. निव्वळ तीसजण होते मनसुखलालच्या प्लॅटूनमध्ये. अन् तोफबीफ काही नाही. निव्वळ रायफलींच्या जोरावर ह्या मूठभर सैनिकांनिशी मनसुखलालनं शत्रूवर हल्ला चढवला. अर्धपोटी सैनि-कांना घेऊन खडा पहाड चढताना एक नाही दोन नाही तेरा जखमा झाल्या मनसुखलालला. शेवटी उभं राहता येईना म्हणून मनसुखलाल जमिनीवर पडला. टेकडीच्या उतारावरनं तो गड-गडत खाली जायला लागला. आपला नायक पडतोय् असं बघून सैन्य थबकून उभं राह्यलं. काय करावं ते शिपाई-गड्यांना सुचेना.

त्यातच मनसुखलाल कोपरांवर भर देऊन उठून बसला. प्रचंड रक्त झरत होतं त्याच्या अंगातनं. ओरडून तो म्हणाला—माझ्याकडे बघत काय उभे राह्यलात तुम्ही? इकडे बघू नका!

तुमची तोंडं पुढं वळवा! बोलो भाई सब--जयहिंद!

तात्काळ असेल नसेल तेवढी सगळी ताकद एकवटून रक्तानं न्हाऊन निघालेला मनसुखलाल उठून उभा राहूचला. म्हणाला-- चला! मी काही मेलेलो नाही अजून! चला! मीपण येतोय्!

लगेच सैन्यानं परत हल्ला सुरू केला.

गोळ्यांच्या अखंड वर्षावाला न जुमानता संगिनी उंचावून त्यांना धावून येताना बघितल्यावर शत्रूच्या सैन्याची चक्क घाबरगुंडी उडाली. हातघाईची लढाई करायची हिंमत शत्रूच्या सैनिकात नव्हती. त्यामुळं आझाद हिंद सेनेच्या सैनिकांच्या संगिनींना सामोरं जाण्याऐवजी मागच्या बाजूच्या उतारावरनं त्यांनी पळ काढला.

संध्याकाळच्या मावळत्या सूर्याला साक्ष ठेवून टेकडीच्या माथ्यावर भारताचा तिरंगा मोठ्या दिमाखानं फडकायला लागला.

आणखी एका लढाईत कॅप्टन राव न् लेफ्टनंट अजायबसिंगनं मोठंच शौर्य दाखवलं. त्या चकमकीत शत्रूकडचा मेलेल्या न् जखमी सैनिकांचा आकडा अडीचशेच्या घरात जाणारा होता! अन् हे सगळे टॉमी म्हंजे गोरे सैनिक होते!

ह्या सगळ्या घटना घडल्या तेव्हा मी लढाईपासनं फार लांब होतो. तिकडं काय झालं ह्याची काहीच खबरबात मला नव्हती. निव्वळ योगायोगानं मी जुलैच्या पहिल्या आठवड्यात काही ट्रक्स घेऊन टामूहून छामोलला आलो. तेव्हादेखील छामोल म्हंजे आमचं डिव्हिजनल हेडक्वार्टर्स होतं.

पोचल्याबरोबर मी हेडक्वार्टर्समध्ये चक्कर टाकली. ताबडतोब मेजर-जनरल एम. झेड. कियानींच्या ऑफिसमध्ये माझी पाठवणी झाली. आत ते एकटेच होते. मी जाऊन सॅल्यूट केला.

--लेफ्टनंट हरगोविंदसिंग! आलास का तू!

--हो सर!

--आत्ता तुला बघितल्यावर जरा आशा वाटायला लागलेय् की अल्लानं काही आपल्याला पुरतंच वाऱ्यावर सोडलेलं नाही!

--असं का म्हणता सर?

खूप मलूल हसले सेनापति. म्हणाले, तुला माहीत आहे सरदारजी? आत्ता मी तुझीच आठवण काढली होती. एका अत्यंत महत्वाच्या न् धाडसी कामावर एकाला पाठवायला पाहूयजे. लगेच. सबंध डिव्हिजनल कमांडमध्ये तुलाच ते सोपं जाईल! अन् तू काही इथं नव्हतास. म्हणून मला तुझी आठवण आली. अन् लगेचच तू समोर दत्त म्हणून उभा!

--हुकूम फर्माइये साब!

मी थोडक्यात म्हणालो.

--हुकूम तर देतोच! पण जरा घुटमळतोय्!

--क्यों साब? क्या हुवा?

--कारण तू अकाली शीख आहेस!

मला ह्या बोलण्याचा काही शेंडाबुडखा लागेना. मी गप्पच उभा राह्यलो. मेजर-जनरल खुर्चीवरनं उठले. बेचैनीनं

तंबूच्या ह्या टोकापास्नं त्या टोकापर्यंत काही येरझारा घातल्या त्यांनी. मग परत येऊन खुर्चीवर बसले. जरावेळानं म्हणाले --नाही ! मी सगळं खुलासेवार तुला सांगतो. तुझ्यासमोर मांडतो. हुकुमबिकूम काही देत नाही. तू जर हे काम करायला नाही म्हणालास, तरी माझी काही तक्रार नाही. तर ऐक--

लढाईची परिस्थिती त्यांनी गोळाबेरीज ऐकवली मला. ब्रिटिश सैन्यानं एवढयात मित्थॉन खुंगपास्नं आंग्रेशूपर्यंतचा सबंध टापू कब्जांत घेतलाय्. त्यामुळं खानजोलला गांधी ब्रिगेडची उरलेली. जी मंडळी आहेत, त्यांचा छामोल हेडक्वार्टर्सशी काही संबंधच राह्यलेला नाही. खानजोलला आपले तीनशे सैनिक होते. आता जास्तीतजास्त पन्नासजण असतील. त्यांनी अजुनी आत्मसमर्पण केलेलं नाही. पण त्यांची परत यायची वाटपण बंद होऊन गेल्याय्. रसद तुटलेली. बिचारे खरोखरच उपासमारीत दिवस काढतायत.

--हे असे तुटून पडलेयत त्याला किती दिवस झाले सर ?

--अठ्ठेचाळीस तास !

--खानजोलच्या युनिटचं कमांड कुणाकडे आहे ? मेजर गढवालांच्याकडे ना ?

--नाही. मेजर आबिद हुसेनकडे आहे.

--म्हंजे नेताजींच्या बरोबर जर्मनीहून पाणबुडीतनं आलेले--ते आबिद हुसेन ?

--हो. तेच गढवालांच्या जागेवर आहेत ?

--म्हंजे गढवालसाहेब वारले का ?

मेजर-जनरल कियानी परत उठून उभे राह्यले. माझ्या प्रश्नाचं उत्तर त्यांनी दिलं नाही. ते बेचैन झाले होते. दुसरीच काहीतरी गोष्ट त्यांच्या डोक्यात तरळत होती. परत येरझारा घालायला लागले ते. न् नंतर एकदम ते माझ्यासमोरच येऊन थांबले. म्हणाले -- हरगोविंद तुला आठवतंय का ? दोनेक महिन्यामागं तू आंग्रेशू टेकडीच्या माथ्यावर एक चिता रचून आला होतास. आठवतं ?

--हो सर !

--पण ही चिता कशाकरता रचून ठेवायच्याय् ते तुला माहीत नव्हतं. ते कारणच मी आता तुला सांगतो. ही गोष्ट अत्यंत गुप्त आहे. आपल्या खानजोलच्या युनिटकडे काही रेडिओ रिसीविंग सेट नाही, हे तुला ठाऊकच आहे. म्हणूनच ही चिता रचून ठेवली ! ही चिता पेटलेली पाह्यली की खानजोलच्या कँप-कमांडरनं समजून चालायचं की इकडची वाट बंद झाल्याय् म्हणून. असं ठरलं होतं. मग त्यांनी दक्षिणेचा रस्ता पकडायचा. मोनाओ-मोंबीवरनं कालेवाला जायचा प्रयत्न करायचा. ही वाट फार लांबची आहे. अन् खरं वाट म्हणण्याजोगं काहीच नाही तिथं. पण त्यांना तेवढीच एक पळवाट शिल्लक आहे. काही कारणानं हेडक्वार्टरशी त्यांचा संबंध तुटला तर बहात्तर तासांच्या आतच आम्ही ही चिता पेटवून द्यायची, असं ठरलं होतं. मग ते दक्षिणेची वाट

पकडायची तयारी करतील. अन् शहाण्णव तासांतदेखील जर ही चिता पेटली नाही तर त्यांनी उत्तरेकडल्या ह्या सरळ रस्त्यानंच छामोलला यायला निघायचं — हे पण ठरलं होतं. आता सगळ्यांत मुश्कील अशी झाल्याय् की ह्या आंग्रेशू टेकडीचा माथाच आपल्या ताब्यांत राह्यलेला नाही. त्यामुळं ह्या चितेचा संकेत आपल्याला त्यांना देता येत नाहीय्. पण आपली ही अडचण त्यांना कळायला काही मार्गच नाही. म्हंजे आज-उद्या एवढ्यात जर का आपल्याला ती चिता पेटवून देता आली नाही, तर परवा ते ह्याच रस्त्यानं यायला लागतील. आपल्या लोकांनी दरम्यान हा रस्ता परत ताब्यांत घेतला असेल अशा समजुतीनंच ते यायला निघतील. अन् तरी —

सेनापती गप्प झाले. इतकं बेचैन मी त्यांना कधीच पाह्यलं नव्हतं. लढाईत काहीही झालं तरी त्यांचा धीर सुटायचा नाही. पण आज ते पुरते निराश झालेले दिसले. एकदम त्यांनी आपले दोन्ही हात हवेत वर फेकले अन् ते म्हणाले—
अल्लाला ठाऊक आहे, तसा निर्देश मला त्यांना द्यायचा नाहीय् अन् मी देतपण नाहीय् ! पण ते काही त्यांना कळायचं नाही ! गैरसमज उराशी बाळगून दोन-तीन दिवसांच्या उपाशी सैनिकांना घेऊन ते निश्चित मनानं ह्या रस्त्यानं छामोलकडे यायला निघतील. आम्ही दरम्यान ही सडक कब्जात घेतलीच असणार, असं त्यांना वाटेल ! ह्याचा परिणाम काय होईल, तुला माहित आहे हरगोविंद ? ह्या पन्नास जणांच्यांतला एकपण माणूस जिवंत राहणार नाही ! त्यांच्यात आणखी एक बाईपण आहे !

—बाई ?

—हो ! लान्सनायक सुभद्रा जयस्वाल ! तुझ्या तर माहितीचीच आहे ती !

भावनावेगानं माझं सबंध शरीर थरथर कापायला लागलं ! सव्वीस जानेवारीच्या त्या सभेतदेखील मी इतका विचलित झालो नव्हतो ! त्यादिवशी पैशाच्या जोरावर एक धनकुबेर माझ्या हातनं एक हार हिसकून घ्यायला बघत होता ! अन् आज निव्वळ अंगच्या बळावर आणखी एक फुलांची माळ हिसकून घ्यायला पहातायत हे सी-फोर्थ हायलँडर्सचे गोरे सोजीर ! पन्नासातल्या एकूण पन्नास जणांना मारायला पाहतील ते ! अन् उरलेल्या एकाला—खरं तर एकीला जिवंत पकडायला पाहतील !

—सरदारजी तुला जमेल ती चिता पेटवून देणं ? रस्ता तर फक्त तुलाच ठाऊक आहे ! अर्थात् तूर्त तोपण सी-फोर्थ हायलँडर्सच्याच ताब्यात आहे म्हणा ! पण तरी जमलंच तर तुलाच जमेल हे काम ! करतोस ?

—जान कबूल सर !

परत एकदा मलूल हसले मेजर-जनरल. बसले खुर्चीवर. म्हणाले—
निव्वळ जान देऊन भागणार नाही सरदारजी ! माणसापेक्षा आणखी काही-तरी द्यावं लागेल तुला !

मी आपला अडाण्यासारखा बघत

राह्यलो.

मग मेजर जनरल कियानींनी मला सगळा प्रकार समजावून सांगितला.

योगायोगानं आजच छामोलला तीन ब्रह्मी चंग म्हंजे भीक्षू आलेय्त अन् त्यांनी आपल्याचकडे आसरा घेतलाय्. आंग्रेशू टेकडीवरचा पॅगोडा बाँबनं उद्ध्वस्त झाल्याला कितीतरी दिवस झालेय्त. ते भीक्षू आलेय्त त्या उद्ध्वस्त पॅगोडयाच्या गाभाऱ्यातनं देवाची मूर्ती सुरक्षित स्थळी घेऊन जायला म्हणून. आपण तुम्हाला सगळी मदत करू असं कियानींनी त्यांना सांगितलंय्. ह्या भीक्षूंना त्यांनी सांगितलंय् की तुमच्या आधीपण एक ब्रह्मी भीक्षू इथं आलाय्. त्यालापण आंग्रेशूलाच जायचं होतं. तो मुका अन् बहिरा आहे. त्यावर ब्रह्मी भीक्षूंच्या टोळक्याचा म्होरक्या बा-थिन ह्या मुक्या-बहिऱ्या ब्रह्मी संन्याशालापण आंग्रेशूच्या मदिरात घेऊन जायला तयार झालाय्.

आता आझाद हिंद सेनेच्या एखाद्या हुषार माणसाला ब्रह्मी भिक्षूंच्या वेशात तिकडे पाठवायचं असं कियानींच्या मनात होतं. पण रस्ताबिस्ता मलाच ठाऊक होता, चितेची जागा पण मलाच ठाऊक होती, अन् शिवाय देवानंच पाठ· वल्यासारखा मी नेमका त्याचवेळी इथं येऊन हजर झालो होतो, तेव्हा––

ते हे सांगत होते. इथपर्यंत आल्यावर मग मी मध्येच म्हणालो––तर मग आता आणखी कसला विचार करताय् सर ?

––विचार करतोय्––कारण तू शीख आहेस ! बौद्ध भीक्षूचं सोंग घ्यायचं तर तुला डोकं भादरावं लागेल ! मी मु ः मान आहे ! मी तुला हा हुकूम कसा-काय देऊ सरदारजी ?

मी ताठ उभा राह्यलो ! देवा ! काय अवघड परीक्षेत टाकलंस तू मला !

मेजर-जनरल कियानी म्हणाले–– हरगोविंदसिंग, तुला माहित आहे ? नेमक्या ह्याच गोष्टीबद्दल नेताजींशी एकदा बोलणं झालं होतं माझं. सिंगापूरला त्या चेट्टियार मंदिरात आम्ही सगळेच आंत गेलो होतो. तेव्हा मी नेताजींना विचारलं––नेताजी, धर्म मोठ्ठा का देश मोठ्ठा ? त्यांनी एकाच वाक्यात माझ्या प्रश्नाचं उत्तर देऊन टाकलं होतं, हरगोविंद ! ते म्हणाले ––ते दोन्ही एकच असतात, कियानी ! मला वाटतं, तुला विचारायचंय् की धर्मांधता मोठ्ठी का देश मोठ्ठा ! हो ना ? ह्या प्रश्नाचं उत्तर हवंय् तुला ? मी म्हणालो––नाही सर ! तेव्हा मग नेताजींनी मला एक गोष्ट सांगितली. बंगाली क्रांतिकारक लोकांचं एक पुस्तक आहे म्हणे. आपलं 'वंदे मातरम्' गाणं पण त्याच पुस्तकात आहे म्हणे ! तर त्या पुस्तकात असं आलंय् की एका क्रांतिकारकाला त्याच्या गुरूंनी प्रश्न केला: तू देशाकरता काय द्यायला तयार आहेस ! त्या क्रांतिकारकानं तुझ्यासारखंच एकाच शब्दात सांगून टाकलं : जान कबूल ! तेव्हा म्हणे ते गुरूजी म्हणाले : जान तर तुच्छ गोष्ट, ती सगळेच देऊ शकतात. त्याच्यापेक्षा जास्ती काय देता येईल तुला ?

माझे दोन्ही डोळे पाण्यानं भरून आले. माझ्या तोंडून धड शब्दही फुटेना. मी कसंबसंच विचारलं——हे नेताजींनी सांगितलं तुम्हाला ?

——हो ! नाहीतर बंगाली पुस्तकांतल्या ह्या गोष्टी मला कुठनं कळणार !

मी लष्करी सॅल्यूट ठोकला. म्हणालो ——तर मग प्राणापेक्षाही मोठ्ठी गोष्ट आहे, तीच मी देतो सर ! डोक्याच्याऐवजी वेणी !

मेजर-जनरलनी कडकडून मिठी मारली मला !

अन् लगेच तयार व्हायला सांगितलं. वेळ थोडाच होता. तरी दहा मिनटं मागून घेतली मी. गुरु अर्जुनसिंगांचा 'सुखमणी' जपला. गुरु रामदासांची धून म्हटली.

हे गुरु नानकजी ! हे गुरु गोविंदजी ! तुम्ही मला क्षमा करा ! तुमच्याच निर्देशानुसार हे धारण केलं होतं——हे केस, हा कंगवा, हे कडं, हे कृपाण न् हा कच्छ ! पण तुमचा सगळ्यात मोठ्ठा आदेश म्हंजे 'वाह गुरूजी का खालसा, वाह गुरूजी की फतेह !' माझे खालसा भाईबंद खानजोलला अडकून पडलेयत ! दुष्मन इंग्लंडच्या गोळीनं त्यांचा जीव जायची वेळ आलीय् ! म्हणून ते धर्मयुद्ध 'फते' करण्याकरता ह्या पाच 'क'चं आज पात्पुरतं विसर्जन करतोय् मी ! अमृतसरच्या रामदासकुंडात स्नान करून हे पण धुवून काढीन मी !

अन् मी डोकं पुढं केलं !

हा कबुलीजबाब ऐकल्यावर कुणी धर्मनिष्ठ शीख किळस येऊन तोंड फिरवून घेईल का काय, मला माहीत नाही. पण त्यादिवशी माझ्या मनात एवढंसुद्धा दुःख नव्हतं. मनात किंचित्देखील पापाचा किंतु नव्हता. माझ्या मनात उभी होती त्यादिवशी फक्त खानजोलला अडकून पडलेल्या माझ्या खालसा भाईबंदांची आठवण !

बा-थिनला काही शंका आली नाही. मुक्या-बहिऱ्या एका भीक्षूला घेऊन ते सगळे निघाले आंग्रेशूच्या पॅगोडयाकडे. माझ्या तोंडावर दाढीमिशांचं जंगल नाही, डोक्यावर केसांचं जंगल नाही. अंगावर पिवळे कपडे. हातात लाठी, खांद्याला झोळी. काहीच शस्त्र नव्हतं माझ्याजवळ. कृपाणदेखील नव्हतं. छोमोल हेडक्वॉर्टर्सपास्नं खानजोलच्या रस्त्यावर मैलेकभर गेल्यावर आमच्या पिलबॉक्सेस. ही आमच्या ताब्यांतल्या भागाची सरहद्द. नंतर अर्धाएक मैल बेवारशी. रस्ता जिथं पश्चिमेला वळत होता, तिथं काही ब्रिटिश चौक्या. दगड गोळा करून त्यांनी पिलबॉक्सेस बनवलेल्या. मधल्या फटीतनं मशीनगनचं न् तोफेचं तोंडच तेवढं बाहेर आलेलं. तरी आम्ही धीमी पावलं टाकत समोर जातच राह्यलो. ते तिघंजण मोठमोठ्यांदा ब्रम्ही भाषेत तथागत बुद्धाचं स्तोत्र म्हणत होते बहुतेक. मी मुका ! मी आपला गप्पचं चाललो होतो सगळ्यांच्या मागनं. त्यांच्यापेक्षा उंचीनं मी जास्त. तेव्हा त्यांच्या डोक्यावरनं मला ब्रिटिश पहारेकऱ्यांच्या मशीनगनच्या नळघा दिसत होत्या.

—हॉल्ट ! हू कम्स देअर ?

बा-थिननं दोन्ही हात वर उचलले. उजव्या हातात काठी होती. तिच्यासकट ! त्यांचं बघून आम्हीपण हात वर केले. ट्रेंचमधनं एक ब्रिटिश ऑफिसर बाहेर आला. त्यानं टॉमी-इंग्रजीत विचारलं—काय पाह्यजेय् तुम्हाला ? कशाला आलायत इकडे ? मरायला ?

बा-थिनना इंग्रजी समजत नव्हतं. मला समजत असूनपण उत्तर देता आलं नाही. काय करणार ! आधीच मी बहिरा ! त्यात परत मुका पण !

बा-थिन ब्रह्मी भाषेत काहीतरी म्हणाले. ते काही टॉमीला कळलं नाही. मलापण कळलं नाहीच. आम्हा चौघांना पकडून. टॉमी घेऊन गेला ट्रेंचकडे. मी पाह्यलं—तो रँकनं कॅप्टन होता. मराठा लाइट इनफंट्रीच्या चौथ्या बटालियनमधला.

आम्हाला चौकीवर घेऊन गेल्यावर त्यांनी आमची नीट झडती घेतली. बाँब-पिस्तूल, सूरा-विरा काहीच नाही आमच्या कुणाचजवळ. अन् असणार तरी कसं ? आम्ही सगळे होतो 'अहिंसा परमो धर्मष्ठ'-चे अनुयायी ! भीक्षू !

कॅप्टनच्या हुकमावरनं थोड्याच वेळात एक ब्रह्मी सैनिक तिथं आला. कॅप्टन त्याला इंग्रजीत म्हणाला—विचार, हे कोण, कुठले, कुठं चाललेय्त न् कशाकरता चाललेय्त ?

माझ्या चेहऱ्यावरनं त्या ब्रह्मी सैनिकाला मीच म्होरक्या वाटलो बहुतेक. ब्रह्मी भाषेत त्यानं मला काहीतरी प्रश्न केला. मी 'अँ-आँ' करता तोंड वेडीवाकडी केली. मग बा-थिन पुढं आले न् त्यांनी सैनिकाच्या प्रश्नाचं उत्तर दिलं. ते त्यानं ऐकून घेतलं न् नंतर इंग्रजीत कॅप्टनला सांगितलं.

माझ्याकडे बोट दाखवून म्हणाला—हा इसम मुका-बहिरा आहे ?

—आणखी एक मुका-बहिरा ! आपल्या भारताच्या साम्राज्यात इतके मुके-बहिरे येतात कुठनं ?

जवळच आणखीएक टॉमी होता. रँकनं लेफ्टनंट. एक पाय गुडघ्यावर घेऊन झाडाला टेकून तो पडला होता. आरामात सिगरेट पीत होता. तो म्हणाला—आणखीएक म्हंजे ? आधीपण कुणी आलं होतं बॉब ?

कॅप्टन बॉब म्हणाला—का ? तू ऐकलं नाहीस का ? ते जपानी बाहुलं बोस ! तेपण मुकं-बहिरं सजूनच देशांतनं बाहेर पळून गेलं होतं !

हाय गुरू नानक ! हाय गुरुगोविंद ! पाच 'क' मी सोडले, त्याची अशी सजा देताय् तुम्ही ! नेताजींना हा इसम चक्क जपानी बाहुलं म्हणाला, अन् तरी त्याचे हात शाबूत आहेत, डोळे शाबूत आहेत ! काय उपयोग माझा !

—तू एक पाह्यलंस का बॉब ? हा माणूस काही ब्रह्मी वाटत नाही पण ! अन् बघतोय् कसा बघ की ! नजरेनंच गिळायला बघतोय् मला ! आं ?

बॉबनं दुभाष्याला विचारलं—त्यांना विचार—ह्या मुक्या-बहिऱ्याचं नाव काय, कुठला आहे वगैरे !

उत्तर अर्थात् बा-थिननींच दिलं. त्यांनी सांगितलं—ह्याचं नाव आहे

बा-युंग. पण हा रहातो कुठं ते काही मला ठाऊक नाही. आजच त्याची माझी ओळख झाली.

बाकी सगळ्यांची सविस्तर माहिती-पण बा-थिननी दिली.

कॅप्टन रॉबर्टचा संशय आणखीच बळावला. बाकीच्या तिघांना जायची परवानगी दिली त्यानं. अन् मला पाठवून दिलं कमांडिंग ऑफिसरकडे. रायफलवाल्या दोघांच्या पहाऱ्यात मी चाललो. ते मला कमांडिंग ऑफिसरच्या तंबूत घेऊन गेले. मैलेकभर चालावं लागलं.

सी-फोर्थ हायलँडर्सचा कमांडिग ऑफिसर होता ढेरपोटचा. कर्नल सिंप्सन. गुटगुटीत चेहरा. पिळदार मिशा. मेणानं कडक केलेल्या. निळे डोळे. मर्माचा ठाव घेणारे. ह्याच्याबद्दल मी ऐकलं होतं बरंच. आज प्रत्यक्षच बघितलं ! तगडा, कसलेला ब्रिटिश ऑफिसर होता कर्नल सिंप्सन.

नाना प्रकारांनी माझी तपासणी करूनदेखील काहीच बाहेर काढता आलं नाही त्याला. दोन्ही हात डोक्यावर ठेवून मी निमूट उभा होतो त्याच्या टेबलासमोर. तीनदा माझी झडती घेऊन झाली होती. माझ्याकडनं कोणत्याही प्रश्नाच्या उत्तराची आशा बाळगणं व्यर्थच होतं.

शेवटी वैतागून कर्नल सिंप्सन म्हणाला —गढवाल को बुलाव !

मी चमकलो ! गढवाल ! कोण गढवाल !

सॅल्यूट ठोकून शिपाई निघून गेला.

थोड्यावेळानं आणखीएक ऑफिसर आला. रँकनं मेजर. भारतीय. म्हणाला —मला वाईट वाटतं कर्नल, मेजर गढवालांच्या अंगात काही उभं राहण्याइतकी ताकद नाही !

—आय सी ! मग ह्याला तिकडे घेऊन चलू या !

मेजर गढवाल ? आमचे डेप्युटी कमांडिग ऑफिसर ? ते ह्यांच्या तावडीत सांपडलेयत ?

फार लांब जावं लागलं नाही. एवढ्यातच ह्या लोकांनी तिथं एक टेंपररी इस्पितळ उभारलंय्. तंबूतच. एका तंबूत आत पडून होते—हो, आमच्या गांधी ब्रिगेडचे डेप्युटी कमांडिग ऑफिसर मेजर गढवालच ! निव्वळ तीनच महिन्यात नुस्ता हाडांचा सापळाच तेवढा शिल्लक होता त्यांचा.

—मेजर गढवाल !

कर्नल सिंप्सननं हाक मारली.

—ह्या माणसाला ओळखतोस तू ? तुमच्यापैकी आहे का कुणी ?

आजारानं पांढऱ्या पडलेल्या डोळ्यांनी मेजर गढवाल माझ्याकडे बघत राह्यले बराचवेळ! मला ते चांगलाच ओळखत होते. पण त्यांनी उत्तरादाखल एक प्रश्नच विचारला.

—कर्नल, मला सांगा, तुम्ही माझं ऑपरेशन करणार का नाही ?

—मी जे विचारलंय्, त्याचं उत्तर दे ! ह्याला ओळखतोस ?

—नाही !

—हा तुमच्या गांधी ब्रिगेडमधला नाही ?

--नाही ! नाही ! नाही !

--थँक्स !

कर्नल सिप्सन परत जाण्याकरता वळला.

तेव्हा मेजर गढवाल परत म्हणाले-- पण माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीत तुम्ही ! तुम्ही माझं ऑपरेशन करू देणाराहात का नाही ?

कर्नल सिप्सन भारतीय डॉक्टरांच्याकडे वळून म्हणाला--मेजर घोष ! मी इथं सेनापतीच्याऐवजी डॉक्टर असतो ना, तर ह्या पेशंटला थोडंसं झोपेचं औषध दिलं असतं ! बिचाऱ्याच्या वेदना तरी थांबल्या असत्या !

मेजर घोष तात्काळ म्हणाले--अन् मीपण ह्या तुकडीचा मेडिकल ऑफिसर न होता सेनापती असतो ना, तर ह्या पेशंटला प्रचंड प्रमाणात झोपेचं औषध दिलं असतं ! म्हंजे त्याच्या वेदना कायमच्या थांबल्या असत्या !

कर्नल सिप्सननं खरं म्हंजे निघण्याकरता पाऊल उचललं होतं. पण अचानक तो माघारी वळला. मेजर घोषना म्हणाला -- डॉक्टर ! मला तुम्हाला आठवण करून देणं भागच पडतंय्-- की तुम्ही आपल्या अधिकाराबाहेर जाताय् ! तुम्हाला पक्कं ठाऊक आहे की ह्याला इथंच ठेवणं हे लढाईच्या दृष्टीनं अत्यंत आवश्यक आहे ! तुम्ही जर वारंवार माझी अशी अडवणूक करत राहचलात तर तुमच्याबद्दलचा रिपोर्ट तुमच्या बॉसकडे करण मला भाग पडेल !

मेजर घोषपण न डरता म्हणाले--हीच गोष्ट मलापण तुम्हाला सांगायची होती कर्नल ! तुम्ही माणुसकीची सीमा ओलांडताय् ! तुम्हाला पक्कं ठाऊक आहे की ह्या ब्रिगेडच्या मेडिकल ऑफिसर-इन-चार्ज च्या मतानं ह्या युद्धबंद्याला तावडतोब बेस-हॉस्पिटलमध्ये हलवणंच योग्य होईल ! तुम्ही जर वारंवार माझी अशी अडवणूक करत राहचलात तर तुमच्या बॉसकडे तुमच्याबद्दल रिपोर्ट करणं मला भाग पडेल !

मेजर घोषांना मी मनातल्या-मनात सॅल्यूट ठोकला ! हा पण बंगालका शेरच दिसतोय् चांगला ! भलतंच धाडस दाखवतोय् !

आता मात्र कर्नल किंचाळलेच !

--कोण युद्धबंदी ? हा गढवाल ? नाही ! हा तर ट्रेटर आहे ! ट्रेटर ! हा थोडाच लढाईत सापडलाय् ! हा आपण होऊन इथं आला ! वेशांतर करून हॉस्पिटलमध्ये आलाय् ऑपरेशन करून घ्यायला !

अचानक रोगानं जीर्णशीर्ण झालेले गढवाल उठून बसले.

क़ातर आवाजात म्हणाले--Please Doctor ! Just serve your prescription--an overdose of sleeping pills !

डॉक्टर घोषांचं उत्तर काही मला ऐकायला मिळालं नाही. त्याच्याआधीच ते मला ढकलून बाहेर घेऊन गेले परत-एकदा.

कर्नल सिप्सनच्या त्या खास तंबूत !

[ क्रमशः ]

## मध्यंतर

अमृत नाट्यभारतीचे
राज्य नाट्यस्पर्धेतील नाटक

# महायुद्ध

पुष्पा भावे

'मुंबई मराठी साहित्यसंघा'च्या नाट्यशिक्षणवर्गातर्फे (अ. ना. भा.) यंदा राज्य नाट्यस्पर्धेतील प्रथम-फेरीत 'महायुद्ध' हे शं. ना. नवरे यांचे रूपांतरित नाटक सादर करण्यात आले. 'माणूस'च्या वाचकवर्गाला 'अमृत-नाट्यभरती'चा चांगला परिचय आहे. या नाट्यशिक्षणवर्गाने अनेक लक्षणीय नाटके सादर केलेली आहेत. एखाद्या नाट्यशिक्षणवर्गाने नाट्यस्पर्धेत भाग घ्यावा किंवा नाही हा वादग्रस्त प्रश्न होऊ शकेल. मला स्वतःला 'अ. ना. भा.' सारख्या नाट्यशिक्षणवर्गाने स्पर्धेत भाग घेऊ नये असे वाटते; परंतु सध्या जवळजवळ सर्वच प्रायोगिक संस्थांना स्पर्धेच्या आयत्या प्रेक्षकवर्गाचा मोह होतो आणि तो साहजिक आहे. एक मात्र खरे की 'अ. ना. भा.'चे सूत्रचालक रमेश चौधरी यांनी या नाट्यवर्गाला अनुकूल असे नाटक निवडले. शं. ना. नवरे यांनी Irving Shaw च्या 'Bury The Dead' या नाटकाचे रूपांतर केले आहे. हे नाटक समूहाचे नाटक, नायक-कल्पनेपासून अलिप्त असे नाटक आहे आणि कल्पक दिग्दर्शकाला आव्हान देणारे आहे. परंतु एका अर्थाने हे नाटक या विद्यार्थ्यांना अनुकूल ठरले नाही. 'महायुद्ध'मधील युद्धाचा गहन अनुभव या नवथर विद्यार्थ्यांना [आणि मी जो प्रयोग पाहिला (संघातील) त्यावेळच्या प्रेक्षकांनाही] पेलला नाही. त्यामुळे एका महत्त्वाच्या नाट्यसंहितेचा अपरिपक्व प्रयोग पहाताना जे दुःख होते तेच 'महायुद्ध'चा प्रयोग पाहताना जाणवले.

युद्धातील वीरमरणाचे वैयर्थ्य भीषण रूपात मांडणाऱ्या, तरूण जीवांची ध्यादी करून त्यांच्या आधारे आंतरराष्ट्रीय बुद्धिबळे खेळणाऱ्या नेत्यांच्या मुत्सद्दी-पणाआडचा खरा चेहरा उपरोधातून रंगविणाऱ्या या नाटकात नाट्यमाध्य-

माची जाणीव विलक्षण आहे. युद्धात मृत्यू पावलेले चार तरुण वीर त्यांच्यासाठी खणलेल्या जागेत ताठ उभे राहातात, स्वत:चे दफन करून घ्यायला स्पष्ट नकार देतात. जणू काही युद्धाच्या खेळासाठी मातीखाली लोटलेल्या हजारो तरुण जीवांचा आकांत युद्धभूमीपासून दूर असलेल्या माणसापर्यंत पोचविण्यासाठी त्यांनी बंड पुकारलेले असते. लष्करी अधिकारी, व्यापारी, पत्रकार, समाजातील विविध स्तरातील माणसे आणि शेवटी या वीरांची संबंधी माणसे यांच्या प्रतिक्रियातून नाटककाराने युद्धाचा करुणगंभीर अनुभव व्यक्त केला आहे. पोकळ शब्दांनी युद्धाचा, देशभक्तीचा गौरव करणाऱ्या अनुभवाला छेद देण्याचा हा यत्न आहे.

काही वर्षांपूर्वी अलेक पदमसी यांनी मुंबईच्या सेंट झेवियर महाविद्यालयासाठी इंग्रजी नाटकाचा अत्यंत परिणामकारक प्रयोग केला होता. सांकेतिक नाट्यरचना नसलेल्या या नाटकाचा प्रयोग त्यांनी आकाशवाणी, चित्रपट अशा विविध माध्यमांचा आधार घेऊन केला होता. 'अ. ना. भा.'ने सादर केलेल्या प्रयोगात तांत्रिक बाजूही विद्यार्थ्यांनी सांभाळलेल्या असल्यामुळे या प्रयोगात मला तुलना करावयाची नाही.

या नाटकात खंदकात जगणाऱ्या सैनिकांचे आयुष्य आहे. प्रत्यक्ष प्रयोगात निळ्या आवरणाचे (Masking) जे मंच योजले होते आणि त्यामागे मृत सैनिकांसाठी खणलेले चर कल्पिलेले होते ते फारसे परिणामकारक ठरले नाहीत. आज मराठी प्रायोगिक रंगमंचावर पदयोजनेच्या सूत्रचालनाच्या सोयीसाठी असे मंच (Platform) नित्य वापरले जातात. चिखलांच्या खंदकांची कल्पना 'महायुद्धा'तील अनुभवाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची होती. युद्धभूमीवरील आवाजांचे आभासही फारसे विश्वसनीय नव्हते. चार मृत जवानांच्या भूमिका करणारे नट वजा करता बाकी कोणाच नटाला भूमिका फारशा पेलल्या नाहीत. विशेषत: या नाट्यप्रयोगातील स्त्रियांच्या भूमिका ज्या नवथरपणे केल्या गेल्या त्यामुळे हे गंभीर नाटक हास्यास्पद होण्यास मदत झाली. नाट्यशिक्षणवर्गातल्या विद्यार्थ्यांच्या मानाने या प्रयोगातील अभिनयाचा दर्जा फारच खालचा होता एकेकाळी याच 'अमृत नाट्यभारतीत अच्युत देशिंगकर, दिलीप खांडेकर, अरुण होर्णेकर इत्यादी विद्यार्थ्यांचा अभिनय रसिकांनी पाहिलेला आहे. विशेष म्हणजे नंतरच्या काळात या विद्यार्थ्यांच्या नाट्यविषयक समजुतीचाही प्रत्यय आलेला आहे. या प्रकाशात 'महायुद्धा'तील अभिनयाची पातळी विशेष निराशाजनक होती. 'महायुद्धा'तील मराठी शब्दांचे उच्चारण सर्वसाधारण संभाषणपातळी पेक्षाही वाईट होते. एक शब्द दुसऱ्यात मिसळणे स-श, ल-र-ळ या व्यंजनांचे परस्परासारखे उच्चार, अत्यत गंभीर वाक्य हलक्या वजनाने टाकणे, अशा चुका संवादफेकीत सतत होत होत्या. चाळीस जणांच्या समूहाचे हे नाटक सादर करताना नाट्यशिक्षणवर्गातील विद्यार्थ्यांनी

खूप काही शिकण्यासारखे होते. या प्रयोगाच्या अपयशामुळे हे विद्यार्थी थोडे काही शिकले तरी हरकत नाही. 'अ. ना. भा.' सूत्रचालक रमेश चौधरी यांनी या विद्यार्थ्यांकडून कसून मेहनत करून घेण्याची आवश्यकता आहे.

आज महाविद्यालयीन रंगभूमीचा उतरलेला नूर पाहतानाच 'अ. ना. भा.' च्या अडचणींची जाणीव होते. एखाद्या नाटकातील भूमिकांसाठी निवड व्हायची आहे असे कळल्यावर ज्या महाविद्यालयात चाळीसपन्नास विद्यार्थी सहज येतात, त्याच महाविद्यालयात एका सुट्टीत नाट्यशिक्षणवर्ग चालविला असता सहा विद्यार्थी येतात यावरूनच विद्यार्थ्यांच्या उत्साहाची जात लक्षात येते. परंतु नाटक हा छंदच असा आहे की जेथे नाट्यमाध्यमाच्या जाणीवेला आणि परिश्रमाला दुसरा पर्याय नाही. याचा विचार 'अ. ना. भा.'चे विद्यार्थी करतील काय? या विद्यार्थ्यांना स्पर्धेत उतरवल्यामुळे खरोखर काय साधले?

मात्र शं. ना. नवरे यांचे 'महायुद्ध कोणाही प्रायोगिक संस्थेने लक्ष ठेवावे असे नाटक आहे. ◻

# एका नाटककाराच्या वंडखोरीच्या निमित्ताने

काही दिवसापूर्वी 'Times Of India'मध्ये जे. डी. सिंग यांनी लिहिलेली 'Literary Protests' नावाची टिपणी आपल्यापैकी अनेकांनी वाचली असेल. John Arden या नाटककाराने आपल्या 'The Island Of The Mighty' या नाटकाच्या प्रयोगकल्पकतेविषयी 'The Royal Shakespeare Company' या मातब्बर नाट्यसंस्थेशी झालेला वाद चक्क रस्त्यावर आणला. मुंबईतल्या उडिपी उपहारगृहाच्याबाहेर घोषणाफलक घेऊन उभ्या राहणाऱ्या कामगारांप्रमाणे हा नाटककार नाटकाच्या तालमीच्यावेळी सहकुटुंब निदर्शने करीत असे. त्याच्या हातातील घोषणाफलकावर पुढील आशयाचा मजकूर लिहिलेला असे : नाटककार हा सर्वप्रथम कामगार आहे–नंतर कलावंत. ब्रिटिश नाटककारांचे 'ट्रेड युनियन' स्थापन करा. परंतु नाट्यसंस्था व दिग्दर्शक यांनी आर्डेनचे नाटक त्याच्या मर्जीविरुद्ध एका विशिष्ट पद्धतीने सादर करावयाचे निश्चित केले. तेव्हा नाटकाच्या प्रथम प्रयोगाला नाटककार सपत्निक उपस्थित राहिले आणि मध्यंतरापूर्वी त्यांनी प्रेक्षकांना हा वाद सांगण्याचा यत्न केला. तेव्हा प्रेक्षकातून 'चालते व्हा' असेच उत्तर त्यांना मिळाले. तिथून निघून जाताना 'तुमच्यासाठी पुन्हा कधीच लिहिणार नाही' अशी धमकीही आर्डेनने प्रेक्षकांना दिली. इतक्या थराला गेलेला दिग्दर्शक–नाटककार यांचा वाद कोणी अनुभवलेला नसला तरी नाट्यवर्तुळाच्या आसपास असणाऱ्या सर्वांना माहीत आहे की, विशिष्ट नाट्यसंहिता कशी सादर केली जावी याविषयी

नाटककार व दिग्दर्शक यांच्यात अनेकदा वाद निर्माण होतात. कधी संपूर्ण नाटचसंहितेच्या स्वरूपाविषयी, तर कधी कोणती वाक्ये गाळावीत याविषयी, तर कधी विशिष्ट पात्रयोजनेविषयी असे वाद निर्माण होऊ शकतात. तिसरा अंक हा तर निरंतर वादाचा विषय असतोच. मराठीत 'देवदास' प्रकरणाइतका टोकाला गेलेला वाद आपण क्वचितच पाहिलेला असला तरी लहान-सहान खटके वारंवार ऐकू येतात. एका बाजूला नाटक लिहून पूर्ण झाल्यावर दिग्दर्शकाच्या हाती सोपवून मोकळा होणाराही नाटककार दिसतो तर दुसऱ्या बाजूला स्वतःच्या प्रत्येक शब्दाची जपणूक करणारा हळव्या मनाचा नाटककारही दिसतो.

दिग्दर्शक वा नाटककार कोणत्याही एका पक्षाचे नसणाऱ्या आपल्यासारख्या नाटचरसिकांना प्रश्न पडतो : यातील रास्त भूमिका कोणती ? नाटककाराच्या संहितेच्या मालकीहक्काला किती महत्त्व द्यायचे ? दिग्दर्शकाच्या नाटचात्मक आविष्काराच्या जाणिवेला किती प्राधान्य द्यावयाचे ? नाटक ही प्रयोग-प्रवण कला आहे आणि नाटचप्रयोग ही शब्दाश्रयी कला (अजूनतरी) आहे. या दुहेरी रूपातूनच नाटचसंहितेविषयीचे वादग्रस्त प्रश्न निर्माण होतात. मराठी रंगभूमीच्या प्रारंभकालात हे प्रश्न उपस्थित झालेच नसतील : कारण किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी हे स्वतःच तालीममास्तर होते. निश्चितच नाटक उभे करताना त्यांनी आपल्या मूळ लेखनात बदल केले असतील. परंतु ते त्यांनी स्वतःच केले असल्यामुळे वादाचा प्रश्न उद्भवला नसेल. आजच्या एखाद्या दिग्दर्शकाने किर्लोस्करांचे, देवलांचे वा खाडिलकरांचे नाटक बसविताना त्याचे संपादन केले वा वेगळ्या तऱ्हेने ते सादर करावयाचे ठरविले [ उदा. गद्य 'शारदा' ] तर ते अयोग्य मानावयाचे काय ? इंग्लंड-मध्ये शेक्सपियरची नाटके विविध पद्धतीने संपादन करून सादर केली जातात. मुंबईकर प्रेक्षकांना स्मरत असेल तर 'Bristol Old Vic' ही नाटचसंस्था काही वर्षापूर्वी मुंबईत आलेली असताना 'हॅम्लेट'च्या प्रयोगाविषयी, विशेषतः प्रवेशरचनेविषयी, त्यांनी केलेले प्रयोग पाहून आपण थक्क झालो होतो. दिग्दर्शकाने एका स्थानिक दैनिकाच्या साप्ताहिक आवृत्तीच्या स्तंभलेखकाला मुलाखत देताना दिग्दर्शकाच्या स्वातंत्र्याविषयीचा आग्रहही व्यक्त केला होता. विशिष्ट नाटचप्रयोग हा कुणाचा अविष्कार मानावयाचा हा या प्रश्नाच्या मुळाशी असणारा विचार आहे. नाटक हे समूहाने करावयाचे असले तरी एकसंध कलाकृती निर्माण करण्यासाठी एकसूत्री संकल्पना अत्यावश्यक असते. ज्याप्रमाणे पाश्चात्य वाद्यवृंदाला सूत्रचालक (Conductor) असतो त्याचप्रमाणे नाटच-संहिता, नटवर्ग, नेपथ्य-सजावट, प्रकाश-योजना, पार्श्वसंगीत–रंगभूषा या अनेकविध घटकांचा परस्परअन्वय साधणारा दिग्दर्शकच नाटचकृतीचा संपूर्ण समतोल

आविष्कार घडवू शकतो. आज तरी मूळ नाटक जसेच्यातसे प्रमाण मानून नाट्यप्रयोग हा संहितेला दुय्यम आहे, असे मानण्याची वृत्ती सहसा दिसणार नाही. किंबहुना आधुनिक पाश्चात्य रंगभूमीवरील ' Anti-literary Theatre ' च्या चळवळीपासून ' Group Theatre ' च्या चळवळीपर्यंत नाट्यसंहितेचे अवमूल्यनच झालेले दिसते. कोणीच न लिहिलेली नाटके संपूर्ण समूह हळूहळू तालमीत नव्याने निर्माण करतो असेही आज पाश्चात्य प्रायोगिक रंगभूमीवर घडते आहे. आपल्याकडील अनेक नाटककार दिग्दर्शकाला व इतर काही जाणकारांना नाटक वाचून दाखविल्यानंतर त्याची निश्चित प्रत करताना दिसतात. याचा अतिरेकही काही उत्साही नाटककारांच्या ठिकाणी आपण पाहिला – ऐकला आहे. दर प्रयोगाला येणाऱ्या जाणकारांच्या सूचनेवरून एक नाटककार नाटकाचा शेवट सतत बदलत असे – शेवटी सहाव्या प्रयोगाला त्या नाटकाचाच शेवट झाल्यामुळे त्यातील बदल होणे थांबले.

' रंगावृत्ती ' हा शब्द आपण योजतो. अनेकदा छापलेली नाट्यसंहिता आणि रंगावृत्ती यात फरक असतो. दिग्दर्शकाला हे स्वातंत्र्य नसेल तर नाटक हे एक स्वतंत्र आविष्कारमाध्यम आहे या म्हणण्याला काय अर्थ आहे ? तरीसुद्धा जर एखाद्या नाटककाराला असे वाटले की आपल्याला जे नाटक मांडावयाचे होते ते या दिग्दर्शकाच्या मांडण्यातून व्यक्त होत नाही तर आपले नाटक परत मागण्याचा वा आर्डेनने केले त्याप्रमाणे ते नाटक माझे नाहीच असे म्हणण्याचा अधिकार त्याला असलाच पाहिजे.

John Arden हा नाटककार आपल्याला थोडाफार परिचित असेल. ' Soldier, soldier ' ' The Happy Haven ', ' Sergeant Musgrave 's Dance ' यासारखी प्रत्येकवेळी नाट्यमाध्यमाचे वेगळे प्रयोग करणारी नाटकें लिहिणारा हा नाटककार वृत्तीने बंडखोर आहे. सेन्सॉरशी अनेकदा दोन हात करणारा हा नाटककार व्यक्तिमत्त्ववादी नाही. एकारलेली व्यक्तित्त्वे, व्यक्तिगत झपाटलेपण हे त्याच्या नाटकाचे अनुभव नसतात. समूहांच्या नात्यावर आधारलेली नाटके लिहिणारा हा नाटककार सखोल अर्थाने समाजाशी बांधलेला आहे. परतु आज पाश्चात्य दिग्दर्शक मात्र, नाटप्रयोग प्रमुख, नाट्यसंहिता निमित्त मात्र, असे मानीत असल्यामुळे आर्डेनच्या प्रक्षोभाकडे फार कोणी लक्ष दिले नाही. या घटनेचे वृत्त वाचीत असताना मला स्मरण झाले आर्डेनवर ग्रंथ लिहिणाऱ्या Ronald Hayman या ग्रंथकाराच्या एका भाकिताचे : " but it is an enormous pity that the Royal Shakespeare Theatre has only flirted with him and that his affair with Chichester and the National Theatre hasn 't developed into a marriage. What he needs more than anything is a per-

manent relationship with a theatre like this. If he had the chance of working on his scripts over an eight-week rehearsal period in close association with a good director, good actors and a good 'literary manager' like Kenneth Tynan he might be able to iron out the inconsistencies and eliminate the dull patches and the structural excrescences that result from exploring ideal in a self-indulgent way. He certainly has the stuff of greatness in him; whether it ever comes out may depend more on the way the English theatre treats him than on anything within his own control" (John Arden : Ronald Hayman) थोर नाटककाराची बीजे असणारा हा नाटककार मात्र नेमके हेच नाकारतो आहे की चांगला दिग्दर्शक त्याच्या नाटकाला काही देऊ शकेल.

मराठी प्रायोगिक रंगभूमीवर एका बाजूला स्वातंत्र्याचा उद्घोष करणारे नाटककार दुसरीकडे स्पर्धेच्या अटीत बसणाऱ्या कालमर्यादेसाठी नसलेला अंक लिहिणे, मुळात नसलेले पात्र आणणे, हेही करतात. मात्र एखाद्या दिग्दर्शकाने माध्यमाच्या दृष्टिकोनातून काही फरक सुचविले तर त्यांचा अहंकार दुखावला जातो. निर्मात्याने भडक जाहिरात करून चुकीचा प्रेक्षकवर्ग आकर्षित केल्यावर हा अहंकार कोठे जातो? □

# एका निर्णयाचे स्वागत

डॉ. श्रीराम लागू आपल्या तीन लोकप्रिय भूमिका सोडणार आहेत ही बातमी आपण सर्वांनीच ऐकली वा वाचली असेल. आपल्यापैकी काही रसिकांनी त्यामुळे त्या नाटकांचे प्रयोगही त्वरेने जाऊन पाहिले असतील. पण याहीपलीकडे जाऊन या प्रश्नाचा आपण जरा सखोल विचार केला तर असे लक्षात येते की, डॉ. लागूंनी घेतलेला निर्णय अनेकदृष्टींनी स्वागतार्ह आहे; आणि तो निर्णय केवळ वैयक्तिक स्वरूपाचा नाही. ज्यावेळी एखादा चांगला नट एखादी भूमिका अनेक दिवस करीत राहतो त्यावेळी त्यातून अनेक व्यावहारिक व कलात्मक अडचणी निर्माण होतात. उदा–

* कितीही चांगला नट असला तरी एखाद्या नाटकाचे शेकडो प्रयोग झाल्यानंतर ती भूमिका सादर करण्यातील उत्स्फूर्तता कमी व नाहिशी होणे.
* एक विशिष्ट भूमिका अनेक वर्षे करीत राहिल्याने त्या भूमिकेच्या लकबी त्या नटाच्या लकबी होण्याची शक्यता उद्भवणे.
* एकाच नटाने सतत ती भूमिका केल्यामुळे त्या भूमिकेचे वेगळे अन्वेषण न होणे. त्यातील अर्थाचे वेगवेगळे कोन उलगडले न जाणे.



डॉ. श्रीराम लागू
मराठी रसिक नव्या प्रयोगांची
वाट पहात आहेत

एखाद्या भाषेत (उदा. मराठी) अभिनयाला आव्हान देतील अशा भूमिकांची कमतरता असल्यास एका नटाशिवाय इतरांना कठीण भूमिका करण्याची, आपल्या अभिनयाचा कस पारखण्याची संधी न मिळणे.

✤ एक वा दोन नाटके लोकप्रिय ठरल्यामुळे त्या नाटकांच्या प्रयोगाच्या संख्येमुळे, दौऱ्यांमुळे नटाला नव्या नाटकाच्या तालमीला अवसर मिळत नाही. त्यामुळे त्याच्या अभिनयाच्या विकासाची दिशाच हरवली जाणे.

या सगळ्या अनिष्ट गोष्टी एका व्यक्तीच्या बाबतीत घडतील असे नाही; परंतु वर सांगितल्याप्रमाणे काहीच भूमिका पुन्हा पुन्हा करीत राहिल्यामुळे नटाच्या अभिनयकौशल्याला, व्यक्तीत्वाला वा संस्कारांना मर्यादा पडण्याच्या शक्यता जरूर असतात, हे मान्य व्हावे. आता डॉ. लागूंनी घेतलेल्या निर्णयामुळे किती विविध परिणाम होतील आणि किती होऊ शकतील ते पाहा :

✤ डॉ लागू नव्या नाटकात, नव्या भूमिकेत आपल्याला दिसू शकतील. एखाद्या लक्षणीय नाटकाचे दिग्दर्शन, निर्मिती ते करू शकतील — नव्हे करतीलच. कोणत्याही निष्ठावंत कलावंताचे अस्वस्थ मन त्याच त्याच प्रयोगात सवयीने काम करून तृप्त राहाणार नाही. किंबहुना डॉ. लागूंनी याच अस्वस्थतेपोटी हा निर्णय घेतला असावा.

✤ दत्ता भटांसारख्या नटाला नवी महत्त्वाची भूमिका लाभेल. इतकेच नाही तर कदाचित ते शिरवाडकरांना वेगळा 'गणपतराव बेलवलकर' देऊ शकतील. अनेकांनी सादर केलेल्या भूमिकेमधून आपण रसिक त्या नाटकाचा अधिक समृद्ध अनुभव घेऊ शकू. समीक्षकांना आपल्या दृष्टीचे विवेचकत्व जागृत ठेवता येईल. (पाश्चात्य देशात एखाद्या नाटकातील दुय्यम भूमिकेतील बदलही दुसऱ्या दिवशी पहाटे वर्तमानपत्रातील समीक्षणात टिपला जातो – नव्या-जुन्या भूमिकांची तुलना केली जाते.)

✤ एखाद्या सामान्य नाटकातील डॉ. लागूंच्या उपस्थितीमुळे, अभिनयामुळे त्या नाटकाच्या जातीविषयी आभास निर्माण झाले असतील तर तेही डॉ. लागूंच्या निवृत्तीमुळे दूर होऊ शकतील.

'नटसम्राट', 'कांचेचा चंद्र', 'पपा सांगा कुणाचे' या तीन नाटकांतून निवृत्त होण्याचा डॉ. लागूंचा निर्णय केवळ वैयक्तिक नाही असे जे मी वर म्हटले त्याचे कारण हेच की त्या निर्णयाचे आणि अशा स्वरूपाच्या कोणत्याही निर्णयाचे परिणाम केवळ व्यक्तीच्या कारकिर्दीवर दिसत नाहीत, ते त्याहून विस्तृत वर्तुळ निर्माण करतात. डॉ. लागूंच्या अभिनय कौशल्याचा विचार वा अभ्यास करता करता आपल्याला जाणवते की डॉक्टरांनी नटाच्या व्यावसायिक नीतिमत्तेचाही आदर्श निर्माण केला आहे. नाट्यमाध्यमाचा छंद, व्यासंग आणि निष्ठा डॉ. लागूंच्या व्यक्तिमत्वाला व्यापून वर दशांगुळे उरते. आविष्कारस्वातंत्र्याची निष्ठा पत्करल्यानंतर त्यावर विस्तृत लेख लिहिणे, आपल्या घाईगर्दीच्या वेळापत्रकातून वेळ काढून व्याख्याने देणे आणि हे आपले कर्तव्यच करीत आहोत इतक्या सहजतेने करणे हे सारे या माध्यमनिष्ठेतून निर्माण होते. रंगमंचाला वा ज्येष्ठांना नमस्कार करून निष्ठा व्यक्त करणे सोपे असते. लागूंसारखी निष्ठा सहजतेने अंगी बाणणे अत्यंत अवघड असते. डॉ. लागू व्यावसायिक रंगभूमीवर असले तरी अंतर्यामी प्रयोगशील कलावंत आहेत हेच या निर्णयाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. मराठी रसिक डॉ. लागूंच्या नव्या नाटकाची आतुरतेने वाट पहात आहेत!

□ □ □



जया भादुरी । संजीवकुमार

हृषिदांच्या पुढे
एक पाऊल

# कोशिश

ज्ञानेश्वर नाडकर्णी

हिंदी चित्रपटाच्या वाटेला मी सहसा जात नाही, कारण काही ठळक अपवाद सोडले तर आपल्या राष्ट्रभाषेतील हे चित्रपट म्हणजे एक भयंकर वैताग असतो. अलिकडे सेन्सॉर बोर्डावरील फौजदाराच्या स्थानामुळे हिंदी चित्रपट पाहणे प्राप्त झालेले आहे. त्यातलाच एक एन्. सी. सिप्पी यांनी सादर केलेला 'कोशिश'.

'कोशिश'चे दिग्दर्शक गुलज़ार यांनी दिग्दर्शन क्षेत्रात प्रवेश केल्याला उणेपुरे एक वर्ष लोटले असेल. पूर्वी ते विमल रॉय यांना साहाय्यक होते असे म्हणतात. हृषिकेश मुखर्जी यांच्या चित्रपटासाठी त्यांनी सातत्याने संवादलेखन केलेले आहे. 'अपन जान' या बंगाली

चित्रपटाचे हिंदी रूपांतर ' मेरे अपने ' हा त्यांनी दिग्दर्शिलेला पहिला चित्रपट. ' परिचय ' हा दुसरा आणि ' कोशिश ' तिसरा.

' कोशिश 'खेरीज गुलझार यांचे कोणतेही चित्रपट मी पाहिलेले नाहीत. मात्र ' कोशिश ' इतका सुंदर चित्रपट हृषिकेश मुखर्जीनीसुद्धा दिग्दर्शित केलेला नाही असे म्हणणे गैर ठरणार नाही.

' कोशिश 'ची कथा गुलझार यांच्या इतर दोन चित्रपटांप्रमाणेच उसनी घेतलेली आहे. बहिरे आणि मुके असलेल्या एका दांपत्याची कथा फार वर्षांपूर्वी एका हृदयंगम जपानी चित्रपटात चित्रिलेली पाहिल्याचे आठवते. गुलझार यांनी प्रत्यक्ष ऋणनिर्देश केलेला नाही हे जरी खरे असले तरी मूळ कल्पनेचा त्यांनी विपर्यास केलेला नाही हेही तितकेच खरे.

संजीव कुमार आणि जया भादुडी हे ' कोशिश 'मधील दांपत्य. आपल्या अंगभूत वैगुण्यामुळे हतबल न होता, जीवनाच्या धकाधकीला ती दोघे कशी धैर्याने तोंड देतात याचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण ' कोशिश 'मध्ये केलेले आपल्याला आढळेल. ' कोशिश 'मध्ये या मूलतः हृद्य अशा कथानकाच्या संदर्भात काही अंशी भावविवशता डोकावणे अटळ आहे. विशेषतः संजीव आणि जया यांच्या वैवाहिक जीवनात जे अनेक कडूगोड प्रसंग डोकावतात त्यातील एखाद्याचे चित्रण भावविवश वाटेल. मात्र एकंदर चित्रपट पाहता त्यात सवंग भावविवशतेला कोठेही थारा दिलेला नाही असे आढळून येईल.

माझ्या दृष्टीने ' कोशिश 'ची खरी महत्ता वेगळ्याच बाबतीत आहे. संजीव आणि जया यांच्या जीवनात एक आंधळा प्रवेश करतो. (ही भूमिका दिल्लीच्या राष्ट्रीय नाटयविद्यालयाचे एक ख्यातनाम माजी विद्यार्थी ओम् शिवपुरी यांनी अत्यंत कसबीपणाने वठविलेली आहे. जयाच्या आईचे काम करणारी दिना पाठक हीसुद्धा ३० वर्षे रंगमंचावर वावरलेली अनुभवी नटी.) हा एक मजेदार त्रिकोण : दिसत असून बोलू अगर ऐकू न शकणारे संजीव व जया, आणि बोलू अगर ऐकू शकणारा परंतु दृष्टी नसलेला शिवपुरी.

याचाच अर्थ असा की ' कोशिश 'चा खरा विषय आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्यही खटकणारी मानवी परस्परसंपर्काचीच (' कम्युनिकेशन ') मूलभूत समस्या हा होय. आज जग इतके कोडगे झालेले आहे की माणसे एकमेकांना माणसे म्हणून ओळखत नाहीत; त्यांना एकमेकांशी नैसर्गिकपणे संपर्क साधणे कठीण होऊन बसलेले आहे. गुलझार यांनी नेमकी हीच समस्या अत्यंत हळुवारपणे आणि शोधकपणे हाताळल्याची प्रचीती ' कोशिश ' पाहताना वारंवार येते.

' कोशिश 'ने आपल्या कथाविषयाचे कसे सोने केलेले आहे हे पटायचे असेल तर मनोजकुमार यांचा ' शोर ' बघणेही आवश्यक ठरेल मनोजकुमारांचा विषय हासुद्धा परस्परसंपर्काशीच संबंधित आहे. माणसे जिथेतिथे ' शोर

मचावीत ', गडबडगुंडा करीत असतात. त्यांना शांततेचे महत्त्व कसे शिकवायचे ?

परंतु सुरुवात चांगली करून मनोजकुमारांनी 'शोर'चे आस्तेआस्ते एक गल्लाभरू आणि निरर्थक चित्र करून टाकलेले आहे. 'कोशिश'शी त्याची तुलना करावी लागते ती त्यामुळेच.

'कोशिश'ची तांत्रिक अंगे सर्वच्या सर्व उच्च दर्जाची आहेत. के. वैकुंठ यांचे रंगीत छायाचित्रण आणि मदनमोहन यांचे समर्पक संगीत दोन्हीही चित्रपटाच्या अस्खलपणात भर घालतात. 'कोशिश'मधील खलनायक असरानी (जयाचा भाऊ) हासुद्धा इतर हिंदी चित्रपटांतल्याप्रमाणे काळाकुट्ट रंगविलेला नाही. (असरानी हा पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटचा विद्यार्थी —सध्या अनेक चित्रपटांचे करार झालेला एक तरुण, हरहुन्नरी—नट.)

हिंदी चित्रपटात नेहमीच जो बुद्दूपणा आणि बटबटीतपणा असतो तो 'कोशिश'मध्ये दिसणार नाही. त्यात जो ताजेपणा आहे त्याला तांत्रिक अंगांप्रमाणेच संजीव आणि जया यांचा अभिनयही कारणीभूत आहे. हे दोघे श्रेष्ठ परंतु तरुण कलावंत फक्त हातवारे आणि केविलवाणे आवाज यांच्या द्वारे आपल्या भावना व विचार व्यक्त करतात. त्यांनीही आपल्या या अत्यंत मुश्कील अशा आंगिक अभिनयात चुकूनही भावविवशता डोकाव दिलेली नाही. (संजीवच्या बॉसचे काम करणारा नितीन सेठी हा हिंदी रंगमंचावरून घेतलेला आणखी एक कुशल अभिनेता; 'बदनाम बस्ती' या प्रायोगिक 'कलात्मक' चित्रपटाचा अविस्मरणीय नायक)

म्हणूनच मला वाटते की, व्यावसायिक पठडीतील हा एक आगळा कलात्मक चित्रपट आहे. माझ्या मते अशाच प्रकारच्या 'दस्तक'पेक्षा तो उजवा आहे आणि कलात्मक म्हणून मिरविणाऱ्या बव्हंशी सदोष अशा 'फिर भी'पेक्षाही. गुलझार हे तरुण आहेत; संवादलेखक म्हणून सुरुवात करून दिग्दर्शनात त्यांनी इतक्या सहजपणे बाजी मारावी हे अभिनंदनीय. □□

सरदारगृह

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय. हीरक महोत्सवानिमित्त
विविध सुखसोयी—अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह.

**सरदारगृह प्रायव्हेट लिमिटेड**

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २

मंगलकार्ये व मेजवान्यांची उत्तम व्यवस्था



# विक्रोळी

पृष्ठ ३१ वरून

निवडणुकांद्वारे संघटनेचे अधिकृतपणे नेतृत्व आल्यानंतर, प्रभाकर कुंटयांनी गोदरेज प्रकरणातून पूर्णपणे अंग काढून घेतले असे मला आ. तुषार पवारांनी व आ. व्ही. के. टेंब्यांनी पुन: पुन्हा सांगितले. (श्री. टेंबे इंटक प्रणीत इंजिनियरींग वर्कर्स असोसिएशनचे अध्यक्षही आहेत.) दंगल माजवून युनियन तोडण्यासाठी कुंटे-गोदरेज मालक-पोलिस (शासन) शिवसेना अशी युती झाल्याचे त्यांनी साफ नाकारले, त्यांच्या मते पुढे संघर्ष उरला तो कामगार नेता, त्यांची संघटना विरूद्ध मालक असाच. त्यातनं वातावरण तापत जाऊन भडका उडाला असे त्यांचे मत आहे. मालकांनी त्या कामी पोलिसांचा आणि शिवसेनेचा उपयोग करून घेतला, असे त्यांना वाटते. त्याचबरोबर, कॉंग्रेसचेच दोन आमदार भांडत असल्याचे चित्र पाहून मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीने वेळीच हस्तक्षेप करून प्रश्न लौकर सोडवला असता तरी परिस्थिती एवढया थराला गेली नसती असेही श्री. टेंब्यांनी सांगितले. विधान परिषदेच्या पाच सदस्य सत्यशोधन समितीनेही आपल्या रिपोर्टात नेमके हेच मत व्यक्त केले आहे. त्या समितीने लेबर कमिशनर व कामगार मंत्रालयालाही परिस्थिती स्फोटक बनत असताना वेळीच हस्तक्षेप न केल्याबद्दल जबाबदार ठरले आहे.

आमदार दत्ता सामंतांचे नेतृत्व गोदरेजमध्ये येऊन परिस्थिती हाताबाहेर जाईपर्यंत, शासन, पोलीस, मुंबई कॉंग्रेस व इंटकचे पदाधिकारी स्वस्थपणे बघ्याची भूमिका बजावत राहिले ही वस्तुस्थिती आहे. नंतरही गोदरेज चालकांनी सामंत-युनियनबद्दल ताठर भूमिका घेतली, सामंत-कृष्णा जोशींनी भडक भाषणे करून वातावरण तापवायला मदत केली. तरीही पोलीस, शासन व मुंबई कॉंग्रेस स्वस्थ बसले हेही कटू सत्य आहे. गोदरेजमधल्या

आधीच्याच असंतोषाने साहजिकच भडक स्वरूप धारण केले; हिंसात्मक वळण घेतले. परंतु याचे नीट आकलन व्हायला आधी कामगारांतल्या असंतोषाची कारणे समजून घेतली पाहिजेत. त्यासाठी गोदरेज कारखान्यांच्या इतिहासात थोडे डोकावून पाहिले पाहिजे.... ◻

## २ : गोदरेज परिसर – एक सापळा

गोदरेज परिसर! विक्रोली स्टेशन ते पश्चिमेकडे खाडी एवढा अवाढव्य पसरलेला. गोदरेज सोप्स व केमिकल, गोदरेजबॉईस इंजिनियरींग उद्योग, त्यातल्या कर्मचाऱ्यांच्या वसाहती, औद्योगिक वसाहतीसाठी राखून ठेवलेली जागा आणि शिवाय शेकडो एकर पडिक खाजण जमीन. जवळ जवळ चार हजार एकर जमिनीवर गोदरेजचा हा पसारा आहे. पुढच्या पन्नास पाऊणशे वर्षात, गोदरेज कारखान्यांची आजच्या सारखीच वाढ होत गेली तरीदेखील गोदरेजला नवी जागा शोधायची आवश्यकता नाही. ईस्टर्न एक्स्प्रेस हायवेच्या दोन्ही अंगाला हा परिसर आहे आणि त्या परिसरात, चारी बाजूंनी 'गोदरेज'नी वेढलेले छोटेसे मूळचे विक्रोळी गाव आहे ह्या गावाने विक्रोळीच्या परिसरातली गोदरेजची पहिली सुरुवात पाहिली. किंबहुना ह्या गावकऱ्यांपैकीच कित्येकाकडे, आज 'गोदरेज' उभ्या असलेल्या जमिनीची मूळ मालकी होती. स्वतःच्या जमिनीवर फुललेला 'गोदरेज' मात्र ही मंडळी आपापल्या अंधारल्या घरातून आजही पाहात आहेत. मूळची कोळी आदि मंडळी व परंपरागत गावकरी आजही अर्धपोटी आहेत त्यांच्या मुलांनादेखील गोदरेजमध्ये नोकऱ्या मिळालेल्या नाहीत असे गावकरी सांगतात ते आणखीही बऱ्याच हकिकती सांगतात. मूळातली सुमारे साडेसहाशे एकर जमीन दोन आणे वारानी कशी मिळवली, नंतर खाजण जमिनीवर कब्जा कसा मिळवला वगैरे वगैरे अगदी अलिकडेच महाराष्ट्र विधानसभेत, लोकशाही समाजवादी आघाडीच्या आमदार ए. टी. पाटील ह्यांनी, ही खाजण जमीन व इतरही जमीन गोदरेजनी हरप्रयत्नांनी, जवळजवळ फुकटात पाडून घेतली व तिथल्या मूळ रहिवाश्यांना फसवले' असे आरोप केले होते ज्या जमिनीवर हा प्रचंड विस्तार उभा आहे, त्या केवळ जमिनीचीच किंमत १०० कोटी रुपयांच्यावर होईल असेही आमदार महाशयांनी सांगितले. गोदरेज कारखानदारीबद्दलही त्यामुळेच काहीसा आकस मला मूळ गावकऱ्यात आढळला. अर्थात त्यातले बरेचसे दारूच्या

धुंदीत सर्वच विसरतात हे वेगळे !

आजच्या भव्य परिसरात गोदरेज प्रथम आले ते १९५२ च्या सुमारास. परंतु प्रत्यक्ष कंपनीची स्थापना मात्र खूप जुनी आहे–१८९५ च्या सुमारास लालबाग विभागात छोटयाशा वास्तूत ही कंपनी सुरू झाली. गोदरेजच्या ह्या मूळ वास्तूत आजही कंपनीचे व्यवहार चालू आहेतच. सुरुवातीला, घोडयांच्या नाला, कुलपे, फर्निचर बनविणाऱ्या ह्या छोटयाशा कारखान्याला १९४२ च्या दुसऱ्या महायुद्धाने संपन्न बनवले. स्वातंत्र्योत्तर काळातल्या औद्योगिकरणाऱ्या लाटेनेही ह्या कारखान्याच्या समृद्धीला हातभार लावला आणि बघता बघता छोटयाशा कारखानदारीतून प्रचंड उद्योगवृक्ष फोफावला. एक मोठे संस्थान आज इथे उभे आहे. गोदरेज कारखान्यांतून आज कपाटे, फर्निचर, रेफ्रिजरेटर्स, टाईपरायटर्स, फोर्कलिफ्ट्स्, वगरे असंख्य उत्पादने मोठ्या संख्येने आज बाहेर पडताहेत. दैनंदिन उलाढाल दहा लाखांपेक्षा अधिक आहे. जमिनीव्यतिरिक्तची इतर मालमत्ता १२५ कोटींच्या घरात आहे. सहा हजारांहून अधिक कामगार इथे राबताहेत आणि त्यांचे एकूण दैनंदिन वेतनच लाखाच्या घरात आहे.

विक्रोळीच्या नव्या वास्तूत गोदरेज कारखान्यांचा व्याप वाढत असतानाच, तिथल्या कामगारांसाठी घरे बांधण्यात आली. कामगारांच्या मुलांसाठी सुसज्ज शाळा सुरू करण्यात आली. एक प्रगती केंद्र सुरू केले गेले. ह्याखेरीज खुद्द गोदरेज शेठच्या अध्यक्षतेखाली क्रेडीट को. ऑप. सोसायटी निर्माण झाली. पुढे ह्या सोसायटीच्या अध्यक्षपदावर, कोर्टाच्या निर्णयानुसार मालकांना राहता आले नाही, त्यावेळी प्रत्यक्ष कंपनीतर्फे कामगारांना त्यांच्या अडीअडचणीच्यावेळी कर्ज मिळू लागले. गोदरेज कामगारांचे पगारही बरे होते. गेल्या वीस वर्षांच्या काळात गोदरेज कारखान्यात संप नव्हते. फारशी तणातणी नव्हती. फार काय सुरुवातीला कामगारांची संघटना असायलाही श्री. नविन गोदरेज ह्यांनीच प्रोत्साहन दिल्याचे सांगितले गेले. एकूण बाहेरच्या जगाला तरी गोदरेज कामगार एक सुखी कामगार वाटत होता. बरे पगार, राह्यला कंपनीचे घर, बऱ्या सवलती, शाळा, प्रगति केंद्राद्वारे कामगारांच्या स्त्रियांना जोडधंद्याची सोय–इंटकच्या कळपातला हा कामगार म्हणूनच बाहेरच्या जगाला सुखी वाटत होता !

गोदरेज परिसरात पाऊल टाकताना माझ्याही मनात असेच विचार घोळत होते. ७५–८० वर्षांच्या गोदरेज कारखान्यांच्या इतिहासात कामगारांचा उद्रेक असा फारसा कधी ऐकिवात नव्हता. माझ्या ह्या कल्पना तिथल्या कामगार वर्गात मी बोलून दाखवल्या आणि एकेक कामगार भडाभड बोलू लागले...

...'ही कॉलनी सुंदर खरीच आहे बांधलेली. पण तो आहे एक सापळा. अडकलात की गेलात...'

'...शाळा आहे कॉलनीत. पण खरं

तर ते आहे फॅमिली प्लॅनिंग सेंटर... तिथे मुलांना पढवले जाते 'बापाला जाऊन सांग दत्ता सामंतच्या नादी लागू नको . मुलांकरवी निरोप पाठवले जातात मॅनेजमेंट पुढे शरण गेलात तर सर्व भले होईल...'

'...प्रगती केंद्र आमच्या बायकाना रोजगार पुरवते; पण वर्षानुवर्षे त्यांना कॉंट्रॅक्ट पद्धतीवरच राबवून घेतात त्याचे काय ! प्रगती नाही, शोषण केंद्र आहे ते...'

'...तुम्ही शेठचा 'चमचा' व्हा तुम्हाला ताबडतोब कारखान्यातून कर्ज मिळेल...हवे तर दुसऱ्या 'चमचा' सोसायटीतून मिळवून दिले जाईल... कर्ज, बढत्या, सारे मिळेल फक्त तुम्ही त्यांचे 'चमचा' बना, 'खबऱ्या' बना !...'

मी त्यांच्याशी बोलू लागलो, कॉलनीतून हिंडू लागलो, इतरत्र माहिती गोळा करू लागलो तेव्हा त्यांच्या ह्या असंतोषाला बरीचशी वास्तवता असल्याचं मला जाणवले. त्यांचा घुस्सा अनाठायी नव्हता. ह्या मंडळींशी बोलल्यानंतर जी माहिती मिळाली ती अशी

इथे प्रथमपासून प्रबळ अशी युनियनच नव्हती. आल्या त्या युनियन्स सगळ्या मालकांच्या इषाऱ्यावर काम करणाऱ्या होत्या. सुरुवातीला कामगारांची क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी स्थापली गेली ती देखील मालकाच्या अध्यक्षतेखाली. पुढे कोर्टाच्या आदेशानुसार मालकाला अध्यक्षपद सोडावे लागले तेव्हा मालकाच्या आशिर्वादाने दुसरी क्रेडिट को-ऑप. सोसायटी अस्तित्वात आली. त्यातूनही बाहेर राहणाऱ्या 'योग' कामगारांना कंपनीतर्फे परभारे कर्ज मिळण्याचीही सोय झाली. अर्थातच अशी जी कर्जं मिळायची त्या मेहेरबानीची भरपाई मालक करून घेणारच. अशी अडलेली मंडळी साहजिकच मालकाला पसंत नसणाऱ्या युनियनपासून दूर रहात. किंबहुना तिच्या विरोधातच राहात. ह्याच मंडळींतर्फे युनियनच्या बित्तंबातम्या संचालकांना मिळत; आणि युनियनमध्ये फाटाफूटही पडायची. मालकांनी त्यातही हव्या तशा युनियन्स आणण्याचे सतत प्रयत्न केले. ह्या कामासाठी राणेहळदणकर कदम ह्या कामगार त्रयीचा त्यांनी मनःपूत उपयोग करून घेतला. कामगारांच्या ह्या कामगारत्रयीवरील आरोपाला मात्र सर्वांचा पाठिंबा असल्याचे मला दिसले. शिवसेनाप्रमुख, कम्युनिस्ट युनियचे कॉ. यार्दी, आमदार तुषार पवार, आ. टेंबे, सामंतांचे एक निकट सहकारी श्री. आर. के. ठाकूर आदी सर्व परस्पर विरोधकांचे ह्या बाबतीत एकमत दिसले. राजा कुलकर्ण्यांच्या युनियनला ही त्रयी जवळची होती; तशीच ती भारतीय कामगार सेनेच्याही जवळ पोचली होती. कामगार सेना जड होताच ती तोडायलाही तेच पुढे आले. आयटक संघटनेलाही त्यांनीच तडे दिले आणि ह्या झगड्यातल्या प्रमुख व्यक्तीला प्रभाकर कुंटयांनाही त्यांनीच हात दिला. ज्या 'बोनस' करारामुळे कामगारात

असंतोष माजला तो करारही ह्याच त्रयीने घडवून आणला असे उघड बोलले जाते.

कामगार संघटनांच्या प्रश्नावरून जसा असंतोष कामगारात होता तसाच तो इतर तथाकथित 'सवलतीं'वरून-देखील होता. ह्या सवलतीदेखील काम-गारांना आपल्या मुठीत ठेवण्यासाठी, त्यांच्यावर अधिकाधिक बंधन घालण्या-साठी संचालक वापरतात असा काम-गारांचा आरोप आहे. कामगारांना पुरवलेल्या वसाहतींचेच उदाहरण घ्या. एका कामगाराला एक घर इथे नाही तर एकेका घरात (दोन-तीन खोल्यांची घरे!) दोन-तीन कामगार कुटुंबे मात्र आहेत. 'ब्लॉक'च्या एकाच प्रवेशदारा-तून दोन्ही-तिन्ही बिऱ्हाडांची जा-ये असते आणि एकेका 'ब्लॉक'मधले सहनिवासीदेखील कामगारांच्या निवडी-प्रमाणे नसतात, तर मालकाच्या मर्जी-प्रमाणे ठेवलेले असतात. हे कामगार-देखील बहुधा भिन्न भाषिक, भिन्न जातीय असतात. त्यातला एक बहुतेक युनियनचा सभासद असतो तर दुसरा बहुश: मॅनेजमेंटचा तथाकथित 'चमचा' असतो. गोदरेज वसाहतीतल्या अशा तऱ्हेच्या व्यवस्थेचा साहजिक परिणाम वेगळा सांगायला नको. कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना त्यामुळे खाजगी आयुष्य उरत नाही. आपसातली भांडणे, एकमेकांच्या चुगल्या त्यामुळे अपरिहार्य ठरतात. कामगारांना दिलेली सवलत त्यांच्याविरुद्ध कशी पद्धतशीरपणे वापरली जाते त्याचे हे 'फर्स्ट-क्लास' उदाहरण ठरावे.

कामगारांच्या खाजगी जीवनाची ह्या वसाहतीत कशी कुचंबणा होते ह्याचे एक बोलके उदाहरण मला इथे ऐकायला मिळाले. ह्याला पुढे सौ. प्रेमाताई पुरव ह्यांच्याकडूनही पुष्टी मिळाली. एका कामगार पत्नीचे दिवस भरले होते. प्रसुतीसाठी दवाखान्यात जाण्याचीही तिला सवड मिळाली नव्हती आणि अशा कठीण परिस्थितीच्या वेळी, तिच्या 'ब्लॉक'मधल्या इतर बिऱ्हाडांची जायची यायची वाटही तिच्या खोली-तनंच होती. साधा आडोसाही तिला उपलब्ध नव्हता. शेवटी पलंगाभोवती चारी बाजूंनी पातळे गुंडाळून तात्पुरता आसरा निर्माण करावा लागला!

दुसरी तक्रार ह्या वसाहतीतल्या जागांबद्दल ऐकू आली ती भाड्या-संबंधांतली. गाळा प्रत्यक्ष तिथे राहणाऱ्या दोन-तीन भाडेकरूंपैकी एकाच्याच नावाने असतो. इतरांनी आपले भाडे ह्या मुख्य भाडेकरूला द्यायचे आणि संपूर्ण भाडे ह्याच्या पगारातून कंपनीने कापून घ्यायचे. हे 'पोट-भाडेकरू' पुढे पुढे भाडी देत नाहीत आणि प्रमुखाला मॅनेजमेंटकडे धाव घ्यावी लागते. भांडणांना तिथेच प्रारंभ होतो! ह्याखेरीज, काही दुरुस्ती असली की त्याचे पैसे वारेमाप पद्धतीने कामगारांच्या पगारातून कंपनी कापून घेते ह्या पद्धतीवर एक कामगार तावातावाने म्हणाला, '...कामगारां-साठी कॉलनी बांधत असताना सतत तीन-चार वर्षे कामगारांना बॅलन्सशीट-

नुसार बोनस द्यायला टाळाटाळ केली. कारण काय तर म्हणे कामगारांसाठी घरे बांधायची आहेत ! घरांची भाडी घेतेय् कंपनी. दुरुस्तीची पै न् पै वसूल करते आहे. शिवाय कटकटी आहेत त्या वेगळ्याच !...'

कामगारांच्या मुलांसाठी गोदरेज परिसरातच असलेल्या शाळेविषयी तर गमतीदारच हकिकती ऐकायला मिळाल्या. कारखान्यांचे संचालक श्री. नवीन गोदरेज हे कुटुंब नियोजनाचे म्हणे खंदे पुरस्कर्ते आहेत आणि ह्या शाळेतर्फे कामगारांवर कुटुंब नियोजन लादायचा ते प्रयत्न करतात म्हणे. कामगाराला तीन मुले असेपर्यंत, त्याच्या मुलांना इथल्या शाळेत प्रवेश मिळतो. चौथे मूल झाले रे झाले की, त्याच्या पहिल्या मुलाला शाळेतून काढले जाते. (मागे मी जं एक स्त्री घरीच प्रसूत झाल्याचे लिहिले तो, संचालकांपासून चौथं मूल लपवून ठेवायचा प्रयत्न असल्याचेही मला सांगितले गेले ) मग त्याला इतर सवलतीही मिळत नाहीत. मुलांना टागोरनगर, कन्नमवार नगर वगैरे ठिकाणच्या दूरदूरच्या शाळेतून जावे लागते. ह्यावर कडी म्हणजे, मुलांकडूनच त्या कामगाराला नसबंदी करून घेण्यासंबंधीचे निरोप पाठवले जातात. आ. तुपार पवारांनी जेव्हा इथल्या युनियनचे काम हातात घेतले होते तेव्हा ह्याविरुद्ध आवाज उठवला होता. शासनाकडून काही आदेशही संचालकांना आले होते. परंतु हे सर्व आदेश धाब्यावर बसवून, मालकांचे हे 'त्रिकोण' कार्य आजही चालू आहे. ह्या शाळेतून कामगारांच्या आणि स्टाफच्या मुलांमध्येही भेद केला जात असल्याच्या तक्रारी ऐकू आल्या. दोहोंचा शैक्षणिक दर्जा वेगळा राखण्याचा प्रयत्न केला जातो. शाळकरी मुलांमार्फत आपल्या वडिलांना बेमुर्वतखोर निरोपही धाडले जातात म्हणे. 'दत्ता सामंतच्या नादी लागू नका', 'बोनसची रक्कम घ्या, मालक सांगतील तसे वागा; त्यातच तुमचे भले आहे', 'युनियनशी संबंध ठेवू नका' हे त्यातलेच काही मासलेवाईक निरोप !

इथे आस्तित्वात असलेल्या 'प्रगती केंद्रा' विषयीच्या हकिकती निराळ्या नाहीत. इथे कामगारांच्या स्त्रियांना जोड उद्योग मिळून ज्यादा उत्पन्नाची सोय आहे. गोदरेज कारखान्यात तयार होणाऱ्या खुर्च्यांवर वेत विणायचे काम इथे स्त्रियांना दिले जाते. साधारणत: महिना ३०-४० रुपये एकेका स्त्रीला मिळतात. ह्या प्रकाराबद्दलही कामगारात असतोष आहे. तो अशासाठी की हे काम वर्षानुवर्ष चालू आहे. ह्या स्त्रिया ते कित्येक वर्षांपासून करीत आहेत. परंतु ते काम 'काँट्रॅक्ट' पद्धतीनेच चालू आहे. ह्या कामगार स्त्रियांना वास्तविक कायम कामगारांसारख्या सवलती मिळायला हव्यात. बोनस, रजा, महागाई त्यांना मिळायला हवी. पण त्याऐवजी, अत्यल्प मोबदल्यात त्यांना राबवून घेतले जाते. त्यातही 'चमच्यां'च्या बायकांना काम, पैसा अधिक मिळतो ही तक्रार आहेच.

कामगारांमधल्या भांडणांना इथेही पद्धतशीरपणे खतपाणी पुरवले जाते.

कामगारांच्या ह्याशिवायही अनेक तक्रारी आहेत. त्यांना त्यांच्या मना-प्रमाणे झाडे लावायची इथे सोय नाही, बोलायची सोय नाही. कुठल्या कामगाराच्या घरात कुठली भाजी होती इथपासूनचे सारे बारीक सारीक तपशील मॅनेजरपाशी असतात थोड-क्यात ही वसाहत एक 'सुंदर सांगाडा असलेला सापळा आहे.' त्यात जवळ-जवळ सहा हजार कामगार व त्यांचे कुटुंबीय अडकले आहेत. त्यांनी रहावे कसे, वागावे कसे, त्यांचे खाजगी जीवन असावे कसे, त्यांनी युनियन कुठली स्वीकारावी, खावे काय, बोलावे काय, नियोजन करावे कसे, वगैरे वगैरे प्रत्येक बाबतीत गोदरेज संचालकांना आपले मत अखेरचे असावे असे वाटते! गुलामगिरीचा हा नवा अविष्कार असावा का? निदान कामगारांना तरी तसे वाटते. त्याविषयी त्यांच्या मनात आत्यंतिक चीड आहे हेही तितकेच खरे!

कामगारांची ही आत्यंतिक चीड —— त्यांच्या जीवनातल्या प्रत्येक अंगावर हुकमत चालवायची चालकांची इच्छा —

गोदरेज जंजाळांत ह्या द्वंद्वानेही महत्त्वाची कामगिरी बजावली आहे!! ◻

## ३ : युनियन्स! युनियन्स!!

१८९५ च्या सुमारास स्थापन झालेल्या ह्या कंपनीत काम-गारांची पहिली संघटना अस्तित्वात यायला १९४० साल उजाडले त्यावेळी कंपनी गिरणगावात होती. बाजूचा गिरणगाव बहुतांशी 'लाल बावटा' युनियन्सनी व्यापलेला होता. तोच युनियन इकडेही आली. १९४७ च्या सुमारास इथले कामगार कॉ. के. नी. जोगळेकरांच्या इंजिनियरिंग वर्कर्स युनियनमध्ये सहभागी झाले आणि महागाईभत्ता वाढवून घेण्यासाठी त्यांनी १५ दिवसांचा संप केला. महागाईभत्ता वाढ पदरात पाडून घेतली. गोदरेज कारखान्यांच्या इतिहासातला हा बहुधा पहिलाच लढा असावा!

१९५२ मध्ये गोदरेजमधलेच एक कामगार श्री. कुंजू सीताराम ह्यांनी इंटक युनियनची स्थापना केली. ह्या खेरीज संचालकांच्या मर्जीतली एक युनियन होतीच. तिच्याशी क्रेडिट को. ऑप. सोसायटीची सांगड घालून दिली गेल्याने कामगारांना ह्या शेठच्या युनियनचेच सभासदत्व पत्करावे लागा-यचे. परंतु ह्या युनियन व सोसायटीचे अध्यक्षपद मालकाकडे असणे काम-गारांना पटणारे नव्हतेच. त्यांनी कोर्टात प्रकरण धसास लावले. अध्यक्षपद माल-

काना सोडावं लागले आणि गोदरेज ॲण्ड बॉईस युनियनचे आणि सोसायटीचे नेतृत्व कॉमरेड सुंदरम ह्याच्याकडे गेले. आजतागायत सोसायटी लाल बावटयाकडेच आहे. कम्युनिस्ट युनियनशी बोनसचा (सव्वादोन महिन्यांचा) करार देखील मालकांनी केला. पुढे ह्या लाल बावटा युनियनशी मालकाचे पटले नाही. मालकांनी त्यावेळी इंटकला उचलून धरले आणि इंटक संलग्न इंजिनियरिंग वर्कर्स असोसिएशनशी करार केला. ह्या कराराला अर्थातच कम्युनिस्टांनी विरोध केला आणि गोदरेज इतिहासात प्रथमच इंटक-आयटक संघर्ष निर्माण झाला. ९ डिसेंबर १९६० ला ह्या कराराच्या निषेधार्थ कम्युनिस्ट युनियनने एक दिवसाचा संप केला. तरीही मालक इंटकशीच करार करतात हे आढळून आल्यावर १७ डिसेंबर १९६० ला कामगार बेमुदत संपावर गेले. त्यांच्या ह्या संपाला यश आले नाही. आणि इथून पुढे इंटक संलग्न इंजिनियरींग वर्कर्स असोशिएशन हीच प्रतिनिधिक कामगार संघटना बनली. कम्युनिस्ट सोसायटीचा व्यवहार पहात असले तरी त्यांची गोदरेज ॲण्ड बॉईस वर्कर्स युनियन इथून पुढे मागेच पडली. नेतृत्व सध्याचे नवकाँग्रेस खासदार राजा कुलकर्णी ह्यांचेकडे गेले. जवळ जवळ १९७१ पर्यंत नेतृत्व त्यांच्याचकडे राहिले. त्यांनी आपल्या कारकीर्दीत मॅनेजमेंटशी तीन करार केले. त्यात कामवाढीच्या बदलात वेतनश्रेणीही वाढवून घेतली होती. ते लोकसभा निवडणुकीला उभे राहिले आणि नेतृत्व श्री. तुषार पवारांकडे गेले. तेही पुढे आजारी पडले. मध्यंतरी इंटक पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गोदरेजमधलेच कामगार पुढारी श्री. अनंत देसाई संघटनेचे काम पहात होते. त्यांनीच पुढे श्री. प्रभाकर कुंटेंना १९७२ च्या सुरूवातीला कंपनीत पाचारण केले.

मध्यंतरीच्या काळात शिवसेनेने भारतीय कामगार सेनेची युनियन गोदरेजमध्ये आणण्याचा प्रयत्न केला श्री. बाळासाहेब ठाकऱ्यांच्या सांगण्यानुसार राणे-हळदणकर-कदम ह्या त्रिकूटाने भारतीय कामगार सेनेला गोदरेजमध्ये बोलावले होते परंतु सेनेला ठेवून मालकांचे हित साधता येणार नाही हे दिसताच ह्याच त्रयीने सेनेची युनियन मोडण्यातही पुढाकार घेतल्याचे शिवसेना प्रमुखांनी मला सांगितले. ही त्रयी शिवसैनिक असल्याच्या वदंतांचा स्पष्ट इन्कार करून श्री. बाळासाहेबांनी सांगितले, 'उलट ७२ च्या विधानसभा निवडणूकात हे तिघे डॉ. सामंतांचाच प्रचार करीत विक्रोळीभर हिंडत होते! गोदरेजचा असा एकदा अनुभव आल्यावर तिकडे पुन्हा फिरकायचे आम्हाला कारण नव्हते. चालू संघर्षात आम्हाला शिवसेनेची युनियन तिथे प्रस्थापित करायची असती तर मनोहर जोशींऐवजी आम्ही तिथे दत्ता साळवींना पाठवले असते. परंतु आमचा तसा तिथे काहीही उद्देश नव्हता. आमचा संबंध होता तो फक्त गोदरेजमध्ये असलेल्या

शिवसैनिकांपुरताच. त्यांना होत असलेल्या मारहाणी पुरताच डॉ. सामंतांच्या युनियनमध्ये केवळ काम करायचे नाकारले म्हणून अशी मारहाण होत होती. घाडीगावकरच्या घरावर हल्ला झाला तोही अशाच प्रकारातून ! अर्थात त्याच्यावर झालेला हा पहिला हल्ला नव्हता. घाडीगावकरला बघायला जाणे शिवसेनेचे आमदार, नेते म्हणून आमचे कर्तव्य होते. तसे आम्ही गेलो. कामगारांच्या झगड्याशी आम्हाला काहीच कर्तव्य नव्हते. खरा मीच जाणार होतो; पण मला सभा होती म्हणून जोशी गेले. रात्री जाणार होते पण त्यांना दुपारी जायला मी सांगितले. धोका नको म्हणून जाताना पोलिस संरक्षण घेऊन गेलो कट करून दंगल माजवायसाठी जाणारा पोलिसांना घेऊन जाईल का ? तुम्हीच सांगा ! ...' शिवसेना प्रमुख घडाघड बोलत होते...

गोदरेजमधल्या युनियन्सच्या इतिहासात शिवसेनेच्या कामगार सेनेचं अस्तित्व असं थोडेसेच होते आणि पुढेही तिथल्या कामगार चळवळीशी सेनेचा फारसा संबंध आला असावा असे मला वाटत नाही. गोदरेज कामगारांना अर्थात तसे वाटत नाही. शिवसेनेचे भांडुपचे नेते रा. वि पडवळ ह्यांच्या हालचाली त्यांना त्या दृष्टीने संशयास्पद वाटतात. विधानसभा निवडणुकांत ते डॉ. सामंतांचे प्रतिस्पर्धी होते. त्या पराभवाचे उट्टे काढायसाठी ते टपून बसले होते असेही मला सांगितले गेले. त्यांच्या आणि गोदरेज चालकांच्या गुप्त बैठका होत, असाही आरोप कामगारांनी केला. स्टाफ युनियन पूर्वी कामगार युनियन बरोबरच होती. परंतु जून १९७२ मधल्या लॉक-आऊट नंतर ती वेगळी झाली. त्यातही रा. वि. पडवळांचा हात असावा असे अनेकांनी सांगितले. शिवाय, कामगार संघटनाही तोडून काढायचा त्यांचा प्रयत्न होता. त्यासाठी विक्रोळी प्रकरणाच्या आधी ८।१५ दिवस ते सतत गोदरेज कॉलनीत हिंडत असल्याचे अनेकांनी मला सांगितले. श्री. पडवळांची भेट मी घेऊ शकलो नाही. परंतु बाळासाहेब ठाकऱ्यांनी ह्या संबंधात त्यांच्या वतीने खुलासा केला. गोदरेज कॉलनीत श्री. पडवळ हिंडत होते हे त्यांनी मान्य केले. इतर आरोप मात्र त्यांनी फेटाळून लावले. त्यांच्या मते. 'डॉ. सामंत युनियन आल्यावर त्यांच्या अनुयायांनी व लाल साथींनी गोदरेज कॉलनीत दहशत निर्माण केली होती. युनियनच्या प्लॅटफॉर्मवर जायला नाकारणाऱ्यांना धाक दपटशा सुरू झाला होता. त्यामुळे शिवसैनिकात घबराट निर्माण झाली होती. तेवढ्याचसाठी त्यांना भेटायला, तथाकथित इतर शिवसैनिकांच्या हालचाली मला कळवायलाच फक्त श्री. पडवळ गोदरेज कॉलनीत जात होते. स्टाफ युनियन वेगळी करायला श्री. मालंडकर ह्या स्टाफ कर्मचाऱ्यांनी विरोध दर्शवला होता. त्यांना फोर्टमध्ये, विक्रोळी प्रकरणाच्या आधी काही दिवसच मोठी मारहाण झाली होती. त्यांनी अनंत चिकणे व रामू घाडीगाव-

कर ह्या दोघांवर संशय घेतला होता. शिवसेना नेत्यांनी त्या गोष्टींचा साफ इन्कार केला. ह्या प्रकरणात चौकशी व्हावी असेच ते म्हणाले.'

गोदरेजमध्ये शिवसेना अशी आली आणि गेली. पण इंटक व आयटक संघटनांचे काम चालूच होते. नेते फक्त बदलत होते. श्री. तुषार पवारांच्या आजारपणामुळे इंटक नेतृत्वहीन बनली होती. १९७२ च्या अखेरीस त्यामुळे इंटक युनियनमध्ये अंतर्गत संघर्ष वाढू लागला. खासदार झाल्यावर श्री. राजा कुलकर्ण्यांनीही गोदरेज कामगारांकडे दुर्लक्षच केले आणि आपसातले झगडे वाढू लागले तेव्हा गोदरेजमधील इंटक कामगारांनी कुणाकडे तरी धाव घेणे अपरिहार्य होतं. इंजिनियरींग वर्कर्स अॅसोसिएशनचे जनरल सेक्रेटरी त्यावेळी श्री प्रभाकर कुंटे होते. गोदरेज संघटनेचे सेक्रेटरी श्री. अनंत देसाई, J. P. यांनाच भेटले आणि श्री. प्रभाकर कुंटे गोदरेज कामगारांचे नेते बनले.

श्री. प्रभाकर कुंटे कुर्ल्याहून निवडून गेलेले कॉंग्रेस आमदार आहेत. तेही पूर्वाश्रमीचे समाजवादीच. परंतु आमदार दत्ता सामंतांच्या मानाने त्यांनी कमी पक्षबदल केले आहेत. एखादी गोष्ट त्यांनी मनावर घेतली तर ते करून जातात. पण रात्रीचा दिवस करून राबायचे त्यांना मानवत नसावे. इंजिनियरींग वर्कर्स अॅसोसिएशनचे जनरल सेक्रेटरी; पण इंटकमधल्या त्यांच्या बरोबरच्या इतर पूर्वाश्रमीच्या 'समाजवादी' मित्रांएवढे ते कडवट 'डावे' नाहीत. जहाल नाहीत. म्हणूनच असेल कदाचित पण सध्याच्या मुंबई प्रदेश कॉंग्रेस नेतृत्वाला ते फारसे 'आपले' वाटत नाहीत. ईशान्य मुंबईतल्या मोठमोठाल्या कंपन्यातल्या युनियन्स त्यांच्या नेतृत्वाखाली होत्या. पण मे-सप्टेंबर ७२ ह्या काळातल्या झंझावातात त्या त्याच्या हातातून निसटल्या. त्यांचे नेतृत्व 'थिटे' पडले असावे तिथे. कदाचित ते 'आपले' वाटत नसल्याने त्यांची उचलबांगडी करायचा प्रयत्नही झाला असावा. निदान खुद्द श्री. कुंट्यांना तरी तसे खासच वाटत असावे. डॉ. सामंतांनी कम्युनिस्टांना बरोबर घेऊन आपल्याविरुद्ध उघडलेल्या आघाडीला रजनी पटेलांचा आशीर्वाद होता असे त्यांचे ठाम मत वाटते ए. पी. आय. मध्ये संप झाला. कामगार म्हणतात, प्रभाकर कुंट्यांनी संपावर जा म्हणून सांगितले होते. श्री. कुंटे म्हणतात मी फक्त संपावर जावे लागेल, यासाठी नोटीस देऊ असे म्हटले होते. प्रिमियरमध्ये काहीसा असाच प्रकार आहे. गोदरेजमधील बोनस करार ज्या कमिटीने केला तिला अनंत देसाई व युनियन कमिटीची संमती होती असे श्री. कुंटे म्हणतात. तर कुंट्यांनी कामगारांना विचारात घेतलेच नाही असे कामगार म्हणतात! ह्या एका मागोमाग घडलेल्या घटनांमुळे ईशान्य मुंबईतल्या कामगार जगात कुंटे पार बदनाम झाले आहेत ही मात्र वस्तुस्थिती आहे.

आणि योगायोग असेल कदाचित. पण अशा तऱ्हेच्या उद्रेकांमध्ये कुंट्यां-

विरोधी आघाडीत बहुतेक सर्वत्र कम्युनिस्ट होते. आघाडीवर होते आ. दत्ता सामंत. ह्या क्षेत्रात आल्यापासून ते त्यांच्या मागे होते. ह्या नेतृत्वबदलाला श्री. रजनी पटेलांचे प्रोत्साहन होते असेही मानायला आधार आहे. 'कुटयांनी काही चुका केल्या आहेत.' असे त्यांनी श्री. टेंब्यांना सांगितले होते. गोदरेजमध्ये सामंत पुढे यायला लागल्यावर काही इंटक कार्यकर्ते कुटयांच्या वतीने श्री. पटेलांना भेटायला गेले तेव्हा ते अतिशय संतप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. 'सामंतांवर मी शिस्तभंगाची कारवाई करावी अशी तुमची अपेक्षा आहे की काय?' असेही चिडून त्यांनी ह्या शिष्टमंडळाला विचारले. सौ. वर्षा कुटे ह्यांनी इतर नेत्यांसमवेत श्री. पटेलांना भेटायची इच्छा दर्शविली असताही पटेलांनी भेट नाकारली होती. म्हणूनच कुटे विरुद्ध सामंत संघर्ष, इंटक अंतर्गत सुरू करण्यात, जोपासण्यात श्री. रजनी पटेलांचा मोठा हातभार लागला असावा असे मानावे लागते. मरगळ आलेले इंटकचे प्रस्थापित नेतृत्व झुगारून लावण्याचा कदाचित त्यांचा मानस असावा. कदाचित् महाराष्ट्र शासनाला कुटे जवळचे वाटतात म्हणूनही कुटयांवर रजनीभाईंचा रोष असावा. त्यांची व डांग्यांची चांगली मैत्री आहे. दत्ता सामंत गटात कम्युनिस्टही सामील होतात हेही त्यांना आवडले असावे. म्हणूनही कदाचित त्यांनी सामंतांना उचलून धरले असावे. ह्या सान्याची त्यांच्याशी चर्चा करायचं फार मनात होते. पण त्यांनी भेट टाळली. निदान मला तरी तसे वाटते. घरी फोन केला की एकदा उत्तर मिळे दहा मिनिटांनी फोन करा. दहा मिनिटांनी फोन केल्यावर उत्तर मिळाले, 'He is resting. Phone after half an hour.' अर्ध्या तासाने फोन केला. उत्तर. 'रजनीभाई has left for Congress House fifteen minutes back.' काँग्रेस हाऊसनी उत्तर दिले, 'रजनीभाई अद्याप घरीच आहेत. तिकडे फोन करा.'

घरून उत्तर, 'Please, phone at 8 P. M.'

मध्येच एकदा 'Mr. Rajni Patel is too busy.'

केवळ त्यांच्या फोनपायी चार-पाच रुपये उडाले. 'माणूस'कडेही मला मजकूर लौकर पाठवायचा होता. मग नाईलाजाने मी त्यांना भेटायचा विचार रद्द केला!

परंतु तरीही एक गोष्ट निश्चित आहे. दोन काँग्रेस आमदारांच्या नेतृत्वाच्या झगडयात श्री. रजनी पटेलांनी मध्यस्थी केली नाही; आणि एकप्रकारे विक्रोळीची दंगल घडायला त्यांचाच अप्रत्यक्ष हातभार लागला. मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष ह्या नात्याने त्यांची मध्यस्थीची जबाबदारी होती. परंतु भांडण त्यांनी वाढत जाऊ दिले. परिस्थिती स्फोटक बनत गेली. गोदरेज कारखान्यात टाळेबंदी झाली. तरीही त्यांनी हस्तक्षेप केला नाही आणि शेवटी विक्रोळीत भडकलेल्या भावनांचा स्फोट झाला.

—त्याचा फायदा कदाचित कट करून डॉ. सामंत व त्यांच्या अनुयायांनीही घेतला असावा. !

—कदाचित् शिवसेनेनेही घेतला असावा !!

—कदाचित् कम्युनिस्टांनी घेतला असावा !

—कदाचित् मालकांनी फायदा घेऊन बनाव घडवून आणला असावा !!

फायदा कुणीही घेतला असला तरी त्याच्या मुळाशी पहिली फार मोठी कर्तव्यच्युतीची चूक रजनी पटेलांची आहे ही वस्तुस्थिती आहे ! हे उत्तरदायित्व ते कदाचित् स्वीकारू इच्छिणार नाहीत. पण माझा नाईलाज आहे.

गोदरेजमध्ये कुंटयांचे नेतृत्व आले तेव्हाच कटकटींना सुरुवात झालेली होती. कुंटयांच्या म्हणण्यानुसार त्यांना सेक्रेटरी श्री. अनंत देसाई ह्यांच्याविषयी कामगारांत अविश्वास असल्याचे सुरुवातीलाच जाणवले. त्यांनी अनंत देसायांकडून कामाची सूत्रे काढून घेऊन तिथल्या कमिटीचे उपप्रमुख श्री. मास्टर ह्यांच्याकडे दिली. नवी कमिटी स्थापन केली. तिलाही श्री. अनंत देसायांनी मान्यता दिली. ह्या नव्या मॅनेजिंग कमिटीने मालकांशी बोलणी करण्यासाठी समिती नेमली. झालेला बोनस करार मॅनेजिंग कमिटीने मंजूर केला. अनंत देसायांचीदेखील ह्या कराराला संमती होती. ह्या करारावर सह्या झाल्या आणि श्री. कुंटे युरोपला रवाना झाले. ह्याचवेळी श्री. कुंटयांच्या म्हणण्यानुसार, श्री. देसाई अनपेक्षितपणे डॉ. सामंतांकडे झुकले आणि त्यांनी बोनस कराराला विरोध सुरू केला. आंदोलन उभे केले. २३ मेला कुंटयांच्या अनुपस्थितीत बोनस करारावर सह्या झाल्या. डॉ. सामंतांचे आंदोलन सुरू होते. धाकदपटशा, वातावरण तापवणाऱ्या गेट मिटींग्ज सुरू होत्या. तशाही वातावरणात २९ मेला 'बोनस' वाटप झाले—जवळजवळ सर्वांनी बोनस घेतलादेखील ! चळवळही सुरूच राहिली. श्री. कुंटे पुढे म्हणतात, 'ह्यावेळी मी श्री. रजनी पटेलांना मध्यस्थीची विनंती केली. परंतु प्रतिसाद मिळाला नाही... दत्ता सामंतांसाठी गोदरेजमधून संन्यास घ्यायचीही मी तयारी दर्शविली होती. पण त्यालाही प्रतिसाद मिळाला नाही...' श्री. कुंटयांच्या म्हणण्यानुसार बोनस करारात, त्या परिस्थितीत नावे ठेवण्यासारखे काहीही नव्हते. तथापि त्यात काही न्यून असल्यास त्याचे उत्तरदायित्वही आपल्याकडेच आहे हेही ते कबूल करतात.

ज्या ह्या बोनस कराराने गोदरेज कामगार एकदम बिथरले, त्यांनी डॉ. सामंतांकडे धाव घेतली तो हा करार होता तरी काय ? ह्या करारानुसार कामगारांना २३ % बोनस मिळणार होता. सध्याचे सर्वसाधारण सूत्र असे आहे, की मूळ पगार + महागाई ह्यावर बोनस आकारला जातो. महागाईचे हे प्रमाण आज बरेच जास्त आहे. क्वचित दिवशी ८।९ रुपयांपर्यंतही ते आहे. परंतु ह्या बोनस करारात मात्र फक्त रु. २·४० महागाई + मूळ पगार

एवढ्यावरच २३ % बोनसवर सह्या झाल्या होत्या. रूढ पद्धतीने हा २३% बोनस जेमतेम ८।९% च पडतो. कामगारांची ही शुद्ध फसवणूक होती. आणि ह्यालाच त्यांचा विरोध होता. त्यातूनच सगळे पुढचे रामायण उभे राहिले. □

## ४ : २६ मे ते १ सप्टेंबर

२६ मे, १९७२. डॉ. दत्ता सामंतांनी गोदरेजमालक व प्रभाकर कुंटे ह्यांच्यात झालेल्या करारांविरुद्ध लढ्याचे शिंग पुकारले. त्यांना, प्रभाकर कुंट्यांनी सत्ताभ्रष्ट केलेल्या श्री. अनंत देसाईंनी पाचारण केले होते. श्री. देसाई ह्यांची ज्या समितीला मान्यता होती, असे श्री. कुंटे म्हणतात, त्या समितीत होते कदम, राणे आणि हळदणकर! कामगार वर्गातले तेच कुप्रसिद्ध त्रिकूट! ह्या त्रिकूटाला कधीच कुठल्या कामगारांची संमती नव्हती असा कामगारांचा दावा. ह्या त्रयीने आणि श्री. रूस्तुम मास्टर व श्री. कुंटे ह्यांनी कारखानदारांशी केलेला बोनस करार रद्द व्हावा असा आग्रह कामगारांनी धरला. त्यासाठी ते आपल्या भागातले काँग्रेस आमदार म्हणून (युनियनही इंटकची म्हणून देखील!) डॉ. सामंतांकडे गेले. कामगारांकडून वा पकडल्या गेलेल्या पुढाऱ्यांच्या सहकाऱ्यांकडन नाही पण बी. पी. सी. सी. ला जवळचे असणाऱ्यांकडून मला थोडे वेगळे समजले. ए. पी. आय. गोदरेज, प्रिमियर वगैरे सर्वच ठिकाणी कामगारांमध्ये कुंट्याविरूद्ध असंतोष होता. ह्यातली काही मंडळी श्री. रजनी पटेलांकडे गेली. रजनीभाईंनीच म्हणे ह्या मंडळींना श्री. सामंतांकडे जायला सांगितले. ह्याचवेळी, कुंट्यांविरूद्ध सामंतांकडे जायचा सल्ला कामगारांना देण्याऐवजी मुंबईप्रदेश काँग्रेसचे प्रमुख ह्या नात्याने श्री. पटेलांनी कुंट्यांना बोलावून घ्यायला हवे होते. आवश्यक तर सामंतांनाही बोलावून घ्यायला हवे होते. तिथेच त्यांनी हा नेतृत्वाचा वाद मिटवायला हवा होता. परंतु त्याऐवजी सामंतांकडे जायचा सल्ला देऊन श्री. पटेलांनी अप्रत्यक्षत:च ह्या दोन काँग्रेस आमदारांमधल्या वादाला वाव दिला.

डॉ. सामंतांच्या नेतृत्वाखाली कामगारांचे आंदोलन सुरू झाले. कम्युनिस्टांनी ते आंदोलन उचलून धरले. प्रक्षोभक भाषणांनी गेट मिटींग्ज गाजू लागल्या. संयुक्त कृती समितीच्या व्यासपीठाची निर्मिती झाली. डॉ. सामंतांबरोबरच, कॉ. घुमे, कॉ. यार्दी वगैरे गोदरेज अॅण्ड बॉईस वर्कर्स युनि-

यन (लाल बावटा) चे नेतेही ह्या व्यासपीठावरुन दिसू लागले. वातावरण तापू लागले. त्या तणातणीतच, ह्या कृती समितीचा आदेश विरुद्ध असतानाही बहुतेक कामगारांनी बोनस स्वीकारला. ह्यावर कामगारांचे म्हणणे असे आहे की नेत्यांच्या आदेशानुसार दुपारी एक वाजेपर्यंत कुणीही बोनस घेतला नव्हता. पण नंतर मात्र कारखान्यांतून धाकदपटशा दाखवायला सुरुवात झाली. राणे–कदम–हळदकर–रुस्तुम मास्टर ह्यांनी धमक्या द्यायला सुरुवात केली. श्री. नवल गोदरेज ह्यांच्या म्हणण्यानुसार मात्र कामगारांवर कसलीही सक्ती केली गेली नव्हती. बोनस खुशीने घेतला. इतकेच नव्हे तर खुद्द श्री. अनंत देसाई, श्री. फ्रेडरीक आदी गोदरेज नेत्यांनीही बोनस घेतला ही वस्तुस्थिती आहे.

काही का असेना, कामगारांनी बोनस घेतला. संयुक्त कृती समितीचा तसा आदेश नसतानाही. ही वस्तुस्थिती होती. समितीच्या आदेशानुसार किमान काही प्रमुख नेत्यांनी तरी बोनस घ्यायला नको होता. सक्तीला प्रतिकार करण्याचे धाडस त्यांच्यात निश्चित होते असे मला वाटते. परंतु तरीही त्यांनी बोनस घेतला होता !

बोनस घेतला तरी, डॉ. सामंतांच्या नेतृत्वाखालील आंदोलन सुरूच होते. ८ जूनपासून त्यांची नियमित निदर्शने सुरू झाली. त्यातल्या मुख्य घोषणा अशा होत्या —'प्रभाकर कुंटचांनी केलेला करार रद्द करा.' 'कामगारांनी निवडलेल्या नेतृत्वास मान्यता द्या.'

'डॉ. सामंत झिंदाबाद !'

'प्रभाकर कुंटे मुर्दाबाद !' वगैरे वगैरे.

मॅनेजमेंटने ह्या निदर्शनांना दाद दिली नाही. १३ जूनला पुन्हा सभा झाली. त्या सभेत एक दिवसाच्या लाक्षणिक संपाचा निर्णय घेण्यात आला. सभेत इंटकचे गोदरेजमधले जनरल सेक्रेटरी श्री. अनंत देसाई ह्यांनी एक ठराव एकमताने पसार करून घेतला. 'श्री. प्रभाकर कुंटे यांचे नेतृत्व कामगारांना मान्य नाही. त्यांनी केलेले करार रद्द करावेत. डॉ. सामंतांनी ह्यापुढे गोदरेज कामगारांचे नेतृत्व करावे. ह्या ठरावाच्या प्रती श्री. देसायांनी मुंबई प्रदेश काँग्रेससह सर्वांना पाठवल्या. तरीही मालकांनी कुंटचांचे नेतृत्वच अधिकृत ठरवले. कामगार त्यामुळे अधिकच भडकले. १९ जूनला त्यांचा एक मोर्चा सचिवालयावर गेला. श्री. वसंतराव नाईकांना तिथे निवेदन देण्यात आले. परतताना मोर्चा मलबार हिलवरील श्री. नवीन गोदरेज ह्यांच्या वसाहतीवर गेला. कामगारांच्या व इतरही अनेकांच्या म्हणण्यानुसार डॉ. सामंत, श्री. अनंत देसाई व श्री. कृष्ण जोशी ह्या नेत्यांचा तिथे अपमान झाला. गुंडगिरीचा, मवालीगिरीचा त्यांच्यावर आरोप केला गेला. ही गोष्ट जेव्हा कामगारांना समजली तेव्हा ते चिडले. झाल्या. गोष्टीच्या निषेधार्थ २० जूनला एका दिवसाच्या संपाचा आदेश तिथेच दिला गेला.

हा संप १००% यशस्वी झाला. त्यानिमित्ताने झालेल्या सभेत, कॉ. यार्दींनी आपल्या युनियनच्या सभासदांना डॉ. सामंतांचे नेतृत्व स्वीकारायला सांगितले. गोदरेज अँण्ड बॉईस वर्कर्स युनियनचे कार्यही त्यासाठी कामगारांच्या एकीसाठी स्थगित ठेवायची घोषणा केली. अर्थात युनियनचे फारसे असे कार्य अलिकडे गोदरेजमध्ये नव्हतेच. वर्चस्व होते, प्रतिनिधित्व करीत होती ती इंटक संघटनाच !

ह्या एका दिवसाच्या संपानंतर गोदरेजमधले काम सुरळीत चालू झाले खरे, पण वातावरण तंगच होते. कामगारांच्या म्हणण्यानुसार, मालक-पोलिस आणि शिवसेनेच्या संगनमताने गोदरेज परिसरात दहशत जारी ठेवली गेली होती. युनियनच्या कार्यकर्त्यांना, नेत्यांना व सभासदांनासुद्धा धमक्या मिळत होत्या. मारहाण होत होती. श्री. अनंत देसायांच्या घरी देखील संशयास्पद माणसे त्यांची सारखी चौकशी करून जात होती. त्यांना गाठून मारायचाही प्रयत्न होता. ह्याचा प्रतिकार अर्थातच कामगार करीत होते. मालकांच्या 'चमच्या'च्या धमकावण्यांना बळी पडणाऱ्यांना परिस्थितीची जाणीव कामगार करून देत होते. त्यातूनच काही किरकोळ चकमकी उडत होत्या. श्री. कदम, शिवसैनिक श्री. घाडीगावकर ह्यांनाही तिथल्या कर्मचाऱ्यांनी समजवायचा प्रयत्न केला. गंमत अशी की, अशा वेळी श्री. अनंत देसाईच मध्यस्थीचे काम करीत. 'चमचा' कामगारांविरुद्ध भडकलेल्या इतर कामगारांना शांत करीत. कॉलनीतले आपसातले संघर्ष टाळीत पण संघर्ष टळल्यावर, भडकलेले कामगार शांत होऊन परतल्यावर, 'चमचा' कामगारांना मारहाण झाल्याच्या तक्रारी पोलिसात जात. नि त्यात नेमके श्री. अनंत देसायांचे नाव आरोपीच्या यादीत असायचे. श्री घाडीगावकरांना ह्यापूर्वी मारहाण झाली होती तेव्हाही अनंत देसायांचे नाव आरोपीत होते.'

'चमच्यां'च्या अशा तक्रारीमुळेच २३ जूनला रात्री १०॥ वाजता श्री. अनंत देसाईंसह सतरा प्रमुख कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. कामगारांच्या म्हणण्यानुसार, त्याच दिवशी गोदरेज संचालकांनी सुमारे दोनशे गुंड आणून ते कॉलनीभर ठिकठिकाणी पेरले. गुंडांना 'वॉचमेन'चे गेट पासेस दिले गेले. ह्या गुंडांकरवी कॉलनीभर दहशत पसरवायची, युनियन मोडून काढायची असा मालकांनी व्यूह रचलेला असावा. नेते व कार्यकर्ते अटकेत; कॉलनीभर वातावरण दहशतीचे. कामगार गोंधळले. त्यातच श्री देसायांच्या घरचा फोन बिघडलेला. शेवटी सौ. अलका देसायांनी डॉ. सामंतांकडे माणूस पाठवला आणि डॉ. सामंत रात्री १॥-२ वाजता गोदरेज कॉलनीत आले. विक्रोळी पोलिस स्टेशनवर त्यांनी आधी चौकशी केली होती. रात्री २ वाजता गोदरेज कामगारांची त्यांनी सभा घेतली. आश्चर्य हे की नुसत्या हाकेसरशी कामगार सभेला धावून आले. कॉलनीभर जागे झालेल्या

कामगारांनी मालकांचे लपलेले गुंड हेरले. त्यांच्या हातातली शस्त्रे ओळखली. कामगारांच्या जथ्यांनी ह्या गुंडावर हल्ले चढवले. काही सुराधारी गुंडांना पकडून विक्रोळी पोलिस स्टेशनच्या हवाली केले. पण पोलिसांनी म्हणे ह्या गुंडांविरुद्ध काहीही कारवाई केली नाही. ह्या मालकांच्या दहशतवादाचा निषेध म्हणून, २४ तारखेला कामगार कामावर गेले नाहीत.

आणि दहशतवादापासून स्टाफचे व गोदरेज कामगारांचे संरक्षण व्हावे म्हणून मालकांनी २५ जूनला सकाळी 'टाळेबंदी' जाहीर केली. मालकांचे म्हणणे तरी निदान तसे आहे. कामगारांच्या म्हणण्याप्रमाणे मात्र युनियन तोडायसाठी उचललेलेच ते एक पाऊल होते.

श्री. नवल गोदरेज ह्यांनी मात्र ह्या साऱ्या आरोपांचा इन्कार केलेला आहे. त्यांच्या मते, २३ जूनला प्रथमच डॉ. सामंतांनी काही मागण्या सादर केल्या तत्पूर्वी मॅनेजमेंट व कामगार ह्यांच्यात कसलाही वादावादी नव्हती. परंतु नंतर कामगारांनी बोनसही घेतला होता. नंतरचा लढा एकाएकी व अनपेक्षितपणे सुरू झाला होता. डॉ. सामंतांनी प्रथमपासूनच आक्रमक पवित्रे घेतले होते. कामगारांना भडकवत ठेवण्याचा प्रयत्न केला होता. 'करोना साहू' प्रमाणे एक-दोन खून झाल्याशिवाय मॅनेजमेंट सरळ येणार नाही' अशा तऱ्हेची विधाने त्यांना केलेली प्रत्यक्ष गोदरेज शेठनी म्हणे ऐकली होती. त्यांनीच दहशतवाद प्रस्थापित करून त्या बळावर कामगारांना आपल्या कह्यात घेतले. तंटेबखडे त्यांच्या अनुयायांनी वाढवले. मारामाऱ्या नित्याच्या होऊ लागल्या. अशाच मारामारीसाठी श्री. देसाई व इतरांना पोलिसांनी अटक केली. ह्या वाढत्या दहशतवादामुळे मॅनेजमेंट स्टाफच्या, युनियनविरोधी कामगारांच्या जीविताला धोका निर्माण झाला. गोदरेज मालमत्तेच्या सुरक्षिततेची हमी राहिली नाही. त्यातच दत्ता सामंतांनी गोदरेज शेठच्या घरावर मोर्चा नेला व तिथे, म्हणे ते त्यांच्याशी अत्यंत असभ्य पद्धतीने वागले. शिवाय एवढे करूनही त्यांनीच एक दिवसाचा संप केला. त्याच वेळेस मारहाणींना ऊत आला आणि म्हणूनच, सुरक्षिततेचा एक उपाय म्हणून गोदरेज कंपनीत टाळेबंदी पुकारणे आवश्यक ठरले. गोदरेज संचालक पोलिसांकडे ह्यासाठी गेले असता, कमिशनर प्रधानांनी श्री. नवीन गोदरेजना म्हणे असे सांगितले Let B. P. C. C. say who is the leader and the whole trouble will blow over.

श्री. नवीन गोदरेज ह्यांच्या म्हणण्यानुसार प्रभार कुंट्यांनी अनंत देसायांकडून अधिकार हिरावून घेतल्यामुळेच हा संघर्ष निर्माण झाला असावा. तद्वतच कुंट्यांच्या युरोप फेरीमुळेही गोदरेज कामगार जगात रान कुणालाही मोकळे राहिले. त्यातूनच ही फुटीरता बळावत गेली. त्यांना असेही वाटते की गोदरेज मध्ये जर उघड उघड कम्युनिस्ट

युनियन असती तर पोलिस, महाराष्ट्र शासन, कामगार मंत्रालय ह्यानी आजच्यासारखी नुसती बघ्याची भूमिका घेतली नसती. दोन काँग्रेसच्याच आमदारांच्या भांडणात मात्र ह्या सर्व खात्यांनी तटस्थता पाळली होती !

गोदरेजमधली ही टाळेबंदी २५ जून ते १३ जुलै १९७२ पर्यंत अंमलात होती. ह्यावेळी शासनाने मध्यस्थी केली. टाळेबंदी काळात देखील कामगारांची चळवळ सुरूच होती. निदर्शने चालूच होती. मजूरमंत्री व मुख्यमंत्र्यांकडे निवेदने धाडली गेली. पकडलेल्या कामगारांची मुक्तता व्हावी, कुंट्यांचा करार रद्द करावा व संयुक्त समितीशी मॅनेजमेंटने बोलणी करावी ह्या कामगारांच्या मागण्या होत्या. शेवटी रजनी पटेल, बी. पी. सी. सी. चे अधिकारी, मुख्यमंत्री व डॉ सामंत ह्यांनी एकत्र येऊन खल केला आणि ह्या अंतर्गत कलहावर तोडगा शोधून काढला गेला गोदरेजमधील इंटकचे नेतृत्व कुणाकडे असावे ते इंटक सभासदांनी गुप्त मतदानाने ठरवावे. निवडून येईल त्या नेतृत्वाशी गोदरेज मॅनेजमेंटने बोलणी करावीत. टाळेबंदी त्वरित उठवावी व कुठल्याही कामगाराला सूडबुद्धिने वागवले जाऊ नये हाच तोडगा. ह्यानुसार १३ जुलैला टाळेबंदी उठली.

ह्या टाळेबंदीच्या काळात दहशती वातावरण कायमच होते. कारखाना सुरू झाल्यावरही ते नतर तसेच होते. मारामाऱ्या, धमक्या सुरूच होत्या आणि अशाच तंग वातावरणात १३ ऑगस्टला निवडणुका घेतल्या गेल्या. कुंटे व त्यांच्या माणसांनी सपशेल माघार घेतली. डॉ. सामंतांची माणसे बिनविरोध निवडून आली. डॉ. दत्ता सामंत गोदरेज इंटक युनियनचे रितसर नेते बनले. डॉ. सामंतांच्या गोदरेज पराक्रमाची नोंद ईशान्य मुंबईने घेतली आणि ए. पी. आय., प्रिमियरचे कामगार डॉ. सामंतांकडे आले. ह्या ठिकाणी डॉ. सामंतांकडे नेतृत्व येऊ लागण्याची चिन्हे दिसत असतानाच, ह्या कंपन्यांतून लॉक आऊट व ले ऑफ दिले गेले. कामगारांच्या व डॉ. सामंतांच्या सहकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, डॉ सामंत मालकांना परवडणारे नव्हते. म्हणूनच, गोदरेजमध्येच त्यांना पद्धतशीरपणे ठेचण्याचे प्रयत्न सुरू झाले. युनियनफोड्यांचे, शिवसेनेचे, शासनाचे त्यासाठी साह्य घ्यायला सुरुवात झाली आणि त्यातूनच वेगवेगळ्या हिंसक घटना ह्या भागात घडत गेल्या. कामगारांना शिवसैनिकांनी मारावे, कामगारांनी त्याचा बदला घ्यावा हे प्रकार सुरू झाले. अर्थात शिवसैनिकांच्या मते ही क्रिया नेमकी उलटी होत होती. काही शिवसैनिक युनियनचे (सामंतांच्या !) काम करीत नाहीत म्हणून त्यांना मारहाण होत होती. त्याचा वचपा कुठेतरी निघत होता.

अशाच मारामाऱ्यांतून, २९ऑगस्टला गोदरेज स्टाफ युनियनचे एक कार्यकर्ते श्री. मालंडकर ह्यांना फोर्टमध्ये जबरदस्त मारहाण झाली. त्यांनी म्हणे, स्टाफ युनियन कामगार संघटनेपासून अलग होण्यास विरोध दर्शवला होता.

मालंडकरांवरचा हा हल्ला शिवसैनिक अनंत चिकणे ह्यांनी केला होता असे म्हणतात. (हे अद्याप सिद्ध मात्र झालेले नाही !) व त्यात श्री. चिकणे ह्यांना श्री. रामू घाडीगावकरांची साथ असावी असा संशय होता. ह्यासाठी घाडीगावकरांना जाब विचारण्यासाठी कॉलनीतल्या लोकांनी (विशेषत: स्त्रियांनी) घाडीगावकरांच्या घरावर मोर्चा नेला. त्यामध्ये वातावरण तापून घाडीगावकरांच्या घरावर दगडफेक झाली. घराच्या काचा फुटल्या. परंतु त्यातून बातमी पसरवली गेली ती घाडीगावकरांना मारहाण झाल्याची, त्यांना रक्त हवे असल्याची. त्यातून श्री. घाडीगावकरांना बघायला जाणाऱ्यांची, विशेषत: शिवसैनिकांची, कंपनीच्या चालकांची रीघ लागली.

अनंत देसायांची पत्नी सौ. अलका देसाई ह्यांनी ह्याविषयी तीव्र संताप व्यक्त केला. त्या म्हणतात, 'घाडीगावकरांना खरोखरच मार लागला होता का ह्याची चौकशा व्हावी आणि तशा परिस्थितीत ते कामावर कसे जात होते हेही एक कोडेच आहे.' कंपनीचे सर्व अधिकारी, स्वत: मालक मार न लागलेल्या घाडीगावकराला बघायला येत होते. पण जबर जखमी होऊन सेंट जॉर्जमध्ये पडलेल्या श्री. मालंडकरांना मात्र बघायला कुणीही गेले नाही ह्याचा त्यांना उलगडाच होत नव्हता. त्यामुळेच बघायला येण्याच्या या प्रकारात काहीतरी 'गोम' निश्चित होती असेही सौ. देसाई म्हणाल्या.

१ सप्टेंबरला श्री. रा. वि. पडवळ व आणखी काही सैनिक श्री. घाडीगावकरांना बघायला गेले होते.

कामगार सांगतात, ते ट्रकमधून आले होते. 'डॉ. दत्ता सामंत मुर्दाबाद' 'अनंत देसाई मुर्दाबाद' अशा घोषणाही म्हणे ते देत होते. त्यांना बघून कॉलनीतल्या लोकांनी घाडीगावकरांच्या घराजवळ जवळ जवळ घेरावच केला. कामगारांच्या भावना भडकल्या होत्या. 'घाडीगावकरला भेटता तसे मालंडकरांना भेटायला का जात नाही.' असे सवाल त्यांना केले जात होते. श्री. तुषार पवार त्यावेळी श्री. अनंत देसायांकडे होते. ते शेवटी ह्या भांडणात पडले. 'एका शिवसैनिकाची विचारपूस करायला यायचा दुसऱ्या शिवसैनिकाला अधिकार आहे. त्यांना तुम्ही अडवू शकत नाही. मालंडकर तुमचा माणूस आहे. त्यांना बघायला जायची सक्ती तुम्ही दुसऱ्यावर करू शकत नाही. तुम्ही स्वत:च मालंडकरांना बघायला गेलं पाहिजे.' ह्या शब्दात मी त्या भडकलेल्या कामगारांना समजावलं असे तुषार पवारांनी मला सांगितले. तर अनंत देसाई, फ्रेडरिक आदी नेत्यांनी रा. वि. पडवळांना सुखरूप बाहेर काढले, जमावाला आवरले असे सौ. देसायांनी व इतर कर्मचाऱ्यांनी मला सांगितले. ह्यानंतर शिवसैनिकांनी म्हणे पोलीस स्टेशनवर मोर्चा नेला होता.

ह्याच दिवशी श्री. देसायांच्या घराभोवती अज्ञात माणसे फिरत असल्याचेही सौ. देसाईंना दिसले होते. त्यात-

याच दोघांनी देसायांचे दार ठोठावून देसायांना आम्ही कोण ते कळेलच अशा धमक्याही दिल्या होत्या.

ह्या साऱ्या बातम्या कॉलनीभर पसरल्या आणि गोदरेज कॉलनीतला १ सप्टेंबर संपला तो एक प्रकारे तंग वातावरणातच !

ह्यातल्या बऱ्याच आरोपांचा शिवसेना नेत्यांनी इन्कार केलेला आहे— माझ्याजवळ, त्याचप्रमाणे अन्य वृत्तपत्रातूनही. मात्र घाडीगावकरांना मार लागला नव्हता हेही त्यांनी कबूल केले. तथापी त्यांच्या घरावर दगडफेक झाली होती, घाडीगावकरांवरही हल्ल्याचा प्रयत्न झाला होता ही सत्य परिस्थिती होती. आणि वातावरण काय आहे ते जाणून घ्यायचे, शिवसैनिकांना काय त्रास होतो आहे हे समजावून घ्यायचे, त्यासाठीच घाडीगावकरांची भेट पडवळ, नगरसेवक बोधे ह्यांनी घेतली. तरीही झाल्या प्रकाराने शिवसेना गटातही १ सप्टेंबर संपला तेव्हा वातावरण तंग असावे असे वाटते. त्यातच दोन सप्टेंबरला घाडीगावकराच्या घराला भेट द्यायला श्री. बाळासाहेब ठाकरे किंवा आमदार मनोहर जोशी येणार असे जाहीर झाले होते.

एकंदरीत दोन सप्टेंबर उजाडला तो तंग वातावरणातच ! □

# ५ : २ सप्टेंबर आणि नंतर !

१ सप्टेंबरला धमाल उडालेली. त्याआधी महिना दोन महिने वातावरण तंग होते. ह्या तंग पार्श्वभूमीवरच २ सप्टेंबर उजाडला.

संध्याकाळी शिवसेनेचे आमदार मनोहर जोशी, शिवसेनेचेच विक्रोळीतले नगरसेवक श्री. बोधे, भांडूपचे नेते श्री. रा. वि. पडवळ व इतर शिवसैनिक घाडीगावकरांना भेटायला गोदरेज कॉलनीत शिरले. बरोबर पोलिस बंदोबस्त होता. घाडीगावकरांच्या घरून श्री. मनोहर जोशी व अन्य मंडळी उतरली आणि त्या कॉलनीत अभूतपूर्व दंगलीला सुरुवात झाली. पोलिसांचा गोळीबार व अश्रूधूर ह्यांनाही दंगलखोरांनी दाद दिली नाही. ह्या भीषण दंगलीत सिलेक्शन ग्रेड इन्स्पेक्टर श्री. चांदगुडे हे मारले गेले. अगदी चेंदामेंदा करून मारले गेले. एक हवालदार श्री. राणे भीषण जखमी झाले आणि दुसऱ्या दिवशी रुग्णालयात मरण पावले. श्री. केशव पांचाळ नावाचे एक गोदरेज कामगार पोलिसांच्या गोळीबारात ठार झाले. कित्येक शिवसैनिक जबर जखमी झाले. अनेक कामगारांनाही मार बसला. पोलिसांच्या गाड्यांची पार नासधूस झाली.

ह्या संपूर्ण घटनेच्या तपशीलाबाबत

प्रत्येकाची वेगवेगळी विधाने आहेत. त्यातून संपूर्ण सत्यांपर्यंत पोचणे संपूर्ण न्यायालयीन चौकशीमंडळाशिवाय कुणालाच शक्य होणार नाही ! परंतु ह्या गोंधळात एक गोष्ट मात्र निश्चित आहे. पोलिसांनी आपली कामगिरी जीव धोक्यात घालूनही, प्राण गमावूनही चोख बजावली आहे. आमदार मनोहर जोशींना सहीसलामत बाहेर काढण्यात ते यशस्वी झाले. त्यांना वेळीच ज्यादा कुमक मिळाली असती तर मन्युष्यहानीही ते वाचवू शकले असते !

ह्या घटनेवर मतभेद चिकार आहेत. अनेकांची अनेक विधाने आहेत, वक्तव्ये आहेत. ज्यांचे ज्यांचे विचार मी ऐकले त्यातले बरेचसे सध्या कोर्टासमोर असलेल्या दत्ता सामंत, अनंत देसाई, कृष्णा जोशी आदींवरील खटल्यात साक्षिदार आहेत. ह्या बाजूने वा त्या बाजूने. म्हणूनच त्यांची मते मी इथे उद्धृत करीत नाही. खुद्द त्या त्या व्यक्तींचीही मला तशी सूचना आहे. त्यामुळे त्या सर्वांनी सांगितलेल्या तपशीलांवरून, मला काय वाटले तेवढेच मी इथे नमूद करणार आहे. एका पोलिसाने सांगितलेली हकिगत मात्र मी इथे देणार आहे. कारण तोच तपशील मला सर्वात ज्यास्त ग्राह्य वाटतो. कारण मी कोण आहे, कशासाठी त्याला प्रश्न विचारतो आहे, ह्याचीही त्याला कल्पना नव्हती. दादरहून स्कूटरवरून येत असताना त्याने लिफ्ट मागितली. साध्या वेशात होता तो. बसल्यावर बोलणे सुरू झाले

## डेप्युटी इन्स्पेक्टर चांदगुडे

डे. इ. कै. पृथ्वीराज चांदगुडे हे आपल्या सहकाऱ्यात चांगलेच लोकप्रिय होते. खुद्द कामगारातही त्यांच्याविषयी आदरच दिसला. त्यांच्या मृत्यूने कामगारही व्यथित झालेले दिसले.

संपूर्ण चांदगुडे कुटुंबच जणु पोलिसी वातावरणाशी एकरूप झालेले आहे. त्यांचे धाकटे बंधू श्री. शिवाजीराव प्रोहिबिशन व एक्साईज ब्रँचला सबइन्स्पेक्टर आहेत. तर आणखी एक बंधू वडनेऱ्याला (वऱ्हाड) सबइन्स्पेक्टर आहेत. त्यांचे चुलते सी. आय. डी.ला डेप्युटी सुपरिंटेंडेंटच्या पदावर पुण्याला असतात.

चांदगुडे कुटुंबाचे मूळ गाव आहे सुपे. पण गेल्या दोन पिढ्यांपासून ते जळगावलाच स्थायिक झाले आहेत. त्यांचा जन्म २ जून १९२५ ला झाला. १९४८ मध्ये त्यांनी पोलीसदलात प्रवेश केला. विक्रोळी पोलीस स्टेशनात ते घटनेपूर्वी दोनच महिने आधी बदलून आले होते. त्यांच्या वृद्ध आईचे दोनच दिवसांपूर्वी ऑपरेशन झाले होते. त्यांचे वडीलही (वय ७५) त्यांच्या मागे आहेत. □

तेव्हा कळले तो पोलीस आहे. नंतर कळले तो विक्रोळी पोलीस स्टेशनलाच काम करतो आणि दंगलीच्या वेळी श्री. चांदगुडचांबरोबर तो प्रत्यक्ष दंगलीच्या जागेवर होता. त्यानं मारही खाल्ला होता. तथापि शेवटपर्यंत आम्ही एक-मेकांना नावेही विचारली नाहीत. माझे 'माणूस 'चे नातेही मी त्याला अजिबात सांगितले नाही. अगदी सहजी गप्पांच्या ओघात मला त्याने विक्रोळी प्रकरणा-तली माहिती पुरवली. पत्रकाराला किंवा चौकशी-मंडळाला माहिती द्यायची असली की ती देताना माणूस हजारवेळा विचार करतो. गप्पा मारताना त्याला तो विवेक नसतो. म्हणूनच त्याची हकिकत मला ज्यास्त ग्राहय वाटली. निव्वळ योगायोगाने मिळालेली तीच माहिती मी पुढे देत आहे......

—गोदरेज वसाहतीत वातावरण खूपच तापलेले होते. डॉ. सामंत, कृष्णा जोशी ह्यांची भाषणे, त्यांच्या धमक्या रोज जोर धरत होत्या. १ तारखेला शिवसैनिक कॉलनीत गेले. त्यामुळे वातावरण ज्यास्त तापले. परंतु ह्या वातावरणात पोलिसांनी हस्तक्षेप करू नये अशा सूचना होत्या. तिथल्या गड-बडीकडे म्हणूनच कानाडोळा होत होता. तक्रारीनंतर पकडून आणलेल्याना सोडून दिले जात होते. दोन किंवा तीन सप्टें-बरला मात्र पोलीस स्टेशनवर काही-तरी गडबड होईल अशा आमच्या बातम्या होत्या. बलसारासाहेब कामावर असताना कामगारांचा मोर्चा येईल व गडबड उडेल अशी बातमी होती. कॉलनीत एकदम गडबड होईल असे मात्र वाटत नव्हते. संध्याकाळी मनोहर जोशींबरोबर आम्ही २५-३० हवाल-दार, चांदगुडे, धुरू, कदमसाहेब कॉल-नीत गेलो. बरोबर २५-३० शिवसेनेची माणसे होती. जोशी ८४ नंबरला गेले. (इथेच घाडीगावकर राहातात!) तिथून ते बाहेर पडल्यावर एकदम हल्ला झाला. त्यांची तयारी फार जोरदार होती. जोशीला आम्ही जीपमध्ये घालू शकलो म्हणून, नाहीतर जोशी जिवंत राहात नव्हते. इतरही शिवसेना-वाल्यांच्या पुढे आम्ही आलो म्हणून ते वाचले. पोलिसांना बरोबर घेऊन शिव-सेनावाले कॉलनीत गेले नसते, तसेच परभारे गेले असते, तर सगळचांची पार खांडोळी झाली असती! त्यांच्याजवळ त्यावेळी काहीच नव्हते. तर हल्ला करणारांजवळ लाठया, फुटक्या बाटल्या, सुरे, बरच्या, फरशा होत्या. त्यांचा रोख पण सगळा शिवसेनावाल्यांवरच होता दंगल माजवणाऱ्यात कामगारही नसावेत. मी इथेच कामाला, त्यामुळे सर्वांना ओळखतो. पण त्या दंगलवाल्यात मला खूप चेहरे विक्रोळी बाहेरचे वाटत होते .....'

ह्यातल्या तपशीलाबाबत, शिवसेना, कामगार, कुणाचेच जाहीररित्या एकमत होणार होणार नाही. पण मला ते ग्राह्य वाटते. असे वाटण्याला दुसरेही एक कारण आहे. विधानसभेच्या पाच सदस्य समितीने ह्या दंगलीनंतर विक्रो-ळीला भेट दिली. ह्या समितीने काढ-लेले निष्कर्ष आणि केवळ योगायोगाने

मला ऐकायला मिळालेली पोलिसांची माहिती ह्यात फारच मोठे साम्य मला आढळले. एकच विचार मला नवीन आढळला. जशी शिवसेनेनी ही दंगल सुरू केली नव्हती, तशीच ती कामगारांनीही सुरू केलेली नसावी. प्रत्यक्ष हल्लेखोरांत बाहेरचेच दंगलखोर गुंड असावेत. डॉ. सामंतांची व कृष्णा जोशींची प्रक्षोभक भाषणे, विक्रोळी–भांडूप पोलिस स्टेशन्स जाळून टाकायच्या धमक्या, त्यातून निर्माण झालेले दहशतवादी वातावरण ह्याचा फार कौशल्याने कुणीतरी उपयोग करून घेतला असावा असे मला वाटते. खुद्द कामगारांनाही अंधारात ठेऊन पोलिस स्टेशनवर मोर्चा न्यायचे बेत आखले गेले होते. पोलिसांच्या ह्या म्हणण्याला काही गावकरी मंडळींनीही पुष्टी दिली. परंतु ऐनवेळी शिवसैनिक आत आल्यावर हल्लेखोरांचे उद्दिष्ट बदलले असावे. ह्यात शिवसेनेलाही फटका बसणार होता. पोलिसानांही अद्दल घडणार होती. शिवाय ह्याचे सारे मापही सामंतांच्या गळ्यात बांधले जाणार होते. हा सारा चोख हिशोब होता. सामंतांनीच तयार केलेले वातावरण त्यांच्याच विरुद्ध वापरून त्यांनाच हादरा द्यायचा आणि त्याचबरोबर शिवसेनेलाही झोडपून काढायचे ! टाकलेला हा डाव अगदी व्यवस्थित खेळला गेला. डॉ. दत्ता सामंत आत बंद झाले. शिवसेनेविरुद्ध अपेक्षेप्रमाणे सर्वांनी गदारोळ उठवला. आता सामंतांच्या युनियनमध्ये शिरून त्या मोडून काढणे अधिक सोपे होते. शिवसेनेचा ह्या साऱ्यांत हात असल्याचे जे ढोल बडवले गेले त्यामुळे शिवसेनाही कामगारांत बदनाम झाली होती.

ह्या साऱ्या मागच्या सूत्रधाराचे मात्र डोके वाखाणण्यासारखे आहे. असा सूत्रधार कोण असावा हाच खरा न्यायालयीन चौकशीचा विषय व्हावा. माझ्या मते पुढील लोकांना ह्या सूत्रामध्ये स्वारस्य असावे.

---

## वायरलेस ऑपरेटर राणे

वायरलेस ऑपरेटर कै. रणजित राणे हेही खानदेशातलेच. धुळे जिल्ह्यातल्या तळोद्याचे. घटनेच्या आदल्या दिवशी ते आजारी होते. तरीही शनिवारी ते कामावर गेले होते.

सुमारे नऊ वर्षांपूर्वी त्यांचे लग्न झाले होते. सिनेमा, स्वच्छ कपडे आणि मोटार चालवायची त्यांना आवड होती. टॅक्सी खरेदी करून स्वतंत्र व्यवसायात पदार्पण करावे हे त्यांचे स्वप्न होते. मुलांना खूप शिकवायची त्यांची इच्छा होती.

त्यांच्या मागे पत्नी, ५ वर्षांची मुलगी व १। वर्षाचा मुलगा एवढा परिवार आहे. ◻

---

१. मालक मंडळी : एफ. आय., प्रिमियर, गोदरेज वगैरे ईशान्य मुंबई-भर सामंतांचे नेतृत्त्व येत होत. ते रुच-णारे साहाजिकच नव्हते. ते नेतृत्त्व नाहीसे होणे, किमान दूर होणे माल-कांच्याच फायद्याचे होते. त्यामुळे ह्या विभागातल्या बड्या कारखानदारांची साखळी होऊन तिने सामंतांना वेढायचा प्रयत्न केला असावा.

२. इंटकचे प्रस्थापित नेतृत्त्व व त्या-आडून महाराष्ट्र शासनच कदाचित : कारण ह्यात बी. पी. सी. सी. विरुद्ध महाराष्ट्र शासन हा वादही गोवला होता. सामंत पटेलांना जवळचे होते. इंटक महाराष्ट्र शासनाला जवळची होती. कदाचित ह्या कारणानेच महा-राष्ट्र शासनाने गोदरेज प्रकरणी बघ्यांची भूमिका बजवायला पोलिसांना भाग पाडले असावे.

३ कम्युनिस्टस् : मागे पडलेल्या लालबावटा संघटनांना ह्या घटनांचा फायदा उठवून घेऊन, नामानिराळे राहणे सहज शक्य होते. शिवाय त्यामुळे ह्या वादाचा फायदा उठवून आपल्या संघटनांचे वर्चस्व प्रस्थापित करणेही त्यांना शक्य होते. कम्युनिस्ट राजनीतीत ते बसते. सामंतांना मित्र म्हणून त्यांचा त्यांच्याच विरुद्ध उपयोग करायला त्यांच्या नीतीत त्यांच्यावर बंधन नक्कीच नाही.

ह्यावर जास्ती भाष्य करणे कोर्टाच्या मर्यादेमुळे शक्य नाही. पण मी जे विचार वर मांडले त्याचे प्रत्यंतर येऊ लागले आहे. दत्ता सामंतांनी बांधलेल्या युनियन्समध्ये फाटाफूट होऊ लागली आहे. इंजिनियरींग वर्कर्स असोसिएशन ह्या इंटक प्रणीत संघटनेत फूट पडू पाहात आहे. कल्याण-डोंबिवली भागा-तले ह्या संघटनेचे एक प्रमुख नेते श्री. बोराडे ह्यांनी परवा विक्रोळीत सभा घेतली. आमदार टेंबे, आमदार तुषार पवार ह्यांचे नेतृत्व ह्या सभेत झुगा-रून दिले गेले. डॉ. सामंतांना अध्यक्ष करण्याची घोषणाही दिली गेली. श्री. टेंबे, तुषार पवार यांनी हे निर्णय घटनाबाह्य असल्याचे म्हटले आहे. अनेक इंटक कार्यकर्त्यांनाही हा निर्णय मान्य नाही. टेंबे ह्यांच्या अध्यक्षते-खालील एक व डॉ. सामंतांच्या अध्यक्षते-खालील एक अशा दोन इंजिनियरींग वर्कर्स असोसिएशन्स अस्तित्वात येण्याचे घाटत आहे.

डॉ. सामंतांच्या अटकेमुळेही कामगा-रात गोंधळ माजला आहे. त्यामुळेही ह्या युनियन्समध्ये फाटाफूट पडायला मदत होत आहे. डॉ. सामंतांच्या एका निकटवर्ती सहकाऱ्याने तर चक्क असा आरोप केला की, 'सामंतांच्या युनि-यन्स धुवून काढायसाठीच त्यांना तुरुं-गात डांबून ठेवले आहे.'

दोन सप्टेंबरच्या दंगलीनंतर, दोन पोलीस कर्मचाऱ्यांचे बळी पडल्यावर पोलिसांनी गोदरेज कॉलनीचा ताबा घेतला; आणि रात्री दोनअडीचपर्यंत अक्षरशः थैमान घातले. पोलिसी अत्या-चारांच्या, त्यांनी वापरलेल्या बेलगाम भाषेच्या अनेक कहाण्या मला कॉलनीत हिंडताना ऐकायला मिळाल्या. कुणाला

पानावरून उठवून झोडपून काढले, कुणाला अक्षरश: घरातून उचलून फेकून दिले, दरवाजे धक्के मारून मारून खिळखिळे करून टाकले, मुले-मुली-आजारी-म्हातारी-कोतारी कसले कसलेही तारतम्य पोलिसांनी दाखवले नाही वगैरे वगैरे. पोलिस कमिशनरांनी विधानपरिषदेच्या पाच सदस्य समिती-जवळ असे काही अतिरेकी प्रकार पोलिसांनी केल्याचे मान्य केले. परंतु त्यांच्यावर झालेल्या अत्याचारांमुळे पोलिसांच्या भावना अनावर झाल्या असाव्यात, त्यांचा उद्रेक झाला असावा असेही त्यांना वाटते. अशा अनेक पोलिसांच्या विक्रोळी दंगलीनंतर बदल्या करण्यात आल्याचेही त्यांनी समितीला सांगितले. ह्या अत्याचारांच्या, मला सांगितल्या गेलेल्या कहाण्या लिहा-यचे ठरवले तर स्वतंत्रच लिखाण करावे लागेल. म्हणून त्यावर एवढेच म्हणतो की, पोलिसी अत्याचारांची देखील चौकशी व्हावी. भावनांचा उद्रेक स्वाभाविक असला तरी, पोलीस म्हणून येणाऱ्या जबाबदाऱ्यांमुळे त्यावर मर्यादा असलीच पाहिजे !

असे हे एकंदर गोदरेज प्रकरण. डॉ. सामंत, अनंत देसाई, फ्रेडरीक, कृष्णा जोशी आदी नेते तुरुंगात असले तरी, कामगार लढा तूर्त तरी सुरू आहे. डॉक्टरांनीच तयार केलेला मागण्यांचा मसुदा मॅनेजमेंटला सादर केला गेला आहे. पुढच्या लढ्याच्या घोषणा सुरू आहेत. पण एकंदरीत काँग्रेसने, शासनाने घेतलेल्या भूमिकांबद्दल कामगा-

## याही हत्येची चौकशी हवी

'कुठल्याही दगलीची, साध्यासुध्या गोष्टीची न्यायालयीन चौकशी व्हावी अशी मागणी सर्वजण करतात. पण पोलिसांच्या निर्घृण हत्येचा साधा निषेधही कुणी करीत नाही. त्या दोन पोलिसांचे खून कोणी, कसे व का केले ह्याची संपूर्ण चौकशी झाली पाहिजे...पोलीस हेही कामगार आहेत. ते कामगारांचे शत्रू नाहीत.. अशावेळी दोन लढणाऱ्या कामगारांत पोलिसांचा बळी दिला गेला...ह्याची सारी जबाबदारी सरकारवरच येते. सरकारने पोलिसांना संरक्षण दिले पाहिजे...पोलिसांचीही दैना आहे. अशा परिस्थितीत मोठमोठे पुढारी डोळे असूनसुद्धा आंधळ्यासारखे वागतात. दोन पोलिसांच्या खुनाबद्दल तोंडही उघडत नाहीत. पोलिसांच्या खुनाचा धिक्कार केला तर कामगार चिडतील अशी भिती त्यांना वाटत असावी. पोलीस हेही श्रमजीवी कामगार हे ते विसरलेले दिसतात.. '

श्री. संभा चव्हाण
प्रमुख, पोलीस मित्र मंडळ
('शूर शिपाई' वरून)

रांच्या मनात आकस आहे. येत्या महापालिका निवडणुकात कॉंग्रेस व शिवसेनेला पाडायचा त्यांनी चंग बांधला आहे. खुद्द रजनी पटेलांनीही आपला विश्वासघात केला अशी बहुसंख्य कामगारांची भावना आहे. दुसरीकडे कॉंग्रेस, आरोपी व्यक्तींना व त्यांच्या पत्नींना निवडणुका लढवायचे आवाहन करीत आहे. अनंत देसाई व सौ. अलका देसाई ह्यांनी कॉंग्रेस उमेदवारीसाठी अर्ज केल्याचेही मला कळले आहे. कामगारांनी मात्र ह्याबाबतीत मला असे सांगितले की ही मंडळी देखील अपक्ष किंवा कॉंग्रेस-शिवसेना व्यतिरिक्त इतर पक्षाच्या तिकिटावर उभी राहिली तरच आम्ही त्यांना निवडून आणू. एरवी नाही. सौ. सामंतांनादेखील निवडणुकीला उभे करण्याचे प्रयत्न चालू आहेत असे कळले. त्यांनी मात्र निवडणुकीला उभे राहायचा आपला मानस नाही असे मला सांगितले. ही सारी फाटाफुटीची नांदी तर नाही ना?

समारोपात मला एवढेच म्हणायचे आहे की मालक, नेते, पक्ष ह्यांच्या राजकारणात कामगार ओढला गेला. त्यांची डोकी फुटली व शेवटी नुकसानही त्यांचेच झाले. पुढील गोष्टी घडल्या असत्या तर कदाचित हे नुकसान टळले असते. कामगार चळवळीचे पाऊल मागे खेचले गेले नसते.

१. इंटक प्रणीत संघटनेच्या नेतृत्वाच्या संघर्षात इंटकच्या वरिष्ट नेत्यांनी, मुंबई कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांनी वेळीच हस्तक्षेप करायला हवा होता.

२. प्रकरण हाताबाहेर जाऊ लागल्याची चिन्हे दिसताच, म्हणजेच जून ते सप्टेंबरच्या दरम्यान शासनाने हस्तक्षेप करायला हवा होता.

## आंदोलन आणि न्यायालय

विक्रोळी प्रकरणानंतर डॉ. सामंतांची जामिनावर सुटका व्हावी म्हणून कामगारांनी आंदोलन केले. साधारण असेच एक उदाहरण इंग्लंड कामगार चळवळीत घडले असे मला दळवी बिल्डिंगमधल्या कम्युनिस्ट युनियनच्या ऑफीसमध्ये बसलो असता कळले. कॉ. वैद्य ह्यांनी मला ती घटना सांगितली.

इंग्लंडमध्ये अलीकडेच डॉक कामगारांचा मोठा संप झाला. पिकेटिंग करायला कायद्याने निर्बंध घातले. तरीही निर्बंध मोडून तिथल्या नेत्यांनी कायद्याचे उल्लंघन केले. त्यांना अटक झाली. त्यांच्यावरचे गुन्हे शाबीत झाले. त्यांना शिक्षा ठोठावण्यात आल्या. त्यावेळी इंग्लंडमधल्या एकजात सर्व कामगारांनी ह्या पाच नेत्यांच्या सुटकेसाठी देशव्यापी संप केला. एका दिवसाचा. त्या दिवशी हीथ्रो विमानतळदेखील बंद होते. ह्या प्रचंड प्रक्षोभाची दखल न्यायालयाला घ्यावी लागली आणि शिक्षा भोगीत असलेल्या नेत्यांची त्यांनी सुटका केली. □

३. डॉ. सामंतांच्या व कृष्णा जोशींच्या प्रक्षोभक भाषणांचा दाखला शासनातर्फे आज कोर्टात वेळोवेळी दिला जात आहे. पण हे नेते जेव्हा अशी भाषणे प्रत्यक्ष करत होते तेव्हा शासनाने तिकडे काना डोळा का केला ? एरवी कुठल्या छोट्याशा भाषणावरून शासन प्रतिबंधक उपाय योजते. मग ह्याच वेळी घोडे कुठे पेंड खात होते ? केवळ काँग्रेसी आमदार म्हणूनच काना-डोळा केला गेला असे तर नाही ना ? की कुणी म्हणतात त्याप्रमाणे रजनी-भाईंचा दबाव येऊन शासनाने कृती केली नाही.

४. मालंडकरांवरील हल्ल्यानंतर परिस्थिती प्रक्षोभक झाल्याची जाणीव सर्वांनाच झाली होती. त्याचवेळी पोलिसांनी बंदोबस्तात वाढ करून खंबीर उपाय योजायला हवे होते.

५. शिवसेना नेते श्री. मनोहर जोशींना कॉलनीत जायला कुठल्याही परिस्थितीत पोलिसांनी प्रतिबंध करायला हवा होता. शिवसेना नेत्यांनीही तंगी ओळखून घाडीगावकरांना भेटायला जायचे, वारंवार जायचे टाळायला हवे होते.

६. श्री. नवीन गोदरेज ह्यांनी समितीला दिलेल्या मुलाखतीत आपण कामगारांच्या हितासाठी केलेल्या गोष्टींची जंत्री दिलेली आहे. काम-गारांचा सामंतांना असलेला भरीव पाठींबा लक्षात घेऊन, त्यांनी वेळीच सामंतांबरोबर वाटाघाटी करायला हव्या होत्या.

७. प्रभाकर कुंटयांनी देखील गोदरेज प्रकरणात जातीने लक्ष घालून परि-स्थिती नीट हाताळायला हवी होती. अनंत देसायांना दूर करून रुसी मास्टर-राणे-कदम-हळदणकर ह्यांना जवळ करण्यात त्यांनी फार मोठी चूक केली.

□ □ □

केवडयाचा ओढा
पहारा
काळदरीचे काळीज
भास्करबुवा
चंदर
भवानबंकी
हिरा
बापू
सरकारवाडा

आगामी
कथासंग्रह

# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

राजहंस
प्रकाशन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. MH-649



पुढील अंकी

## ना. भाऊसाहेब वर्तकांच्या जिल्ह्यातील

## हिरवळ आणि होरपळ